
मासिक

# शिक्षण यात्री

||दीपावली विशेषांक||
२०१९




किंमत: १२० रुपये

स्थापना) || श्री गणेशाय नमः || (१९७५

|| एकामेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ ||

(नोंदणी क्र. बी.ओ.एम्. /आर.एस.आर./७२५ सन १९७५)

# सेकंडरी स्कूल्स् एम्प्लॉईज को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई.

## प्रशासकीय कार्यालय व कुर्ला शाखा

१०१, मानवदृष्टी, पहिला मजला, कुर्ला कोर्टासमोर, एल.बी.एस्.मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई - ४०० ०७०

☎. २६५००११९

| | | | |
|---|---|---|---|
| दादर शाखा | ☎. २४१३७८६१ | विक्रोळी शाखा | ☎. २५७८२४९६ |
| जोगेश्वरी शाखा | ☎. २६७९७८७४ | सानपाडा शाखा | ☎. २७७५५१५२ |
| ठाणे शाखा | ☎. २५४०९९२४ | कराड शाखा | ☎. ०२१६४ - २२१८६६ |
| बोरिवली शाखा | ☎. २८५४४४२१ | लोणावळा विश्रामधाम व शाखा | ☎. ९४०४४६६५११ |
| पुणे शाखा | ☎. ०२० - २६१२३९५५ | नारायणगाव शाखा | ☎. ०२१३२ - २४४०१२ |
| सातारा शाखा | ☎. ०२१६२ - २२२१०१ | कल्याण शाखा | ☎. ०२५१ - २३०४५८८ |
| पिंपरी चिंचवड शाखा | ☎. ०२० - २७२४०११० | चेंबूर शाखा | ☎. २५२९००२५ |
| सासवड शाखा | ☎. ८३८०८०५६६६ | इंदापुर शाखा | ☎. ०२१११ - २२३०२९ |
| पंढरपूर शाखा | ☎. ०२१८६ - २२३०३० | चिपळूण शाखा | ☎. ०२३५५ - २५७७०१ |
| सोलापूर शाखा | ☎. ०२१७२७२३३९९ | धुळे शाखा | ☎. ०२५६२२३२२३ |
| नाशिक शाखा | ☎. ०२५३२९७१११९ | | |

- ❖ मध्यम मुदत कर्ज ` २५,००,०००/- (हप्ते १८० ), (व्याज दर ः ११.०० %).
- ❖ गृह कर्ज ` ४०,००,०००/- (हप्ते २४० पर्यंत ), (व्याज दर ः ११.०० %).
- ❖ सभासदांना त्वरीत ` २,००,०००/- हायर पर्चेस कर्ज (हप्ते ५० ) (व्याज दर १२.०० % ).
- ❖ आकस्मिक कर्ज ` ५०,०००/- (हप्ते १२ ), (व्याज दर ः १२.०० %).
- ❖ संचय कर्ज जमा संचय निधीच्या ९० % रक्कम अदा केली जाते.
- ❖ अत्यल्प दरात लोणावळा विश्रामधाम येथे राहण्याची उत्तम सोय. सर्व शाखा संगणीकृत. सभासदांना तत्पर सेवा.

सभासद ः ३३,३६३ ऑडिट वर्ग ः "अ"







| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. चंद्रकांत बाजीराव पाटील | श्री. दिलीप ना. पाचांगणे | श्री. किशोर मु. पाटील | श्री. शिवाजी अ. शेंडगे | श्री. सुरेश दि. संकपाळ |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मानद सचिव | सह सचिव | खजिनदार |

सहकार तज्ञ संचालक - श्री. जगन्नाथ राजाराम पाटील

### संचालक मंडळ

| | |
|---|---|
| संचालिका ः सौ. सुरेखा किशोर माने | संचालिका ः सौ. पुष्पलता अशोक मुळे |
| संचालक ः श्री. राज रामचंद्र बोराटे | संचालक ः श्री. सखाराम भागुजी डोंगरे |
| संचालक ः श्री. सुधाकर बबनराव जगदाळे | संचालिका ः सौ. वनिता अविनाश भोसले |
| संचालक ः श्री. रामचंद्र शिवाजी गलांडे | संचालक ः श्री. पांडुरंग ज्ञानदेव कणसे |
| संचालक ः श्री. संभाजीराव शिवाजीराव शिंदे | संचालक ः श्री. गुलाबराव साहेबराव गवळे |
| संचालक ः श्री. सत्येंद्र हवलदार सिंहा | संचालक ः श्री. सतेश शहाजी शिंदे |

कार्यलक्षी संचालक, सर व्यवस्थापक ः श्री. विश्वास कृष्णराव नावडकर

कर्मचारी प्रतिनिधी ः श्री. रूपेश कृष्णा मानकर. श्री. प्रसाद रघुनाथ पवार


शुभ दीपावली
यशाची रोशनी, समाधानाचा फराळ,
मंगलमय रांगोळी, मधुर मिठाई
आकर्षक आकाशकंदील,
आकाश उजळवणारे फटाके।
येत्या दिवाळीत हे
सगळं तुमच्यासाठी !
दिवाळीनिमित्त सर्वांना
लक्ष लक्ष शुभेच्छा !
राहूल विश्वासराव रंधे
तालुकाध्यक्ष,शिरपूर
rahulrandhe
RahulRandhe


सप्तरंगी दिवाळीच्या
प्रकाशमय शुभेच्छा!
Happy Diwali
स्व.रसिकलाल पटेल
मा.हेमंतबेन पटेल
स्व.मुकेशभाई पटेल
मा.अमरीशभाई पटेल
मा.भुपेशभाई पटेल
मा.चिंतनभाई पटेल
सौ. जयश्रीबेन अमरीश पटेल
श्रीमती केतकीबेन मुकेश पटेल
सौ. कृतिबेन भूपेश पटेल
मा.तपनभाई पटेल
पटेल परिवार,शिरपूर






"विकासाची वाट उमटली,
विरला गर्द कालचा काळोख...
क्षितीजावर विकासाची पहाट उगवली,
घेऊनीया भविष्याचा नव उत्साहा सोबत..."

दिपावलीच्या सर्व नागरिकांना

# हार्दिक शुभेच्छा !

## काशिराम वेचान पावरा

**आमदार, शिरपूर विधानसभा**


शुभेच्छुक


जितेंद्र रायसिंग भादले


रविंद्र काशिराम पावरा


गुमान काशिराम पावरा


सिकराम श्रीराम पावरा


सिताराम राजाराम पावरा



मन्साराम तुकाराम पावरा


पिताराम तुकाराम पावरा


HAPPY Diwali
FESTIVAL OF LIGHTS
मा.आ. बाळासाहेब थोरात
मा.आ.डॉ. सुधीर तांबे
मा. रणजीतसिंह देशमुख
SINCE 1977
राजहंस दूध
मालकी शेतकऱ्यांची, विश्वास ग्राहकांचा
दर्जेदार दूध आणि दुग्धजन्य उत्पादने
अस्सल शुद्धतेचं प्रतिबिंब !!
ताजे व शुद्ध राजहंस दूध
RAJHANS Fresh Paneer
RAJHANS Masala Milk
RAJHANS Pure Ghee
RAJHANS Icecream Milk
RAJHANS Processed Cheese
RAJHANS Gulab Jamun
RAJHANS Sweet Lassi
RAJHANS Dahi
MANGO Ice-Cream
संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित
अमृतनगर(घुलेवाडी), पोस्ट- संगमनेर साखर कारखाना, ता.संगमनेर, जि.अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com
rajhansmilk

नवा दिवस, नवे वर्ष,
नवी आशा, नवा हर्ष
नवे विचार, नवी कल्पना
नवे पाऊल, नवी चेतना
मनापासून ही एक इच्छा
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !





**मा.चंद्रकांत रघुवंशी**
शिवसेना नेते




**मा.रत्नाताई रघुवंशी**
नगराध्यक्षा नंदुरबार




**मा.राम रघुवंशी**
युवानेते

संस्थेचे आधारवड



स्व.रसिकलाल चुनिलाल पटेल (पप्पाजी)

प्रेरणास्थान



स्व.खा. मुकेशभाई पटेल

# शुभ दीपावली

**गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कास धरणारी व अल्पावधीत गरूड झेप घेणारी, राज्य शासनाचा उत्कृष्ट शैक्षणिक संस्था हा पुरस्कार मिळवणारी उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था**

# SES & RCPET Group of Institutions, Shirpur

## आर.सी.पटेल शैक्षणिक संकुल : शाखा विस्तार

| अ.नं. | संस्थेचे नांव | पूर्व प्राथ. शाळा | प्राथ. शाळा | माध्य. शाळा | आश्रमशाळा | | | ज्युनि. कॉलेज | सिनिअर कॉलेज | प्रोफेशनल कॉलेज | हॉस्टेल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्राथ. | माध्य. | ज्यु.कॉलेज | | | | | |
| १ | दि शिरपूर एज्युकेशन सोसायटी शिरपूर (स्थापना १९७९) | १५ | १४ | १७ | ०४ | ०३ | ०३ | ०८ | ०१ | ०८ | ०३ | ७५ |
| २ | आर.सी.पटेल एज्युकेशन ट्रस्ट शिरपूर (स्थापना १९८८) | ०३ | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ० |
| | एकूण | १८ | १७ | १८ | ०४ | ०३ | ०३ | ०९ | ०२ | ०८ | ०३ | ८५ |



**मा.श्री.अमरीशभाई आर.पटेल**

अध्यक्ष, शिरपूर एज्युकेशन सोसायटी,शिरपूर जि.धुळे



**मा.श्री.भुपेशभाई रसिकलाल पटेल**

अध्यक्ष, आर.सी.पटेल एज्युकेशन ट्रस्ट शिरपूर, जि.धुळे व सर्व संचालक मंडळ




**मा.श्री.राजगोपाल सी.भंडारी**

उपाध्यक्ष, दि.शिरपूर एज्युकेशन सोसायटी शिरपूर जि.धुळे व सर्व संचालक मंडळ

# दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा !

पुन्हा एक नवे वर्ष,
पुन्हा एक नवी आशा,
तुमच्या कर्तुत्वाला
पुन्हा एक नवी दिशा
नवे स्वप्न नवे क्षितीज,
सोबत माझ्या दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा!


डॉ.विजयकुमार गावीत
आमदार,नंदुरबार


कुमुदिनी गावीत
मा.जि.प.अध्यक्ष नंदुरबार


डॉ.हिना गावीत
खासदार,नंदुरबार


डॉ.सुप्रिया गावीत
नंदुरबार

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

किसान विद्या प्रसारक संस्था, संचलित


कर्मवीर स्व.अण्णासाहेब व्यंकटरावजी रणधीर


लोकमाता स्व. सावित्रीबाई व्यंकटरावजी रणधीर


स्व.दादासो. विश्वासराव रंधे


स्व.डॉ.प्रा.भाऊसो. विजयराव रंधे

# कर्मवीर व्यंकटराव रणधीर सी.बी.एस.ई.स्कूल, शिरपूर जि.धुळे


www.kvtrcbse.com
















मा.भाऊसो.तुषार रंधे (अध्यक्ष)


मा.ताईसो.आशाताई रंधे (खजिनदार)


मा.नानासो.निशांत रंधे (सचिव)

## संस्थेच्या वटवृक्षाच्या शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ वरिष्ठ महाविद्यालय | १० कनिष्ठ महाविद्यालय | ०८ व्यावसायिक विद्यालय | ०१ माध्यमिक आश्रमशाळा |
| २० माध्यमिक विद्यालय | १० प्राथमिक शाळा | ०१ प्राथमिक आश्रमशाळा | ११ इंग्लिश मेडियम स्कुल |
| ०१ म.गांधी ग्रंथालय/अभ्यासिका | ०६ अनुदानीत वस्तीगृह | ०१ सी.बी.एस.ई. स्कुल | १३ संलग्न विनाअनुदानीत वस्तीगृहे |

## संचालक मंडळ

श्रीमती. लीलाताई विश्वासराव रंधे, श्री.रणजितसिंग फत्तेसिंग पाडवी, श्री.रोहित विजयराव रंधे, ॲड.आर.एस.गुजराथी, श्री.आनंदसिंग दर्यावसिंग राऊळ, डॉ.जितेंद्र दयाराम चित्ते, श्री.शामकांत शिवाजी पाटील श्री.आनंदराव पाटील, श्री.के.डी.बच्छाव, श्री.भैय्या माळी, श्री.सिताराम माळी

# किसान विद्या प्रसारक संस्था, शिरपूर

# भीज दिवाळीच्या निमित्ताने...

लहान मोठ्यांसह साऱ्यानाच दिवाळीच्या आगमनाची आतुरता असते. चैतन्याचा हा दिपोत्सव अनुभवण्याला सगळ्यांनाच मजा वाटते. हर्षोल्हीत वातावरणात दिवाळीची आतिषबाजी नि जीभेला चव पुरवणारा फराळ मनमुराद आनंद देत असतो. पाच सहा दिवस असणाऱ्या या दिवाळी सणाची उत्कटता दाटल्याची प्रचिती प्रत्येकाला येत असते.

असा हा सणांचा राजा 'दिवाळी' उत्सवाला भारतीय वाङ्‌मयात 'यक्षराडी' , 'दीपप्रतिपदुत्सव', 'दीपमाल', दिवाळी इत्यादी नावांची ओळखतात. दिवाळी सण कसा सुरू झाला याबाबतही मतमतांतरे आहेत. काहींच्या श्रीराम वनवासातून अयोध्येत परत आल्यानंतर अयोध्या वासियांनी दीपोत्सव सुरू केला तर काहीच्या मते सम्राट अशोकाच्या दिग्वीजचा प्रित्यर्थ हा उत्सव सुरू झाला. काही अभ्यासकांच्या मते सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्या यांच्या राज्याभिषेक समारंभात दीपोत्सव साजरा झाला तोच पुढे दरवर्षी साजरा करण्याची प्रथा पडली. अर्थात दिवाळीचा उगम कसाही असला तरी या सणाचा आनंद काही औरच असतो.

पावसाळा संपून हिवाळी सुरू होण्याची चाहूल तर आश्विन कार्तीक महिन्याच्या काळात हा सण येतो. पावसाळा संपून नवीन पिकांची रास आलेली असते. त्यामुळेच दिवाळीच्या सणाला आनंद वाढलेला दिसतो. यंदा मात्र दिवाळी सण कधी आला ते कळलेच नाही. दिनदर्शिकेच्या तारखा सोडल्या तर दिवाळीची चाहूल उशिराच लागली. उशीरा म्हणण्यापेक्षा वसुबारसेच्या दिवशीच दिवाळी सण सुरू झालाय हे कळाले. त्याला महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकाही कारणीभूत ठरल्या. कारण निवडणूकीच्या धामधुमीत दिवाळीचा फटाका समजलाच नाही.

यापेक्षा पावसाळा संपला (जून ते सप्टेंबर) की ऑक्टोबरच्या मध्यापासून हिवाळा सुरू होत असल्याचा आपला अनुभव (गोड गैरसमज?). यंदा मात्र पावसाळ संपलाच नाही. अजुनही सुरू आहे. गणेशोत्सवात पाणीच पाणी तर दिवाळीच्या दिवसातही तेच. कुठे कमी-जास्त पडणारा पाऊस सोडला तर यंदा पावसाने साऱ्यांनाच त्याचा कंटाळा आला. या पावसाच्या लहरीपणामुळे दिवाळीची चाहूल उशिराच लागली. दिवाळीचे आकाश कंदील बाजारपेठेत लपूनच बसले. लोकांची लगबग ही दिसली नाही. पाऊस मात्र वातावरणात भरून राहिला. कधी बरसेल याचा नेम नव्हता. सकाळी पाऊस, दुपारी ऊन रात्री थंडी असा हा वेगळाच ऋतू अनुभवयाचा येत होता. अशा या लहरी वातावरणाचा फटका सणाबरोबर सगळ्यांनाच बसला.

यंदा दिवाळीचा आनंद कुठे दिसतच नाही असे म्हणणाऱ्या प्रत्येकाने या भीज-दिवाळीला आपणच जबाबदार आहोत याचे भान राखायला हवे. पर्यावरणाची होणारी नासाडी, वृक्षतोडीचे न थांबलेला काळ अशा अनेक षटकांनी आपल्याला 'भीज दिवाळी' पहायला मिळाली. वातावरणाने साऱ्यांचे अंदाज चुकवले. आणि यापुढेही चूकवतच रहाणार.

व्हॉटस्‌ॲप, फेसबुक वर या दिवाळीला पावसाळी दिवाळी म्हणून उल्लेख करित हिणवले गेले. पण दीपावलीच्या दिपोत्सवावर विरजन घालणारे आपणच याची काळजी मात्र दिसून आली नाही. म्हणूनच या भीज दिवाळीच्या प्रकाशपर्वात साऱ्यांनी मिळून पर्यावरणाची हानी टाळण्याची शपथ घेऊन प्रदुषणमुक्त दिवाळीचा संकल्प करू यात.

**- संपादक**

# दीपावली विशेषांक २०१९

मासिक
शिक्षण यात्री

## अंतरंग...

नव्या सरकार -सेवकांकडून अपेक्षा/ डॉ.विजय पांढरीपांडे/९
रंगाचे नर्तन/ डॉ.प्रतिमा इंगोले/१२
बदामाचे झाड/मोरेश्वर बागडे/१४
माया...माझ्या पराभावाचे नाव/हेरंब कुलकर्णी/१७
विनिता इज नो मोअर/विजयकुमार इंगळे /२२
स्त्री पुरूष समानता आणि विषम आचार/डॉ.शरद घाटे/२४
वाचन संस्कृती: दशा आणि दिशा/संजय बोरूडे/२६
सफरचंद खाताय? सावधान!/जोसेफ तुस्कानो /२८
साने गुरूजी- आमच्या गणेशोत्सव !/प्रा.श्री.द.महाजन/३०
शेतकरी राजा, उठा/लतिका चौधरी/३३
एकोनव्वद/डॉ.मेघश्री दळवी/३५
अद्भूत पक्षिविश्व/उमेश वाघेला/३६
मना घडवी संस्कार/रविंद्र मांजुलकर/३८
भुऱ्या/प्रा.किरण दशमुखे/३९
एक होतं गाव/संभाजी पाटील/४१
चोरी/धर्मराज माहूलकर /४४
मंग्या/गुलाब बिसेन/४७
चिमुकली भेट/अरूण पाटील/४८
शिक्षितांनो, सुशिक्षित व्हा/अनिल गोरे/५१
नवी दिशा नवे स्वप्न/युवराज माने/५३
वक्त्याचं मानधन /शंकर विभुते /५४



**कवितेचे मानकरी**

डॉ. विनय दांदळे,संजय घाडगे ,विनय पाटील ,राजेंद्र उगले अरविंदा भामरे,एस.पी.जाधव ,साधना श्रीकांत पोहरे,राहूल बावा,गणेश भाकरे ,डॉ.संगीता म्हसकर,राजेंद्र चौधरी

लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

• अतिथी संपादक •
श्री. ०००००

• सह संपादक •
सुभाषदादा कुलकर्णी

• संपादन सहाय्य •
पुणे-रमेश काळे, मुंबई- जयपाल गिरासे, नाशिक-किरण पाटील, सोलापूर-उमेश काळे, औरंगाबाद- रवि गारूडकर, परभणी-युवराज माने, जळगांव- प्रविण माळी, नंदुरबार- तुकाराम धनगर, अमरावती- रूपेश माने,

• मुखपृष्ठ •
सौजन्यः प्रल्हाद सोनार, चित्रलिला

• मांडणी •
लक्ष्मण बडगुजर, प्रगती आर्टस्,शिरपूर.

• कायदेशीर सल्लगार •
ॲड.श्याम पाटील,शिरपूर जि.धुळे

मासिका विषयी ...
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९
नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226
वर्गणी : वार्षिक ₹ ५००, द्विवार्षिक ₹ १०००, त्रैवार्षिक₹ १५००,
संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.
चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com



# नव्या सरकार -सेवकांकडून अपेक्षा

**डॉ.विजय पांढरीपांडे**
हैद्राबाद (तेलंगाणा)

आपल्या देशातील लोकशाहीचा दोन महिन्यांहून अधिक काळ चाललेला महोत्सव (लोकसभा)नुकताच यशस्वीपणे संपला. ह्या अभूतपूर्व महाकाय निवडणुकांच्या आयोजनाबद्दल आपल्या निवडणुक आयोगाचे, तेथील आयुक्तांचे, अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांचे कौतुक करावे तेवढे  थोडेच. ह्या यंत्रणेसाठी राबत्या एकुणच मनुष्यबळांचे स्टॅटिस्टिक्स प्रसिद्ध झाले आहे. एरवी आपण सरकारी जाहिरातींवर टीका करतो. पण नुकतीच प्रसिद्ध झालेली निवडणुक आयोगाची सर्वांचे आभार मानणारी जाहिरात संयुक्तिक वाटते. यथायोग्य वाटते ह्या सर्व यशाची सुरूवात टी.एन.शेषन ह्यांनी केली. निवडणुक पद्धतीत आमुलाग्र बदल झाले. मुख्य म्हणजे शिस्त आली. कार्यपद्धतीत सुनियोजितता आली. बऱ्याच प्रमाणात गैरप्रकारांना आळा बसला. अजूनही बऱ्याच सुधारणांना वाव आहे. त्या यथावकाश होतील अशी आशा करायला हरकत नाही.

आता निकाल लागल्यानंतर नवे मंत्रीमंडळ, नवे सरकार ईंझी. प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या ह्या मोदी-२ सरकारकडून पूर्वी पेक्षा जास्त अपेक्षा आहेत. काही बदल अपेक्षित आहेत. एक प्रतिनिधीक नागरीक ह्या नात्याने ह्या आशा-अपेक्षा व्यक्त करण्याचा हा परखड, सडेतोड प्रयत्न. मोदींची पहिली टर्म ही पहिलट करीण सारखी होती असे आपण समजू या. पण हे मोदींसाठी पहिले बाळंतपण (पंतप्रधानपदाचे) असले तरी बीजेपीसाठी मात्र ते तसे नव्हते. त्यांनी आधी सत्ता अनुभवली होती.

सर्वप्रथम निवडून आलेल्या खासदारांकडून अपेक्षा. मोदी स्वत:ला प्रधान सेवक समजतात. तेव्हा त्यांच्या सहकाऱ्यांनी निवडून आलेल्या जनप्रतिनधींना सेवकां सारखेच वागले पाहिजे. निवडून आल्यावर लोक प्रतिनिधींचे तेवर बदललेले आपण पाहतो. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनुसार ह्यातील बहुतांश मंडळी कोट्याधीश आहेत. आधीच गर्भश्रीमंत आहेत. तेव्हा स्वत:ला सेवक समजणाऱ्या ह्या लोकप्रतिनधीनी लाखोंचा पगार, भत्ते, मेडिकल बिलांची लाखोतली रक्कम, कार, ऑफिसखर्च, रेल्वे, विमान प्रवासाच्या फुकटच्या सवलती ह्यापैकी काहीही घेऊ नये. ५४२ मंडळींना ह्या सर्व लाभांपोटी मिळणारी येत्या ५ वर्षासाठीची हजारो कोटीची रक्कम ही गरीब शेतकऱ्यांसाठी त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आरोग्यासाठी खर्च करावी. देशाचे अर्धे अधिक प्रश्न ह्या उदात्त निर्णयामुळे आपोआप सुटतील. संपूर्ण भारतातील जनता ह्या खासदारांना आशीर्वाद, दुवा देतील. शिवाय जगासाठी एक आदर्श निर्माण होईल.

ह्या निवडून आलेल्या प्रतिनिधीपैकी अनेक जण बाहुबली आहेत. अनेकांवर कोर्टात केसेस चालू आहेत. पोलिस ठाण्यात गंभीर तक्रारी आहेत. स्वच्छ कारभाराचा आदर्श घालून द्यायचा असेल तर मोदी सरकारने हे सर्व खटले, ह्या सर्व केसेस ताबडतोब प्रायोरिटीने निकालात काढाव्या. त्यासाठी स्पेशलल कोर्ट, स्पेशल न्यायाधीश नियुक्त करून ह्या मंडळींना आपले निरपराधित्व लवकरात लवकर सिद्ध करण्याची अन् उजळ माथ्याने जगण्याची संधी द्यावी. जे दोषी ठरतील त्यांची ताबडतोब हकालपट्टी करावी.

देशापुढील महत्त्वाचे प्रश्न हे कृषी (शेतकऱ्यांच्या समस्या, उत्पन्न, लागवड, वितरण), शिक्षण (शालेय, उच्च,व्यावसायिक, खाजगी), आरोग्य (कुपोषण, बालकांचे आरोग्य, महिलांच्या समस्या, वृद्धांचे प्रश्न, गंभीर आजारांचे खर्च), पर्यावरण, उर्जा, दळणवळण ह्या क्षेत्रांशीच संबंधित आहेत.

कृषी संबंधीचे प्रश्न अन शेतकऱ्यांच्या समस्या ह्यावर तात्पुरता नव्हे तर स्थायी उपाय शोधण्याची गरज आहे. सगळा दोष दुष्काळाला म्हणजे निसर्ग प्रकोपाला देऊन चालणार नाही. कारण निसर्गाची नासधूस, काँक्रीट जंगल, जंगलतोड हे सगळे आपणच केले आहे. कृषी क्षेत्रातील निवडक (खऱ्या अर्थाने जाणकार) तज्ञ अन् कृषी विद्यापीठातील संशोधक, यशस्वी प्रयोग राबविणारे सुशिक्षित जाणकार शेतकरी ह्यांचीच समिती ताबडतोब स्थापून त्यांच्याकडून केवळ उपायच नव्हे तर कृती आराखडा तयार करवून घेतला पाहिजे. नंतर त्याचे नियोजन नीट होते की नाही हे बघण्यासाठी व्यवस्थेवर नियंत्रण ठेवले पाहिजे. एरवी सरकारचा पैसा खूप खर्च होतो-कागदोपत्री अन अहवालात दाखविण्यासाठी. पण प्रत्यक्षात परिणाम मात्र शून्य दिसतात. प्रत्येक क्षेत्राचे नियमित कडक ऑडिट हवे. जबाबदार व्यक्तींना जाब विचारायला हवे अकाऊंट बिलीटीमध्ये स्पष्टता हवी. हे आमचे काम नाही, हे आमच्या क्षेत्रात नाही अशी चालढकल, सावळागोंधळ निर्माण करणारी परिस्थितीच नको. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्यांचे आर्थिक प्रश्न त्यांना मिळणाऱ्या सवलती, त्या सवलतींची

उपयुक्तता, मधली दलाली ह्या सर्वांचा एकत्रित शास्त्रशुद्ध अभ्यास करून तोडगा सुचविण्यात यावा. शार्ट टर्म (१ वर्ष, ३वर्ष) लाँग टर्म (५ वर्ष, १० वर्ष) असे कालबद्ध नियोजन करावे. हा रोडमॅप कार्यान्वित होतोय की नाही, त्यात त्रुटी दिसल्यास दुरूस्ती, नवे उपाय अशी ॲक्टीव्ह, जिवंत, रिझल्ट ओरिएंटेड यंत्रणा निर्माण व्हावी.

दुसरे महत्त्वाचे शिक्षण क्षेत्र इथे शालेय शिक्षणापासून तर उच्चशिक्षणापर्यंत व्यावसायिक शिक्षणापासून तर खाजगी, स्वायंत्त विद्यापीठांपर्यंत, संस्थापर्यंत सगळीकडे फक्त सावळागोंधळ आहे. ह्या सर्व क्षेत्रात फक्त संख्यावाढ झाली. गुणवत्ता, दर्जा त्याच प्रमाणात किंवा जास्त प्रमाणात खालावल्या गेली. काही अपवाद सोडल्यास सरकारी शाळांची अव्यस्था अतिशय वाईट आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या श्री.हेरंब कुलकर्णी ह्यांच्या पुस्तकातून ती बऱ्याच प्रमाणात अधोरेखित झालीय. त्यामुळे पुनरूक्ती नको. सरकारने शालेय शिक्षणावर गांभीर्याने भर द्यायला हवा. शाळेसाठी उत्तम नव्हे सर्वोत्तम शिक्षकांचीच नेमणूक हवी. दारू पिणारे, गैरहजर राहणारे बेजबाबदार शिक्षक नकोत. आजकाल इंटरनेट, संगणक ह्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण देणे सहज शक्य आहे. एका ठिकाणचा चांगला शिक्षक भारतभर पोहचविणे (इंटरनेटद्वारा) सहजसाध्य आहे. अगदी परदेशातील लेसन्स सुद्धा संगणकावर अन् पर्यायाने मोठ्या पडद्यावर उपलब्ध करता येतील (उदाहरणार्थ खान ॲकेडेमीचे धडे). परभाषेतील हे धडे मातृभाषेत डब करणे सुद्धा शक्य आहे. पाश्चात्य चित्रपट डब करणे सुद्धा शक्य आहे. पाश्चात्य चित्रपट डब करून आपण आपल्या भाषेत बघतोच की तसेच हे शालेय शिक्षणात खाजगी (इंटरनॅशनल,कॉन्व्हेन्ट) संस्थांनी जो आर्थिक लुटीचा धुमाकूळ घातलाय त्यावर सरकारचे कडक नियंत्र असणे गरजेचे आहे. आता प्रत्येक राज्याच्या वेगळ्या समस्या आहेत. शिक्षणशुल्कांचे आगळे वेगवेगळे आहेत. पण त्यासाठी समान धोरण का राबवू नये? आजकाल इंजिनियरींगच्या शिक्षणाची वर्षाची फी १ लाख रूपये तर के,जी, किंवा क्लास वन शाळेची फी दोन अडीच लाख रूपये (वर्षाला), अशी विरोधाभासाची परिस्थिती आहे. ह्या खाजगी संस्थांनी अनेक एकर जागा घेऊन मोठमोठे एअर कंडीशन्ड इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करून ठेवले. पण त्या थंडगार इमारतीतील खोल्यातील शिक्षण अन् ते देणारे शिक्षक हे खरेच दर्जेदार आहेत की नाही, तेच सगळे शिक्षण कमी (परवडण्यालायक) दरात देणे शक्य आहे की नाही ह्याचा विचार व्हायला हवा. त्यासाठी कायद्यानेच नियंत्रण हवे. अनेक बाबतीत कायदे असतात पण कागदोपत्री, फायलींपुरते उदाहरणार्थ सर्व शिक्षण संस्थांना आपला वार्षिक ताळेबंद-जमाखर्च, वेब साईटवर टाकणे बंधनकारक असते. पण कुठल्याही शिक्षण संस्थेच्या वेबसाईटवर ही माहिती उपलब्ध नसते सरकारही जाब विचारत नाही. त्यामुळे ह्या खाजगी शिक्षण संस्थांच्या माफियांचे फावते.

उच्च शिक्षणाच्या दर्जाची घसरण हा देखील चिंतेचाच विषय. जागतिक स्तरावर आपली विद्यापीठे खूप मागे आहेत हे दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या मानांकनाच्या यादीतून दिसतेच आहे. साधी राज्यस्तरावरील विद्यापीठे तर सोडाच पण नामांकित आय.आय.टी. सारख्या संस्थादेखील त्यांच्याच ७०-८० च्या दशकातील दर्जाच्या तुलनेत खूप मागे पडल्या आहेत. दर्जेदार प्राध्यापकांच्या नेमणुकाच होत नाहीत वर्षानुवर्षे राज्यस्तरीय विद्यापीठांना तर प्राध्यापकांच्या मान्यता प्राप्त जागा भरण्यासाठी सुद्धा सरकार (आर्थिक बोजाच्या कारणामुळे) परवानगी देत नाही. नेमणुकातील (कुलगुरू, डायरेक्टरच्या पदापासून तर अधिकारी-कर्मचारी पदांपर्यत) भ्रष्टाचार वाढला आहे. प्राध्यापकच चांगले नसतील तर शिक्षणाचा दर्जा कशाच्या भरावशावस सुधारणार? दर्जेदार संशोधन कसे होणार? आपल्याकडील संशोधन (इथेही काही निवडक सन्माननीय अपवाद सोडल्यास) किती खालावले आहे. ह्याची लक्तरे आंतरराष्ट्रीय जर्नलस्मधून प्रसिद्ध झाली आहेत. इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंगचे आधुनिक दर्जेदार संशोधन प्रसिद्ध करणाऱ्या आय ट्रिपल ई ह्या संस्थेने तर कॉपीबहाद्दर प्राध्यापक संशोधकांची यादीच प्रसिद्ध करणे सुरू केले आहे. अन् त्यात भारतीय बहाद्दरांची संख्या लक्षणीय आहे.

नुकतेच यु.जी.सी.ने देशातील सर्व विद्यापीठातील गेल्या दहा वर्षातील पीएचडी चे संशोधन प्रबंध तपासण्याचा निर्णय घेतला आहे. प्रश्न असा आहे की जर ऐंशी टक्के प्रबंध हे दर्जेदार नव्हती, किंबहुना पदवी प्रदान (दान) करण्याच्या लायकीचेच नाहीत हे सिद्ध झाले तर यु.जी.सी.ह्या पदव्या परत घेणार आहे का? तसेच ह्या पदव्यांमुळ— मिळालेल्या नोकऱ्या, लाभ हे सगळे रद्द करणार आहे का? ते जर शक्य नसेल तर हे दर्जा तपासणीचे नाटक कशासाठी? काही निवडक तज्ञाच्या टी.ए.डी.ए.ची आर्थिक लाभांची सोय करण्यासाठी? भाषा, समाजशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहास, शारीरिक शिक्षण शास्त्र, एवढेच काय तर विज्ञान तंत्रज्ञानातील आपल्याकडील पी.एच.डी.साठी झालेले बहुतांश संशोधन (पुन:सन्माननीय अपवाद वगळल्यास) समाजासाठी, मानवी जीवनाचा जागतिक स्तरावरील दर्जा उंचावण्यासाठी कसल्याही उपयोगाचे नाही. त्याचा उपयोग लग्गा लावून, शिफारस मिळवून कुठेतरी चिकटण्यासाठी होतो एवढेच कटु सत्य कुणाला पटो वा न पटो ।

आपल्याकडील आरक्षण ह्या प्रकरणाकडे देखील नव्याने बघण्याची गरज आहे. संविधानाने दिलेले वंचित समाजासाठीचे

आर्थिक, सामाजिक दृष्ट्या मागासल्या वर्गासाठीचे आरक्षण योग्य आहे हे मान्य पण ते कुठपर्यंत? कुणाकुणासाठी? आजकाल प्रत्येक वर्ग स्वत:ला मागासलेला समजतो आहे. अन् आयोगाच्या अहवालाने ते सिद्ध करवू पाहतो आहे. सगळेच एकेक करून स्वत:ला मागासलेले, दुर्बळ वंचित समजणार असतील तर गेल्या सत्तर वर्षात देशाचा विकास झाला, आपण खूप प्रगती केली हा दावा कसा खरा मानायचा? हा एक पॅरॉडॉक्स, विरोधाभासच म्हणायला हवा. आपल्या समाजात जो जो आर्थिक, सामाजिक दृष्ट्या दुर्बळ असेल, सक्षम नसेल त्या प्रत्येकाला हवे ते (म्हणजे त्याची योग्यता असेल ते) शिक्षण घेण्याचा अधिकार कायद्यानेच द्यायला हवा. मग त्यासाठी जात, धर्म, पंथ काही बघायला नको. आपण माणसांनी माणसांकडे माणूस म्हणूनच बघायला शिकले पाहिजे. त्या दृष्टीनेच सरकारची मानवतावादी धोरणे असली पाहिजे. तरच भारतीय संविधानाचाही आदर केल्यासारखे होईल. समभाव हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा, विचाराचा पाया आहे. उर्जा, आरोग्य अन पर्यावरण हे देखील तितकेच महत्त्वाचे कार्यक्षेत्र आहे. आपण सौर उर्जेचा जास्तीत जास्त प्रमाणात उपयोग करू शकतो. नवी काँक्रीटची जंगले निर्माण करण्यावर कडक बंधन आली पाहिजेत. एक दहा मजली इमारत, त्यातील रहिवाशांची संख्या लक्षात घेता त्यांना किती उर्जा, किती पाणी लागते ह्याचा विचार केलेला बरा. एकाच व्यक्तीने केवळ श्रीमंत आहे म्हणून पैसे आहेत. म्हणून तीन चार घरे घेणे खरंच योग्य आहे का? ह्या संदर्भात विनोबाच्या भूदान यज्ञाची आठवण येते. काय झाले त्या चांगल्या संकल्पनेचे विनोबाच जाणोत. पण उर्जा, पाणी हे सांभाळून वापरायला हवे. सरकारने त्यावर नियंत्रण कसे आणता येईल, नियोजन कसे करता येईल हे प्रायोरिटी ने बघावे. प्रदूषणावर नियंत्रण ठेवल्यानेच पर्यावरणाचे संतुलन राखता येईल. नियम हे पाळण्यासाठीच असतात हे सुजाण, अजान नागरीकांनी समजून घेतले पाहिजे. कधीकधी तर सरकारी अधिकारी, लोकप्रतिनिधीच कायदा मोडतांना आपण बघतो. अशा कायद्याला बगल देऊन स्वत:ची खळगी, भरणाऱ्या, पुढच्या पिढीची सोय करणाऱ्या सेवकांना देखील प्रधान सेवक चाप लावतील अशी नम्र अपेक्षा आहे. सरकारी नोकरीतील पर्मनेंट ह्या शब्दाने देखील कार्यक्षमतेत ढिसाळपणा आलेला आहे. आम्हाला नोकऱ्या हव्यात म्हणून ओरड करणाऱ्या बहुतेकांची मागणी ही सरकारी नोकऱ्या हीच असते. कारण तिथे एकटा चिकटले की कायमची चिंता जाते असा समज आहे. आपल्या व्यवस्थेत अकार्यक्षम व्यक्तीला नोकरीतून काढणे फार कठिण खरेतर अशक्य झाले आहे. त्यामुळे सरकारी क्षेत्रात काम न करताही हजारो, लाखो रूपयांचे मासिक वेतन घेणारे महाभाग खूप आहेत. स्वत: काम करायचे नाही अन् प्रामाणिक व्यक्तीलाही काम करू द्यायचे नाही अशा नतद्रष्टांची संख्या सुद्धा लक्षणीय आहे. त्यामुळे नव्या नेमणुका करतांना पर्मनंट ह्या टप्प्याऐवजी काही पर्यायी विचार करून कार्यक्षमते प्रमाणे वेतन, आऊटपुट प्रमाणे प्रमोशन अशी अडथळ्यांची शर्यत ठेवल्यास एकुणच सरकारी कार्यक्षमता वाढू शकेल. ज्या संस्थेत माझ्या नोकरीची सुरूवात झाली त्या मुंबईच्या टी. आय.एफ.आर. ह्या संस्थेत प्रत्येक पद हे तीन किंवा पाच वर्षासाठीचे होते. प्रत्येक वर्षाला प्रगतीचे मुल्यांकन होते. तीन वर्षानंतर अन् पुढे पाच वर्षानंतर प्रगती समाधानकारक नसल्यास पूर्व सूचना देऊन बाहेरचा रस्ता दाखविण्याची करारातच सोय होती. हे अनेकांना कठोर वाटेल. कडक धोरण वाटेल. पण देश सुधारायचा तर वैयक्तिक सोयी सवलती पेक्षा सामाजिक हिताला, राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावेच लागेल. गुळगुळीत धोरण चालणार नाही. अगदीच आणीबाी देखील नको पण स्वार्थापेक्षाही राष्ट्रहित महत्त्वाचे, देशप्रेम महत्त्वाचे ही सामाजिक, सांघिक जाण मात्र हवी. ती ह्या सरकारच्या आगामी पाच वर्षाच्या काळात वृद्धिंगत व्हावी एवढीच प्रधान सेवकाच्या इतर सेवकांकडून नम्र अपेक्षा.

लेखक संपर्क क्रमांक
०७६५९०८४५५५




अग तुझा काही तरी गैरसमज होतोयं,हे पोटनिवडणूकीत पडलेले नाहीत किंवा या वयात त्यांचा पायही घसरलेला नाहीय.अपघातामुळे त्यांची अशी अवस्था झाली आहे.



# रंगाचे नर्तन

**डॉ.प्रतिमा इंगोले**
दर्यापुर जि.अमरावती

आपण मराठी महिन्यांचा विचार करू लागलो तर सर्वात नाजूक साजूक महिना मग श्रावणच वाटू लागतो. श्रावणाची नजाकत काही आगळीच. तिची सर कुठल्याच महिन्याला नाही. सगळ्या सृष्टी सकट मनामनांची मरगळ धुवून काढणारा श्रावण सगळ्यांचाच सखा बनतो. तो आपल्या रंगाच्या नर्तनाने सगळ्यांची मनं जिंकतो. शहर असो की खेडं श्रावणाची किमया न्यारीच. मदभरी आणि दिलखेचक आता तर 'आती क्या खंडाला' म्हणत तरूणाईतही श्रावणाची मजा लुटायची टुम निघाली आहे. त्यामुळे श्रावणाचे महत्त्व अबाधित आहे.

श्रावणाचं मुख्य लक्षण सृष्टीचा कायापालट. श्रावण काय जादू करतो कुणास ठाऊक पण सृष्टी वयात आलेल्या तरूणीसारखी सुंदर दिसू लागते. तारूण्यात गधीही सुंदर दिसते म्हणतात. खरं तर गधी कुरूप समजून तिचा वापर असा सुंदर गोष्टींचे सौंदर्य खुलविण्यासाठी का करतात कुणास ठाऊक? वास्तविक गाढवापेक्षा जास्त कुरूप प्राणी काय कमी आहेत? पण शेवटी कुरूपता ही आपल्याच दृष्टीत असते. नाहीतर 'दिल लगा गधीपे तो परी क्या चीज है' असे आपण म्हणतोच ना. तिथे गधीच सुंदर वाटते. पण श्रावणाचे तसे नाही. श्रावण खरेच सुंदर असतो. नितांत सुंदर, सृष्टीचं मोहक स्वप्न.

आषाढात सुरू झालेला पाऊस आता घरचाच होऊन जातो. त्याची नवाढ ओढ रूळते. त्यामुळे वात्रट पोरासारखी दंगेखोर वृत्ती जाऊन त्याजागी तारूण्यापूर्वीची कोवळीक दिसू लागते. श्रावणाचा परिसस्पर्श होताच सृष्टी तरारते. बघता बघता जादू झाल्यागत मोहरून उठते. सृष्टीचं हे बदललेलं नवं रूप रंगानी न्हात सर्वांना आल्हाद देऊ लागतं.

श्रावणात आभाळही रंग खेळू लागतं. ऊन पावसाच्या खेळामुळे आभाळात कधी काळे ढग, कधी सावळे ढग तर कधी पांढरे ढग दिसू लागतात. एरव्ही दुर्मीळ असणारे काळ्या पांढऱ्या ढगांची सरमिसळ होऊन दिसणारे मोरपंखी ढग ही श्रावणातच दिसू शकतात. आभाळ कृष्णासारखं रंगात दंग होतं. सृष्टीला राधा समजून तिच्यावर रंग उधळू लागतं. क्षणात तिला ओलेती करतं. तर क्षणात ऊन पाडून चमचम करायला लावतं. श्रावणाची तीच तर गंमत आहे. 'क्षणात येती सरसर शिरवे. क्षणात फिरूनी उन पडे.' श्रावणात आभाळात ढग असतातच. पण सूर्यही खट्याळ होतो. आपला नेहमीचा भारदस्तपणा सोडून लपाछपी खेळू लागतो.

पाऊस आल्यामुळे सृष्टी थेंबांनी न्हाते. काही चुकार थेंब जमिनीवर न पडता झाडांवर, पानांवर, रोपांवर, फुलांवर तसेच राहतात आणि मग त्या सर्वांना स्वर्गीय सौंदर्य प्राप्त होते. साध्या गवत पात्यावर जर असा थेंबांचा ठिपका रेंगाळला तर ते पातंही नववधूच्या भुवईवर लावलेल्या कुंकवाच्या ठिपक्यासारखं मोहक दिसू लागते. म्हणूनच मग मर्ढेकरांना 'दवांत आलीस भल्या पहाटे' असे म्हणावेसे वाटते. भिजलेल्या सृष्टीचं स्वर्गीय सौंदर्य तसं अवर्णनीयच. रेंगाळलेल्या थेंबाच्या ठिपक्यांवर ढगांच्या आडून निघून सूर्यानं कोवळं ऊन पाडलं की, ठिपके हिऱ्यागत चमकू लागतात. कुंदन जडवलेल्या वस्त्रा सारखी सृष्टी शोभू लागते. पण त्यात तारूण्यातली पक्वता नसते. तर बाल्यातील कोवळीक असते. नुकत्याच न्हानलेल्या छोट्या बाळासारखी सृष्टी लाघवी दिसू लागते. नाजूक अलवार आणि कोवळी लुसलुशीत अगदी देवगायी सारखी! पाऊस पडला की, शेताशेतातून मखमली लाल किडे दिसू लागतात. जणू कुंकवाचे ठिपकेच! सौंदर्याची मूस असणारे हे किडे श्रावणापर्यंतच असतात. नंतर दिसेनासे होतात. सृष्टीच्या गर्भादानाचे ते प्रतीक ठरतात. कारण स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत गर्भादानाच्या दिवशी लाल छिटकाव टाकलेले पातळ नववधूने नेसण्याचा प्रघात होता. ते काही असो. पण असे निरनिराळे घटक सृष्टीला सौंदर्यवती करतात हे नक्की त्यात ही लाल मखमली देवगायेही आलीच. हळूवार स्पर्शातून मनावर रोमांच उठवणारी.

दुसरी मोहकता देते ते इंद्रधनुष्य. आपल्या सात रंगांच्या नर्तनातून ते केसात रत्नजडीत दागिना खोवल्याप्रमाणे सृष्टीला खानदानी सौंदर्य प्रदान करते. एखाद्या राजाने खूष होऊन नर्तकीवर हिरे माणके उधळावेत तसे आभाळ सृष्टीवर हे रंगभरे रत्ने उधळते. इंद्रधनूचा तो सप्तरंगी प्रकाश सृष्टीला होळी खेळल्यासारखा रंगवून टाकतो. विलोभनीय करतो. श्रावणानंतर देवगायी नाहिशा होतात. तसेच इंद्रधनुष्यही क्वचितच दिसते. श्रावणाची ती मिरासदारी असते.

श्रावणात बहुतेक फुलांना बहर येतात. त्यांचे सुगंध सृष्टीला न्हाऊन काढतात. श्रावणात केवडा बहरात येतो. दुसरा महत्त्वाचा बहर येतो तो पारिजातकाला. नाजूक मोहक मंद सुगंध असणारी ही फुलं श्रावणात जमिनीवर टपटपतात. जणू आभाळातल्या चांदण्या

धरतीवर उतरतात. पारिजातकाचा सडा वेचू लागलात तर आपलं मनही कोवळं, अलवार होऊन जातं. निबर, राठ मनाला नाजूक,कोमल करण्यासाठीच जणू पारिजातक चांदण्यांच्या रूपात खाली टपटपतो. शेवटी मन हळूवार असणं महत्त्वाचं त्यासाठीच की काय श्रावणात अनेक पूजापाठ केले जातात.

श्रावण हा खास शंकराचा मास. शंकर पुरूषतत्वाचा प्रतिनिधी. त्यामुळे श्रावणात पुरूषत्वाची पूजा चालते. तशीच स्त्रीतत्वाचीही ! कारण श्रावणी सोमवारानंतर लगेच मंगळागौरीचा मंगळवार येतो. श्रावणी सौंदर्याचा मनमुराद आस्वाद घ्यायचा तर त्र्यंबकेश्वरलाच जायला हवे. कारण श्रावणातल्या ढगांचे नर्तन आणि नयनमनोहारीत्व यांची खास जुगलबंदी तिथेच बघायला मिळते. 'ॐ त्र्यंबकम् यजामहे पृष्टीवर्धनम् ' मृत्यूंजय मंत्रातील हा 'पृष्टीवर्धनम् ' शब्द फार महत्त्वाचा आहे.

श्रावणातले देवधर्मही पृष्टीवर्धनासाठीच चालू असतात. त्याद्वारे मनाची निर्मलता साधली जाते. देवधर्माच्या माध्यमातून निसर्गाच्या ह्या अपार दानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली जाते. त्या माध्यमातून श्रावणात सृष्टी जशी टवटवीत होते तसेच मानवी जीवनही टवटवीत केले जाते. निसर्गाची निसर्गाद्वारा ती पूजा असते. म्हणजे सोमवारी बेल फुलं वाहायची, मंगळवारी पत्री केवडा वाहायचा. बुधवारी केणा कुंजीर वाहायचा. गुरूवारी आघाडा कोरांटी वाहायची. शुक्रवारी जिवतीला शनिवारी नरसिंहाला कापसाच्या पेळूंची माळ वाहायची. दुर्वांचे, फुलांचे हार करून वाहायचे. केणा, कंजीर आघाडाच्या पानांच्या माळा करून वाहायच्या. फुलांचे गजरे वाहायचे. कारण ही पूजा भिंतीवर चित्रे काढून केली जाते. आता चित्रांचे कागद मिळतात पण पूर्वी त्यासाठी चूना आणि गेरू वापरला जाई.

श्रावण कृतज्ञता मासही असतो. कारण नागांप्रति, सागराप्रति आणि बैलांप्रति श्रावणातच कृतज्ञता व्यक्त केली जाते. जो जो आपल्या उपयोगी पडतो, त्याच्याप्रति सद्भावना व्यक्त करणे श्रावणच शिकवतो. त्यामुळे मानवी मन धुवून धावून निर्मळ होते. जगण्याला पृष्टी मिळते. सुगंधित फुलांमुळे आल्हाद मिळतो. तर श्रावणातल्या भांड्या व फळांमुळे रूचिपालट आणि ताकद मिळते.

श्रावणात काही खास भाड्या तरारून वर येतात. त्यात महत्त्वाची भाजी असते जिवतीच्या फुलांची. पाऊस पडला की जमिनीत लपून असणारे जिवतीचे खोड पल्लवीत होते. त्याला 'तोर' फुटतात. लांबच लांब वेल वाढून श्रावणाच्या सुरवातीलाच श्रावणा सारखीच नाजुक साजूक पोपटसर रंगाची फुलं येतात. ह्या फुलांच्या झोकाची भाजी करतात. ती स्वादिष्ट भाजी तनामनाला जीवनरस पुरवित कूपाकाटीवर फांदीला बहर येतो. शेताशेतातूनच व रस्त्याच्या कडेला तरोटा निघतो. श्रावण घेवडा तर प्रसिद्धच आहे. ह्या श्रावणी भाज्या आरोग्यवर्धक आणि बलवर्धक असतात.

श्रावणात गुलबासाला बहर येतो. त्याची गुलबाक्षी, पिवळी गर्द फुले श्रावणाला रंगवून काढतात. भरीसभर तेरड्याची जांभळी, गुलाबी फुले सृष्टीला नटवून काढतात. त्यात आता लिलीची भर पडली आहे. लिलीची मोहक फुलेही श्रावणाला खुलवितात. 'तेरड्याचा रंग तीन दिवस' ह्या म्हणीवरून ही फुलं फक्त श्रावणातच असतात हेच सिद्ध होते. ह्याशिवाय श्रावणात फुलणारी रानफुलं तर चिक्कार असतातच पण अनेक औषधींना श्रावण जीवनदान देतो. पुनर्नवा सारख्या वनस्तीचे कंद जमिनीत दडून असतात. श्रावणात त्यांना घुमारे फुटतात त्यावरून त्यांचा शोध घेता येतो.

त्यामुळेच हिरवा रंग हा तर श्रावणाचा स्थायी रंग आहेच. पण इतरही फुलांचे रंग श्रावणाला लाभतात. नजरेला अवाक् करतात. सुगंधी फुले परिसर भारून टाकतात. रंगाचे हे मनोहारी नर्तन श्रावणातला अविस्मरणीय करते. तर रोपांची लवचिकता श्रावणाला नाजुकता प्रदान करते. म्हणूनच रंगाचे नर्तन: नाजूक श्रावण. 'खुले कमान रंगिली, लागे अभायी दिसत शोभे रंगानं वावर, बाया भिजल्या धारात.'

लेखक संपर्क क्रमांक
९८५०११७९६९

## मुखपृष्ठाविषयी थोडेसे...

दिवाळी सणाच्या आपल्या आठवणींना उजाळा दिल्यास आजच्या दिवाळीचा आनंद हरवलेला जाणवतो. आज सारीच कृत्रिमता वातावरणात दिसून येते. कोरडा ठाक आपलेपणा क्षणोक्षणी अनुभवास येतो. बालपणीच्या दिवसातील दिवाळी सणाला सख्खे,चुलत असा भेद न राहता सारेच कुटूंब दिवाळी साजरी करायचे. मामा, आजोबा आपले भाचे नातवांना आनंदाने दिवाळीला आणायचे आणि पूर्ण सुटी न कंटाळता न थकता प्रेम द्यायचे आणि आज मात्र कामाच्या व्यापात पैशाच्या सोंगात नातवांना भाच्यांना आणण्यास कुणा वेळच नाही.

म्हणूनच चित्रकार प्रल्हाद सोनार यांनी मुखपृष्ठावरील चित्राच्या माध्यमातून आपल्या नातवांना घेवून जाणारे आजोबा त्यांचे प्रेम चितारलेले आहे. चित्रकार प्रल्हाद सोनार हे माध्यमिक शिक्षक असून प्रयोगशील चित्रकार आहेत. राज्य राष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मानाचे ते धनी आहेत.

– चित्रकार प्रल्हाद सोनार,९८२२६५१५५१

– संपादक :



# बदामाचे झाड...

**मोरेश्वर बागडे**
कोपरी-ठाणे

आमच्या घराच्या इमारतीला लागून एका सोसायटीच्या कंपाऊंडच्या भिंतीजवळ एक बदामाचे झाड आहे. ते नेमके ,आमच्या हॉलच्या समोर पूर्व दिशेला वीस पंचवीस फुटावर आहे. ते झाड ,माझ्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहे.मला तिन्हित्रिकाळ त्या झाडाचे दर्शन होत असते. हॉलमध्ये असल्यावर अनेकवेळा माझे लक्ष त्या झाडाकडे जातेच जाते.त्या झाडाकडे पहात अनेक संकल्पांना मी आयाम दिले आहेत.ते बदामाचे झाड रोज उगवत्या सूर्य नारायणाचे स्वागत करत असते पूर्वेकडून उगवणा-या सूर्याच्या कोवळ्या कोवळ्या प्रकाश किरणांमध्ये दररोज न्हाऊन निघण्याचा पहिला मान त्या बदामाच्या झाडाचा. उरलासुरला प्रकाश नंतर ते आम्हाला देणार.त्या झाडाच्या अंगाखांद्यावरुन सुर्याची किरणे आमच्यापर्यंत येताना त्या झाडाचा डामडौल पाहण्यासारखा असतो.त्याची फांदी न फांदी आणि पान न पान सूर्यकिरणांच्या प्रकाशाने लखलखत असते. काही लालसर पाने तर तांबुल सेवन केल्यासारखी लालचुटूक होतात .झाडावरच्या त्या पानांच्या हिरव्या व तांबसर लाल रंगाला सूर्यकिरणांमुळे आकर्षक झळाळी आलेली असते. तो तेज:पुंज ऐश्वर्यसंपन्न वृक्ष चराचरात वास करणाऱ्या ईश्वरशक्तीची प्रचीती मला दररोज देत राहतो..माझी सकाळ न चुकता त्या अनोख्या प्रसन्न नजराण्याला हात जोडून सुरू होत असते.

बदामाच्या झाडाच्या फांद्या बहुतकरून वेडेवाकड्या वाढत नाहीत .मधल्या मुख्य खोडापासून त्याला डाव्या व उजव्या बाजूला फांद्या फुटतात.कवायतीला हात लांब कराव्यात तशी फांद्यांची वाढ होते.बदाम फळांच्या अनेक प्रसूत्या मी पाहिल्या आहेत.फळे यायच्या अगोदर ते झाड पानांनी इतके गच्च फुलत असते की त्याच्या फांद्यांचा मागमुस सुध्दा लागत नाही.गर्भवतीसारखा पुष्टपणा त्या झाडाला लपेटलेला असतो.सुरूवातीला बिट्टीच्या आकाराची पोपटी रंगाची फळे डोके वर काढतात.ह्या फळांचे गेंदच्या गेंद पानाआड लगडलेले असतात.नंतर जसजशी फळांची वाढ होत जाते तस तसे बदामफळांचे घोष स्पष्ट दिसायला लागतात.बदामफळांच्या लोभाने चिमण्या,कावळे,खारकुंड्या ,कोकिळ,साळूंक्या व हिरवे रावे यांची ये-जा त्या झाडाच्या अवतीभवती दिसायला लागते. इतरवेळी मात्र कावळ्या चिमण्यांशिवाय कोणी फिरकत नाही. बदाम फळाचा बहर सुरू झाला की हे सारे जीव त्या झाडाच्या भोवताली पिंगा घालायला लागतात . पोपटी कोवळी फळे खाऊन भूक भागल्यावर खारकुंड्या त्यांच्या शेपटीचा गोंडा खुषीत तु-यासारखा फुगवून सर्ररदिशी जमिनीवर धाव घेताना दिसत..ते झाडही आपल्या सृजनाचा मेवा त्या गोजिरवाण्या जीवांना मनसोक्त खाऊ देत असते.जशी गाय आपल्या वासराला तीचा पान्हा मुक्तपणे लुचू देते. तृप्त होऊन हवेत झेपावताना त्या पाखरांच्या पंखांची फडफड ऐकून ते झाड सुखाने डोलायचे. त्या डोलणाऱ्या झाडावरून येणाऱ्या वा-याच्या अनेक झुळूका माझ्या मनाला प्रसन्नतेचा गारवा देउन गेल्या आहेत.

सर्वसाधारणपणे विणीच्या अगोदर दरवर्षी कावळा कावळीण त्या झाडावर हमखास घरटे बांधणारच. साधारण एप्रिल अखेरीस त्यांची शाकारणी सूरु व्हायची..कोठून कोठून काड्या ,तारा,धागे व दोरे शोधूनआणलेले असायचे आणि ही सगळी सामुग्री निवडक असायची. मे च्या अखेरीस त्यांचे घरटे तयार व्हायचे. घरट्याची जागा पाऊस किती पडणार याचा अंदाज घेऊन त्यांनी पक्की केलेली असायची. पाऊस कमी पडणार असेल तर झाडाच्या ऊंचावर घर बांधणार. जास्त पडणार असेल तर मध्यावर शाकारणी व्हायची. यावर्षी त्यांनी जमिनीपासून वीस फुटावर झाडाच्या मध्यावर घरटे बांधले होते.मधले खोड व त्याला फुटलेल्या फांदीच्या बेचकीत त्यांनी घरटे बांधले होते.त्यांच्या घरटे शाकारणीच्या पध्दतीवरुन यावर्षी पाऊस खुप होणार अशी अटकळ होती..जूनच्या पहिल्या आठवड्यात पाउस काही सुरु झाला नाही. हवामान खाते मात्र पावसाळी ढग, मौसमी वारे ,हवेच्या दाबाचे पट्टे यांचे वर्तमान सांगून ,मोसमी पावसाच्या आगमनाची वर्दी पटवून देत होते.ज्येष्ठ संपत आला तरी पावसाचे नाव नव्हते.

चांगले आठवत आहे, जुलै मधील पहिल्या सोमवारची सायंकाळ होती.अचानक आकाशात काळे ढग जमु लागले.सगळ्या आसमंतावर काळ्या काळ्या मेघवर्णाची छाया दाटू लागली. सर्व झाडे इमारती व चाळी काळपट दिसू लागल्या.सगळ्या वस्तुंना काळी छाया लपेटली होती. कावळे,चिमण्या व कबूतरे ही पाखरे कसल्यातरी भयाने इमारतींचे सज्जे,ग्रिल्स,खिडक्या यांच्या

आधाराला येऊन भेदरून चिडीचूप बसली होती. हळूहळू वाऱ्याचा वेग वाढू लागला त्याच्या आवाजाची गाज वाढू लागली.त्याचा सोसाटा इतका भडकला की झाडे हलू लागली ,कलू लागली .चाळींवरची निळी ,पिवळी व सफेद मेनकापडे विस्कटून वर ऊडू लागली,त्याच्यावर ठेवलेले दगड,गोटे व विटा गडगडत बाहेर पडायला लागल्या.आकाशातही ढगांची आदळ आपट प्रचंड वाढली. सोसाट्याच्या वा-याचा आवाज व ढगांचा कर्णकर्कश्श गडगडाट अतिवृष्टीचा संकेत देत होता.समोरचे बदामाचे झाड मुळासकट गदगद हलू लागले.पिशाच्च लागल्यावर झपाटलेला बाईमाणूस मानेला हिसडा मारत जशी हलतात तश्याप्रकारे त्या बदामाच्या झाडाचे थैमान सुरू होते.विजेचा कडकडाट सुरू होऊन पाऊस सुरु झाला,पाण्याच्या थेंबाचा स्पर्श मातीला होताच मातीने आपल्या ऊदरातली मृदगंधाची कस्तुरी आसमंतात उधळली.तो वास मनाला सुखावतो न सुखावतो तोच पावसाचा आवेग वाढला .धो धो कोसळणाऱ्या पावसाने व सुसाट रोरावणा-या वा-याने तो मृदगंध कोठे जिरवला कोण जाणे!झाडांचा पिंगा अजून चालू होता. जोराच्या हवेमूळे कधी नव्हे ते पावसाचे तुषार हॉलमध्ये यायला लागले. हॉलचे स्लायडींग शटर लावून घेतले. घुमत असलेल्या बदामाच्या झाडाची काचेतून दिसणारी काळी छाया मला सतावू लागली.आज हे झाड कोसळणार बहुतेक !या विचाराने मन विषण्ण झाले.बाहेर मुसळधार पाउस व सोसाट्याचा वारा यांच्या मस्तीची स्पर्धा लागली होती ,दोघेही आपली रग वातावरणाला दाखवत होते ,त्यात कमी नको म्हणून विजेने कडकडाटाचे आसूड ओढायला सुरुवात केली.अनामिक भयाने सारे वातावरण भरून गेले.इतक्यात भयंकर डरकाळी फोडत विजांचा कडकडाट झाला आणि लाइट गायब झाली.ते कृध्द झालेले वातावरण दाट काळोखाच्या पडद्याआड आपले तांडव सुरु ठेवून होते.त्या भयाण सायंकाळी निजानीज होउन रात्र सरली व सकाळ झाली, तेव्हा विजांचा आक्रोश व वा-याचा जोष कमी झाला होता. मात्र पावसाचा आवेग काही ओसरला नव्हता ,मुसळधारा कोसळतच होत्या.उठल्या उठल्या बदामाच्या झाडाची खबरबात घेण्यासाठी हॉल ची विंडोशटर सताड उघडली.तो वृक्ष जसाच्या तसा ताठ उभा पाहून मनाला उभारी आली. आश्चर्य म्हणजे कावळा कावळीने बांधलेले घरटेही झाडावर शाबुत होते. तळहाताएवढ्या त्या जाडसर पानांनी ते घरटे फोडासारखे जपलेले दिसले. बदामाचे झाड त्याच्या तळहाताएवढ्या जाडसर पानांचा पर्णसंभार मुसळधार पाउस सहजपणे सोसतो. मुसळधार पाउस सतत चार पाच दिवस कोसळत राहीला.हळूहळू तो राज्यभर पसरत गेला. मुंबईत कामासाठी जाणाऱ्यांचे त्याने पुरते हालहाल केले.कधी नव्हे ते त्याच्या सतत कोसळण्याने पाण्याचा निचरा व्हायचा थांबला. सोसायट्यांचे आवार,बाहेरचे रस्ते ,गल्लया,चाळी व झोपड्या सर्व सर्व त्याने जलमय केले. बदामाच्या झाडाची गळलेली जाडसर पाने चेंबरवर साचून राहत त्यामुळे समोरच्या सोसायटीच्या लोकांना ढोपरभर पाण्यातून जावे लागत होते. पावसाळा असला म्हणून काय त्याने रोज व सतत पडावे का?सगळेजण तो केव्हा विश्रांती घेतो याची अक्षरशः वाट पहात होते.

गच्च पानांच्या गर्दीआड वसलेले ते घरटे मी न चुकता रोज न्याहाळत असे.एकदिवशी सकाळी मला त्या घरट्यात बारीक हालचाल दिसली.काहीतरी गुलाबी रंगाच्या काड्यांसारखे दिसत होते. नजरेला ताण दिला तर दोन कावळे वरच्या एकावर एक असणाऱ्या फांद्यावर बसलेले दिसले.माझे कुतूहल वाढले मी नजर ताणली ,वरच्या फांदीवर बसलेला तो कावळा चोचीत काहीतरी घेउन अगदी घरट्याच्या वर बसला.त्या घरट्यातून गुलाबी चपटसर दोन चोची आ करताना दिसल्या .त्यांनी आ करताच त्या कावळ्याने चोचीतून आणलेले पदार्थ त्या कोवळ्या लालगुलाबी चोचीत सोडले.त्या कावळ्याच्या भरवण्यात एक स्त्रीसुलभपणा पाहून ती बहुतेक कावळीन असावी असा मी तर्क केला. तिचं भरवून झाल्यावर तेथूंन ती उडाली.वरच्या फांदीवरचा कावळा हलकेच खाली आला .त्याला पाहताच घरट्यातल्या कोवळ्या चोचींनी तोंड उघडले.त्या कावळ्याने आणखी चारा त्या पिल्लांना भरवला व तो ही उडून गेला. त्या पाखरांचा तो प्रापंचिक सोहळा मनोहारी होता .कुटूंबवत्सलतेचा गुण पाखरे निसर्गाकडून शिकतात. कावळ्यांच्या त्या छोट्याश्या घरट्याने त्या बदामाच्या झाडाला त्यांचे मालक बनविले होते.छान पारिवारीक वातावरण त्या झाडाने सहज स्वीकारले होते.ते नित्य प्रासादिक दृश्य अमूल्य आनंदाचे क्षण माझ्या ओंजळीत टाकत होते.

आनंद असो वा सुख असो ते आळवावरच्या घरंगळणा-या थेंबासारखे असते.ऑफिस करून सायंकाळी घरी आलो.घरात शिरल्यानंतर शारीरिक क्रियाकर्म उरकली आणि नेहमीच्या सवयीनूसार हॉलमधले विंडोशटर उघडले.झाडाकडे दृष्टी टाकली आणि एकदम गलितगात्र झालो.केशवपन केलेल्या विधवेसारखी झाडाची अवस्था झाली होती..सौंदर्याच्या सर्व खुणा अमानुषपणे छाटल्या होत्या.फांदीफांदीवर कु-हाडीने वार करून त्या झाडाचे सर्व अवयव छाटून काढण्यात आले होते.झाडाचे मधले खोड ठेवून बाकी छाटणी करुन थोटे करण्यात आले होते.मला प्रश्न पडला त्या झाडावरचे घरटे आणि आतील पिल्लांचे काय केले असेल? एखादा कुहाडीचा घाव त्यांना होत्याचे नव्हते करण्यास पुरेसा होता.काय झाले असेल त्या कोवळ्या जीवांचे?त्या पाखरांच्या आईवडिलांना त्यांच्या पिल्लांसह दुसया ठिकाणी हलवायला अवधी मिळाला असेल का?माणूस किती नीच आहे आहे ,याची जाणीव झाली

.पानांचा कचरा होतो व पाण्याचा निचरा होत नाही म्हणून तुम्ही अशी अमानुष कत्तल करणार?मग कशाला झाड लावायचे व वाढवायचे?निदान त्या घरट्यातल्या पिल्लांचा तरी विचार करायला हवा होता ना ? हीच का भूतदया?एक ना अनेक प्रश्न भंडावयाला लागले.निराशतेने मन ग्रासले गेले.माझ्या मनाला प्रसन्नता देणारे बदामाचे झाड मला सांगत होते ,तुम्ही माणसं किती कृतघ्न आणि स्वार्थी आहात?त्याचे छाटलेले अवयव त्यावरील ओल्या जखमा दाखवून ते झाड मूक रुदन करत करत म्हणाले,'परवा आलेल्या सोसाट्याच्या वा-यात हा देह पडला असता तर कारणी लागला असता रे! तुम्हा लोकांसाठी मी वा-या पावसात ताठ उभा राहिलो.उपकारांची चांगली परतफेड करते हो तुमची मानव जात!मी निरुत्तर व निशब्द झालो.मुंढे झालेले ते झाड बेढब दिसत होते ,त्याचे विकृत रूप माझ्याच्याने पाहिले जात नव्हते.मला प्रश्न विचारायला निदान ते झाड तरी अस्तित्वात होते.पण त्या चिमण्या पाखरांच्या अर्भकांचे काय? माझी झाडाझडती करण्यासाठी त्यांचे तर कोणीच दिसत नव्हतें.ते झाड माझा आता तिरस्कार करायला लागले आहे. हल्ली रोज झाडाकडे पाहताना मला अपराध्यासारखे वाटते.कावळ्याचे एक जोडपं आताशा त्या झाडाच्या खोडाच्या बेचकीत बराच वेळ चोचीने ऊस्कडपास्कड करताना दिसते.ते .करूण दृश्य पाहताना डोळ्यांत आसवे दाटून येतात......असे घाव व विस्कटणे कोणाच्याही नशिबी नको रे देवा!!

लेखक संपर्क क्रमांक
८९०८४३९९९९


# श्री एकवीरा देवी व रेणुका माता मंदीर ट्रस्ट



रजि. नं. २०० अ / १९५५ महाराष्ट्र, धुळे

या देवी सर्वभुतेषु शक्तिरुपेण संस्थितः । नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।।

**तमाम भक्तांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..**

**एकवीरा देवीस दिलेली देणगी आयकर**

सवलतीस पात्र क्र.न आआ/तकनीकि/१२एए (१) २०१२-१३/३८९१ दि. २७/२/२०१३ ८० जी ६०/८२/२०१२-२०१३/३८९० दि. २७/०२/२०१३

अंध/अपंगांसाठी व्हील चेअरची सुविधा.. मंदीर विकासासाठी सढळ हाताने मदत करा.

| | | |
|---|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र खाते नं. | : | 20110749738 |
| आयएफसीसी कोड | : | MAHB0000348 |
| पॅन कार्ड नं. | : | AVQFSI1226F |
| देना बँक खाते नं. | : | 023110004795 |
| आयएफसीसी कोड | : | BKDN0520231 |

.. विश्वस्त मंडळ ..

श्री. मधुकर वल्लभ गुरव (कार्यकारी अध्यक्ष)
श्री. सदाशिव कालिदास पुजारी (ट्रस्टी)
श्री. मनोहर त्र्यंबकगुरव (ट्रस्टी)
श्री. चंद्रशेखर गुरव (पुजारी)



.. मुख्य विश्वस्त ..

**श्री. सोमनाथ निंबा गुरव**

मो. ९८५०२ ५८४८० / ८३०८८ ६९३३४

श्री. एकवीरा देवीची शोभायात्रा काढणेसाठी १८ फुट उंचीचा संपूर्ण पितळी धातूचा २ घोडे, इष्ट देवी देवतांच्या मूर्ती असलेला पाच टन वजनाचा अष्टकोनी नक्षीदार असा रथ बनविण्याचा निश्चय करून रथ बनविण्याची ऑर्डर दक्षिण भारतात कुंभेकोनम या गावी श्रीराम हॅण्डीक्राफ्टस् यांना देण्यात आलेली आहे. या सर्व कामासाठी सुमारे ३० लाख रूपयांचा खर्च अपेक्षित आहे. तसेच रथ धुळे येथे येईपर्यंत ३ ते ४ लाख रूपये इतका खर्च अपेक्षित



# माया...माझ्या पराभावाचे नाव

**हेरंब कुलकर्णी**
अकोले-अहमदनगर

मला गेली सात वर्षे छळणारे हे नाव. मला लागलेली साडेसाती असे कुणी म्हटले तरीही मला चालेल. मायाला शाळेत टिकवण्याचा प्रयत्न सतत गेली सात वर्षे करतो आहे, पण माया मला काही भीक घालत नाही. मी पुन्हा पुन्हा तिच्यापुढे हरतो आहे. शिक्षणाचा सक्तीचा कायदा तर तिच्या खिजगणतीतही नाही... मायाचा आणि तिच्या नातेवाइकांचा मला संताप संताप येतो... पुन्हा या कार्टीचे नाव घ्यायचे नाही म्हणून मी निर्धार करतो आणि पुन्हा एकदा ती मला कुठेतरी दिसतेच...पुन्हा मी उसने अवसान आणून तिला कुठल्या तरी शाळेत नेतो. पुन्हा ती बाहेर. सात शाळा आजपर्यंत झाल्या, तरीसुद्धा अजूनही ती शाळेबाहेरच आहे... मी ८०० मुले शाळेत बसविल्याचे श्रेय घेतो, पण एका पारड्यात ८०० मुले दाखल केल्याचा माझा शैक्षणिक सामाजिक अहंकार आणि दुसऱ्या पारड्यात मायाला शाळेत बसविण्याचे माझे अपयश. पण तरीही हे मायाचे पारडेच खाली जाते. मला विलक्षण शरमल्यासारखे वाटते.

कुठे भेटली मला ही माया. भेटलीच नसती तर किती बरे झाले असते. सर्व शिक्षा अभियानात काम करायला लागल्यावर वीटभट्ट्यांवर मी फिरायचो. आमच्या गावच्या नदीकाठच्या वीटभट्टीवर माया मला भेटली.

या भट्टीवर काम करणाऱ्या माणसांची मुले शाळेत अपवादानेच जातात. मी तरीही गेलो. विचारले. भट्टीवर चार-पाच मुले खेळत होती.

मे महिना. रणरणते ऊन. समोर नदीचे वाहणारे पाणी. तितक्यात माया नदीतून पोहून तशीच ओल्या कपड्याने माझ्यासमोर आली. वय वर्षे सात. काळ्या कुळकुळीत रंगाची चिमुरडी माया. चेहऱ्यावरून पाणी निथळतानाही डोळ्यांतील चमक आणि चेहऱ्यावरचा आनंदी भाव काही लपत नव्हत... ती परका माणूस बघत झोपडीत कपडे बदलायला पळाली. तिच्यासोबत होता सुरेश. तिच्याच वयाचा सुरेश. तोही ओलाचिंब भिजलेला. नदी घरासमोर वाहत असणे एवढी एकच गोष्ट त्यांना श्रीमंती वाटत होती. सारी गरिबी, दैन्य विसरायला लावायला पुरेशी होती. अतिशय आनंदाने ते पाण्यात खेळत होते.

थोड्या वेळाने सगळी लहान मुले एकत्र केली. शाळेत कुणीच जात नव्हते. भट्टीमालकाला बोललो. तोही जून महिन्यात शाळेत घालायला तयार झाला. पालकही तयार झाले.

मे महिन्यात आमच्या ऑफिसातही फारसे काम नव्हते. तेव्हा मी व माझ्या बायकोने ठरविले, की आपण रोज यांना शिकवायचे. तेवढीच शाळेची तयारी होईल. आम्ही जाऊ लागलो. आमचा मुलगा बरोबर मायाच्याच वयाचा. त्यामुळे तोही येऊ लागला. त्यालाही हे मित्र मिळाले.

पहिला काही वेळ या सर्वांना गोळा करण्यात जायचा. माया आणि सुरेश हमखास पाण्यात पोहत असायचे. पाण्यात अंघोळ करणाऱ्या या गर्दीतून त्यांना शोधून काढणे जिकीरीचे असायचे. आम्हांला बघितले, की दोघेही पाण्यात सूर मारायचे आणि पाण्याखालून पोहत लांब निघून जायचे आणि लांब जाऊन हसायचे. आमची गंमत करायचे. ओरडून कसेतरी त्यांना कडेला आणायचे. कडेला येताना ते आमच्या पाण्याला घाबरणाऱ्या मुलाची गंमत करायचे. त्यांच्या अंगावर पाणी उडवायचे. त्याला कधीकधी पाण्यात ओढायचे. तो घाबरून ओरडला की मोठ्याने हसायचे. त्याला सूर मारून दाखवायचे आणि पाण्याखाली बराच वेळ राहून वर येताना मासा घेऊन यायचे. मासा शोधून आणून दाखविणे हा रोजचाच खेळ होता.

मला त्यांचे कौशल्य बघितले की आपण आपली मुले सुरक्षिततेच्या नावाखाली किती बनचुकी करतो आहोत असेच वाटायचे. आपला मुलगा पोहू शकत नाही आणि ही मुले कुणीच न शिकवता पलीकडच्या तीरावर जातात...माया, सुरेश काठावर आले, की नंतर वीटभट्टीवर आमची शाळा सुरू होणार. सर्वांना पाट्यांवर गिरवायला शिकवायचो. मला खूप प्रयोगशील शाळा बघितल्यावर आता प्रत्यक्ष कार्यवाही करून बघायला मिळत होती. तेव्हा वाचन, लेखन शिकविण्याच्या नव्या नव्या पद्धती मी वापरून बघायचो आणि चक्क ही मुले वाचनाच्या दिशेने प्रगती करायला लागली.

मायाचे कुटूंब म्हणजे एक प्रश्नचिन्ह होते. मायाच्या जन्मानंतर मायाच्या वडिलांनी तिच्या आईला सोडले. आईचे आता हे दुसरे लग्न. मुलाच्या आशेने या नवऱ्याकडून तिला पाच मुली रांगेने झाल्या. मायासह एकूण सहा बहिणी. मायाच्या आईचे वडील याच भट्टीवर कामाला होते. तेव्हा मोठे कुटुंबच तयार झाले होते. हळूहळू

मायाचे आजी, आजोबा, आई, वडील यांच्या कुटुंबाचे प्रश्न लक्षात आले. त्यांना रेशन कार्ड, जातीचे दाखले मिळवून देणे गरजेचे आहे हे लक्षात आले. त्यादृष्टीने काम सुरू केले. कागदपत्रे जमवली. तहसिलदारकचेरीत जमा केली. खूप पाठपुरावा केला आणि एक दिवस तहसिल कार्यालयात कळले, की ती सगळी कागदपत्रे हरवली होती.

माझे तर अवसानच गळाले. तहसिलदारांशी खूप भांडलो. पेपरला बातम्या दिल्या. तक्रार केली. दोन दिवसांत तलाठ्याने सर्व कागदपत्रे गोळा करून रेशनकार्ड व जातीचे दाखले भट्टीवर आणून पोहोचते केले होते. मला आश्चर्यही वाटले आणि विषादही. पेपरला बातम्या आणि तक्रारी केल्यावर इतक्या वेगाने पळणारी ही यंत्रणा या माणसांना एकटे गेल्यावर दारात तरी उभी करील का?

कसेतरी दाखले मिळाले. रेशन मिळायला लागले. मुलांना जून महिन्यात शाळेत दाखल केले. माया शाळेत जाऊ लागली. मला वाटले, चला प्रश्न मार्गी लागला.

पुढे काही दिवसांनी एकदा भट्टीवर गेलो तर भट्टीवर शांतता. मालकाला विचारले, मंडळी कुठे गेली? मालक म्हणाला, त्यांना कोण मालक? तेच त्यांच्या मनाचे राज. गेले असतील कुणीकडे. अनेक महिन्यांनी शोध लागला की ते जवळच्या भट्टीवर आहेत.

तिथे गेलो. खूप बोललो. मायाची शाळा सुटलेली. पुन्हा जवळच्या शाळेत दाखल. असे शाळा बदलणे, भट्टी बदलणे काही थांबेना.

एकावर्षी जून महिन्यातच घरी गेलो. भट्टीवर मायाची आई, बाप, आजी बसलेले. काय करायचे? सरळ मायासह चार मुलींना घेतले आणि आश्रमशाळेत नेले. मायाच्या आईला एकदम चार पोरींची शिक्षणाची सोय झाल्यापेक्षासुद्धा चार पोरींच्या जेवणाची सोय झाल्याचा जास्त आनंद झाला. भार कमी झाल्याचा आनंद चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता.

माया आश्रमशाळेत बंद केल्यावर आता चिंता मिटली असे वाटले. पण तिच्या आजीला भलतेच सुचले. तिने सुट्टी काढून मायाला नवस फेडायला आणले. नवस होता खंडोबाशी लग्न लावायचा. माया लहानपणी आजारी होती. खंडोबाला नवस केला, तेव्हा पोरगी वाचली. तुझ्याशी लग्न लावेन असा नवस आजी बोलली होती. झाले। लग्न ठरले. भट्टीवर लग्नाचा कार्यक्रम. मला निमंत्रण आले. गेलो.

सीन असा. सगळीकडे भंडारा उधळून पिवळेधम्मक झालेले. लहानशी माया नटलेली. तिला साडी नेसवलेली. मायाला काहीच समजतं नव्हते. खंडोबा नवरा म्हणजे काय हे काहीच कळेना. बिचारी खाली मान घालून बसलेली. मला बघितल्यावर तर अधिकच लाजली. लग्न लागले. वऱ्हाड जेवून पांगापांग झाली. आजीला बाजूला घेतले. म्हटले, हा काय वेडेपणा आहे. आजी माझ्यावरच उचकली. म्हणाली, सर, तुमचा नसंल भरवसा. पण आमचं लेकरू खंडोबानं वाचवलंय. त्यानं वाचवलंय. त्याच्याच स्वाधीन तिचं जगणं.

मला एकदम यल्लमादेवी आणि तिथल्या बायकांची परवड आठवली. सर्रकन काटा आला. म्हटले. म्हणजे तिला आता जेजुरीला पाठवणार? हसल्या, म्हणाल्या, सर नाही हो...लेकरू इथंच तर राहणार. बघू पुढचं पुढं.

न जेवताच मागे फिरलो. अस्वस्थ झालो. लहानपणची पाण्यातून सूर मारून मासा काढून देणारी माया डोळ्यांपुढं आली...आज तीच मासा होऊन भलत्याच जाळ्यात सापडली होती.

माया पुन्हा आश्रमशाळेत पण हळूहळू रविवारी घरी यायची. कुठे जागरण-गोंधळाच्या कार्यक्रमाला जायला लागली. आश्रमशाळेत गैरहजेरीच्या तक्रारी वाढल्या. कार्यक्रमात ती हळूहळू नाचूही लागली. लहान मुरळी म्हणून कौतुक व्हायचे. पैसे मिळायचे आणि आजीला आनंद खंडोबाची सेवा करते म्हणून.

मायाच्या हातात पैसा यायला लागला. आश्रमशाळेतून तक्रारी यायला लागल्या. ती जवळच्या दुकानातून गुटक्याख्या पुड्या खाते. इतर मुलींशी अचकट विचकट बोलते. फारच बिनधास्त वागते. सतत मेकअप करते. इतर मुली तिच्यासारख्या नटतात. असल्या अगम्य तक्रारी येऊ लागल्या. मायाही फारशी हजर राहत नव्हतीच. तिच्या इतर तीन बहिणी शिकवा, या तडजोडीवर माया पुन्हा घरी आणली. तिच्या वडिलांशी बोलायला जावे तर ते म्हणायचे, पाच पोरी माझ्या आहेत. त्यांचं काहीभीबी सांगा. पण माया माझी नाहीच. ती पहिल्या बापाची. मी काय करू? तिचं मला काहीबी नका सांगू.

मी गप्प. पुन्हा काही दिवस कुटूंब तालुक्याबाहेर पळाले. सिन्नर तालुक्यात गेल्याचे कळले. अशीच दोन वर्षे गेली आणि एक दिवस मोठी झालेली माया मला दिसली. सगळ्यांचेच अवतारर दोन वर्षात बदलेले. मला कुणी ओळख दाखवेना. गोडीत घेतल्यावर कळले, की माया तिकडे शाळेत गेलेली नव्हती. निरागसताच लोपून ती आता थोराड दिसू लागली होती. माझ्यासमोर मुद्दाम गळ्यातले मंगळसूत्र नाचवत बसली होती.

मी परत फिरलो. आठ दिवसांनी मायाची आई आजी मला शोधत आल्या. घाबरलेल्या. रात्रीची वेळ. मीही घाबरलो. मायाच्या बापाकडे एक सीमकार्ड सापडल्याने मोबाइल चोरीच्या गुन्ह्याखाली त्याला अटक झालेली. पोलिसांअगोदर गावातील माणसांनी बेदम मारलेले. तो बेकसूर असल्याचे त्या सांगत होत्या. त्याचा एक लांबचा नातेवाईक मुक्कामाला आला. त्याच्याकडेच ते सीमकार्ड

होते वगैरे. पोलिसांनाही खरा आरोपी सापडला होता. एका पत्रकारमित्राच्या मदतीने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी दंडाधिकाऱ्याची समज देऊन सोडविले. भट्टीमालकाने वर त्याच्या डोक्यावर हात ठेवला. म्हणाला, बाबा तुला सोडवायला लई खर्च झालाय. आता कामातून फेड...मालकाने पुन्हा उपकाराच्या ओझ्याखाली त्याला दाबला....

आता कुटुंब पुन्हा माझ्याकडे भक्तिभावाने पाहू लागले आणि उपकाराची फेड म्हणून माया पुन्हा शाळेत जायला लागली. पण काही दिवसच.

जंगलात एके ठिकाणी त्यांची शेतजमीन होती. तिथे दूर डोंगराच्या पायथ्याशी जाऊन ते राहायला लागले. एक दिवस बघायला गेलो, तर थक्कच झालो. दूर डोंगराच्या पोटाला झोपडी. एकटीच झोपडी. नजरेच्या टप्प्यात काहीसुद्धा दिसेना. दाट झाडी. शेती कसायला ना बैल ना नांगर. केवळ हातची जमीन अतिक्रमणात जाऊ नये म्हणून राहिलेले. तिथे लाइट नाही की पाणी नाही. जवळच्या एका खेड्यात शाळा होती. मायाला तिथे तरी पाठव म्हणत राहिलो. पण एकटी कशी जाणार, म्हणत टाळत राहिले. पुन्हा माझी गरज लागलीच.

एक दिवस सकाळीच फोन कुठूनतरी दुकानातून लावलेला. रडक्या आवाजात सांगत होते. सर, आपली शेळी वाघाने खाल्ली हो. मी माझा फोटोग्राफर मित्र गोरख घोडकेला घेऊन गेलो. त्या वातावरणात भीतीच वाटत होती. झाडांच्या मधोमध शेळी पडलेली. घरातला माणूस गेल्यावर बसावे तसे रडवेले चेहेरे करून सारे बसलेले...आम्ही फोटो काढला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेतले. वनअधिकाऱ्यांची माणसे पाठवली आणि ३००० रूपये मिळतील असे प्रकरण केले. या भांडवलावर मी पुन्हा दडपण आणले आणि त्याला मायाला शाळेत पाठवायला तयार केले.

माया पुन्हा त्या जवळच्या खेड्यात जायला लागली. त्या कौतुकाने तिच्या स्वागताचा कार्यक्रम केला. ती शाळेत जायला लागली. मी पुन्हा निर्धास्त झालो.

अनेक दिवस पुन्हा भेट नाही. एकदा खूप दिवसांनी मायाचे वडील रस्त्यात भेटले. मी विचारले, शेळीचा चेक मिळाला का...

तो म्हणाला, चेक मिळाला पण पैसे मिळाले नाहीत...

मला कळेनाच, म्हटले म्हणजे ?

तो म्हणाला, वनखात्यात चेक आला, पण ते म्हणाले पैसे जमा करायला बँकेत खातं उघडा. बँकेत गेलो तर ते म्हणाले, रेशनकार्ड पुरावा म्हणून आणा किंवा रहिवासी दाखला..आता जवळ काहीच नाही. तुम्ही दिलेलं कार्ड तेव्हाच हरवलं. तलाठी रहिवासी दाखला देत नाही. त्यामुळे बँकेचं खातं उघडता आलं नाही. यात सहा महिने संपले आणि चेक आता बाद झाला.

मला काही सुचेनाच. शेळी मारल्यावर फोटोग्राफर नेऊन, वनखात्याची माणसे पाठवून, कसेतरी प्रकरण केले आणि त्याचा शेवट हा असा झाला. पुन्हा चेक मिळायला पुन्हा अर्ज करा असे उत्तर आले. पुन्हा पाठपुरावा सुरू...

दरम्यान माया पुन्हा शाळेबाहेर. शेवटी मीच आता शिक्षक म्हणून शाळेबाहेर आलो. म्हटले, चला आता, मीच बघतो कशी शाळेत बसत नाही ते. त्या शाळेकडून दाखला मागवला. तिच्या आईबापाला आात मीच शिक्षक आहे हे पटवले. प्रत्यक्ष शिक्षक म्हणून तिला आता सातव्यांदा शाळेत दाखल केले आणि आता माझ्याकडून जातेय कुठे या गुर्मीत राहिलो.

वर्गात माया यायला लागली. वयाने कमी पण अनुभवाने मोठी .जागरण गोंधळाची कामे करून नजर उघडी झालेली माया त्या लहान पोरींमध्ये रमेना...एक दिवस काही पोरींना तिला त्रास दिला तेव्हा तिने जिवंत उंदराची पिल्ले शाळेत आणली आणि त्या पोरींच्या दप्तरात टाकली. सगळ्या वर्गात हलकल्लोळ. वर्ग सोडून मुली रडत बाहेर आणि जिवंत उंदराची पिल्ले बघायला उरलेली शाळा थेट वर्गात...त्या मुलींचे पालक भांडायला शाळेत...आणि सगळ्यांच्या दृष्टीने माया खलनायिका झाली. पुन्हा काही दिवस शाळेबाहेर..

तिला मात्र जिवंत उंदराची पिल्ले वर्गात आणण्यात काहीच गैर वाटले नव्हते...जिवंत माशांशी लहानपणी खेळणारी ती ...पण मध्यमवर्गीय पालकांनी खूप कांगावा केला. कशीतरी तिला पुन्हा बसवली. पुन्हा तेच. तिची आजी आता वेगळी राहत होती. ती तिला घेऊन गेली. पुन्हा आजीकडे मनधरणी सुरू केली. आजी तिला कधी कामाला पाठवायची, तर कधी नाचायला. ती मुरळी म्हणून वाघे आता त्यांच्या घरी येत. तिचे भावविश्वच बदलले. आजीचे दारू प्यायचे प्रमाण वाढले. आजी, मामा दारू प्यायचे आणि माया रस्त्यावर त्यांच्यासोबत बसलेली दिसायची. कुणाशी बोलायचे ? कुणाला समजावून सांगायचे ? आता माया जीन-पँट, टी शर्टमध्ये दिसू लागली. तिच्याबाबत काही वाईटसाईटही लोक बोलायला लागले. तिचा गैरवापरही होतोय असे कुणी बोलले की कसेनुसे व्हायचे. माझ्या मुलाबरोबर लहानपणी खेळायला येणारी माया समोर दिसायची.

एकदा पुलावर भेटली. सगळे नाते विसरून मला फाडफाड बोलली. म्हणाली, मला नाही शिकायचं. माझा खंडोबा माझं बघून घेईल, तुम्ही मला पुन्हा शाळेचं बोलवायचं नाही, असं म्हणून गेली...

शेवटचा पर्याय कायद्याचा होता. पोलीस स्टेशनला अर्ज दिला. लहान मुलीचा मुरळी म्हणून गैरवापर होतो आहे. ते म्हणाले, प्रत्यक्ष जागरण गोंधळ सुरू असताना आम्हाला सांगा, आम्ही तिथं येऊन तिला ताब्यात घेऊ. मी गप्पच झालो. आता घरात शुभकार्य

असताना कोण आम्हांला कळवणार आणि म्हणणार, की या पोलीस घेऊन आणि बंद पाडा आमचा कार्यक्रम...

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यकर्त्यांनी सापळा लावायचे ठरविले...

एक मधला मार्ग निघाला. मित्र वसंत मनकर व गजेसर वकील. ते म्हणाले तिच्या आईने अर्ज दिला, तर तिची मालकी आईकडे येऊ शकते. कायद्याने हे घडेल. तिचा गैरवापर तर टळेल. रात्रीच्या वेळी वीटभट्टीवर गेलो. आई मासे विकत होती. समोर गिऱ्हाइके. तिला कायदा समजावून सांगितला. म्हणालो, फक्त सही करा. मुलगी घरात...तिचे उत्तर ऐकून पायच गळाले. ती म्हणाली, कशाला तिला इथं आणता माझ्या बाकीच्या पोरी बिघडवायला...ती अचकट विचकट बोलते. शिव्या देते. राहू द्या तिला तिकडेच,

खूप संतापलो, गर्दी जमा झाली. म्हटले, दारूसाठी तिची आजी तिला विकून टाकील. तिला काहीच फिकीर नव्हती...एक आई अशी बोलू शकते हेच मला पटत नव्हते. तिच्या काकाशी बोललो, तर तो दारूच्या नशेत. त्याची पहिली बायको त्याला सोडून गेलेली. दुसरी केलेली. माझ्या सोबत वकील आहे म्हटल्यावर तो त्याचेच दु:ख सांगत बसला. आता काय करावे? अर्ज द्यायला बापही तयार नाही. तो म्हणाला, ती आहे पहिल्या नवऱ्याची, मी कसा अर्ज देऊ?

शेवटी तिचा एक मामा औरंगाबादला असतो, त्याच्याशी बापाने संपर्क केला व कायदेशीर प्रकरणातून सुटका केली. मामा आला व मायाला घेऊन गेला. त्याला फोन केला, तर शाळेत घालतो म्हणाला... मला सुटल्यासारखे झाले. किमान माझ्या डोळ्यासमोरून प्रश्न गायब झाला होता. हे फसवे समाधान तरी आहे.

मी गावात रोज दबकत फिरतो. पुन्हा माया दिसू नये म्हणून आज माया दिसली नाही या समाधानात घरी येतो. पण ती पुन्हा कधीतरी दिसणारच आहे. हे माहीतच होते.

आम्ही गाफिल राहिलो पण तिथून काही महिन्यांतच गुपचुप तिला इथे आणले आणि पुन्हा जागरण-गोंधळ, रात्रीचे लोक येणे सुरू झाले. तिच्या आजीला, मामाला पैशांची चटक लागली होती. ती इथे आल्याची माहिती चार महिन्यांनी मिळाली, हे पुन्हा लक्षात आले, तेव्हा खूप उशीर झाला होता...१३ वर्षांची ती आता पाच महिन्यांची गरोदर होती. ॲबॉर्शन करण्याचा घाबरून प्रयत्न करतील आणि मग आरोपी सापडणार नाही तेव्हा तिला नैसर्गिक रीतीने बाळंत होऊ द्यावे, असे ठरवले. तेव्हा बाळंत होताच पोलिसांना कल्पना दिली. पोलीस सतत बंदोबस्त आणि इतर कामे सांगत राहिले. पण पाठपुरावा व ती तिथे आहे याची खात्री करत राहिलो. बाळंत झाल्यावर तिला खूपच रक्तस्राव झाला. त्यांची झोपडी रस्त्याच्या खूपच आत होती. तिचे नातेवाईक तिला पाठकुळी घेऊन येत होते.

शेवटी एक दिवस सतत पाठपुरावा करून पोलिसांच्यामार्फत तिला ताब्यात घेतले...आम्ही सगळे तिच्या खोपटावर गेलो, तेव्हा ती झोपडीत आत बसली होती. तिच्या आजीने नेहमीप्रमाणे आरडाओरडा केला. तिला वाटले, की आपली नात शाळेत जात नाही म्हणूनच पोलीस आले आहेत. सर्वांना पोलीस स्टेशनला आणले. पोलिसांनी कोणतेच पुरावे नाहीत, म्हणून टाळाटाळ केली,, पण आम्ही पत्रकारांची मदत घेतली आणि सर्व चॅनलवर बातम्या लागल्या. दिवसभर ठळक बातमी झाली आणि लगेच गुन्हा दाखल झाला...माजी आमदार विवेक पंडित येऊन गेले. तेव्हा खूप मोठा सामाजिक प्रश्न यात गुंतलेला असल्याचे लक्षात आले.

मुरळी आता महाराष्ट्रात शिल्लक नाहीत असा शासनाचा दावा आहे. तो दावा खोटा असल्याचे आमच्या या प्रकरणाने उघड झाले. पण प्रकरण इतके गाजूनही शेवटपर्यंत मुख्य आरोपींना अटक झाली नाही. फक्त तिची आजी व जे गोंधळाच्या कार्यक्रमांना न्यायचे ते वाघ्या-मुरळी यांनाच पकडले गेले.

पुढे तिला व तिच्या मुलीला जवळच्या महिला-आश्रमात ठेवले. तिथे सतत भेटायला जावे लागायचे. कारण ती खूप त्रास द्यायची. एकदा तिथून पळून जायचा तिने प्रयत्न केला. सर्वोदय नावाच्या एका जुन्या गांधीवादी संस्थेतल्या त्या महिला कर्मचाऱ्यांचे विलक्षण कौतुक वाटते. इतक्या अल्प मानधनात त्या बिचाऱ्या प्रत्येक मुलीची काळजी घेतात. हिने इतका त्रास दिला, पण त्या सारे सहन करायच्या. एकदा मायाने तिच्याच लहान मुलीचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला. पण त्या संस्थेने तिला जीव लावला. पुण्याच्या एका देशपांडे नावाच्या गृहस्थांनी तिच्यासाठी ५००० रूपये पाठविले.

हळूहळू केस उभी राहिली. माया आजीला भेटायला व्याकूळ झाली होती. आपली आजी आपल्यामुळे तुरूंगात आहे याचे तिला खूप दु:ख व्हायचे. याचा फायदा तिच्या वकिलाने उचलला. त्याने तिला आजीला सोडविण्यासाठी कशी साक्ष द्यायची हे पढविले आणि ती तसेच बोलली. माझ्यावर अज्ञात व्यक्तीने अत्याचार केला, आजीचा काही दोष नाही, असे म्हणाली.

ती असे बोलल्यावर केसच संपली आणि सर्व आरोपी निर्दोष सुटले. मुख्य आरोपी तर फरार होता. आमचा पराभव झाला. आणि तो जिच्यासाठी इतके केले तिनेच आजीच्या प्रेमापायी केला.

मी स्वत: हा एक माझ्या धडपडीचा आठ वर्षे लढून झालेला पराभव मानत होतो. माझ्या पराभवातून एक विषण्णता मनात दाटली होती. स्त्री-शिक्षणाची आकडेवारी सतत सांगताना, सावित्रीबाईचा वारसा सांगताना एका वंचित मुलीला शाळेपर्यंत आणणे..तिला

अत्याचारापासून वाचविणे किती कठीण आहे, हे मी गेली सात वर्षे अनुभव होतो...

एक हताशा आणि निराशा नक्कीच मनात आहे. की आपण पाच वेगवेगळ्या शाळांमध्ये दाखल करूनसुद्धा तिला शिकवू शकलो नाही. पाठपुरावा करूनसुद्धा तिला या अत्याचारातून वाचवू शकलो नाही...

आकडेवारीत साक्षरता शिक्षण मोजताना जेव्हा असे एक एक उदाहरण आपण तपासतो, तेव्हा लक्षात येते की हे आव्हान किती थकविणारे आहे. शिक्षणावर लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष एका एका समस्येला भिडणे किती कठीण आहे ही जाणीव या प्रकरणाने करून दिली. (नावे काल्पनिक)

लेखक संपर्क क्रमांक
९२७०९४७९७१




अतूट नाते    अढळ विश्वास



सर्वेऽपि सुखिनः सन्तु
सर्वे सन्तु निरामयः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चित् दुःख माप्नुयात।।

सहकारात् वर्धते धनम्।
JJSB

भक्ती आणि शक्ती चा संदेश घेऊन येणाऱ्या
दीपावलीच्या मंगल पर्वानिमित्त
सर्व सभासद, ग्राहक आणि हितचिंतकांना हार्दिक शुभ-कामना



जळगाव जनता सहकारी बँक लि., जळगाव
(शेड्यूल्ड बँक)
● मुख्य कार्यालय : 'सेवा' ११७/११९, नवी पेठ, जळगाव. ४२५००१ ● 0257 - 2223699 ● jjsbl_jal@jjsbl.co.in ● www.jjsbl.com
*सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना।*



# विनिता इज नो मोअर...

**विजयकुमार इंगळे**
नाशिक

विनिता इज नो मोअर!... असा मेसेज जेव्हा हॉस्पिटलमधून आला. पूर्ण वाचून व्हायच्या आधीच समर्थनगरमधील परोपकाराची संधी मिळाल्यास तिचा पूरेपूर संधी म्हणून उपयोग करणाऱ्या पवार कुटुंबाला रडू फुटलं. मन आक्रंदलं. हे शक्य नाही. विनीता सॅम्युअल रॉय...! नेहमीच येथील पवार कुटुंबात गेली बारा वर्षे ती वावरत होती. किंबहूना ती या कुटुंबाचाच एक भाग झाली होती. मात्र विनीता सॅम्युअल रॉय आता आपल्यात नव्हती.

ती जन्माला आली, मोठी झाली, खूप शिकली. वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिने बांधलेली जिद्द अखेर पूर्ण झाली. छत्तीसगडच्या शाळेत तिने शिक्षिकेची नोकरी करत ज्ञानदानाच्या कार्यास सुरूवात केली. १२ वर्षे ज्ञानदानाचे काम केल्यानंतर आदर्श शिक्षक म्हणून छत्तीसगड महापालिकेने तिचा सत्कारही केला. परिसरातील सर्वात जास्त शिकलेली ही मुलगी. ज्या परिसरातून ती शिकून सवरून मोठी झाली. त्या परिसरात आता सिमेंटचे जंगल वाढलेय. अचानक मात्र या वाटचालीस कुणाची तरी नजर लागली आणि होत्याचे नव्हते झाले.

नेहमीच्या तिच्या रुटीन जीवनात अचानक वादळ निर्माण झाली. एके दिवशी घरात भांडणे सुरू झाली. रोजच्या कटकटीला कंटाळून तिने दोन मार्ग स्वीकारले, एक तर जीवन संपवावे अथवा घर सोडून जावे. मात्र जगण्याची उर्मी तिला स्वस्थ बसू देत नव्हती. तिने मृत्यूला न कवटाळता आलेले भोग स्वीकारत थेट घरच सोडण्याचा निर्णय घेतला. कुठे जावे, याची काहीही गंधवार्ता मनाशी नव्हती. तिने शेवटी थेट रेल्वे पकडली आणि नाशिक गाठले. मात्र हा प्रवास न संपणारा होता.

नाशिकचे नाव कधीकाळी कुंभमेळ्याच्या निमित्ताने ऐकलेले आणि अनाथांसाठी नेहमीच नाथ होणारे असे हे नाशिक. या शहराला नेहमीच अनाथांसाठी, बाहेरगावाहून आलेल्यांसाठी पंखाखाली घेण्याची पूर्वापार परंपरा लाभलीय. या पंखात तिलाही सावली मिळाली. नाशिकमध्ये आल्यावर पुढे काय ? असा प्रश्न तिच्याही मनात असेल, मात्र एका निवृत्त सैन्यातील अधिकाऱ्याने तिला मुलगी म्हणून स्वीकारले. मात्र ती मायेची उबही फार दिवस लाभली नाही. त्यानंतर मात्र तिची फार हेळसांड न होवू देता नाशिकच्या महात्मानगर परिसरातील नागरिकांचा जिव्हाळा, प्रेम तिला मायेची उब देण्यासाठी सरसावले. मुळातच प्रामाणिकपणाची साथ तिला लाभली... आपली सर्व हकिकत या समर्थनगरवासियांच्या झोळीत टाकली. तिचा छत्तीसगड ते नाशिकचा प्रवास ऐकून मात्र सर्वच अवाक झाले. या परिसरात असलेल्या पवार कुटुंबाने तिला मायेचे छत्र देत जवळ केले. तिला येथील दुकानात कामावर ठेवून घेतले.

आपल्या प्रामाणिकपणामुळे ती लवकरच सर्वांच्या ह्रदयात जावून बसली. निमित्त होते टी.व्ही. दुरूस्त करण्याचे...

अतिशय हूशार असलेल्या विनिता सॅम्युअल रॉय या शिक्षिकेला येथील महानगरपालिकेने आदर्श शिक्षक पुरस्कार देवूनही गौरविले होते. मात्र कौटुंबिक वातावरण बिघडल्याने तिने मागचा पुढचा विचार न करता थेट घर सोडले. कुठे जायचे हे तिला ठाऊक नव्हते... फे तिने रेल्वेत बसून नाशिककडे आली... या काळात तिची परिस्थिती सैन्यदलातून निवृत्त झालेल्या एका अधिकाऱ्याला कळाल्यानंतर त्यांनी दिला आश्रय दिला. आपल्या पोटच्या मुलीप्रमाणे त्यांनी तिला सहारा दिला. मात्र येथेही नियतीने घात केला. या अधिकाऱ्याचे दोन वर्षानंतर निधन झाले. पुन्हा विनीता दु...खाच्या खाईत लोटली गेली. मात्र ती हरली नाही. कुणापुढे हात पसरू नको, असा सल्ला देत या निवृत्त अधिकाऱ्याने तिच्यासाठी समर्थनगरसारख्या उच्चभ्रू वस्तीत फ्लॅट तसेच काही पैशांची व्यवस्था केलेली होती.

या काळात ती कामाच्या शोधातही होती. मात्र अनोळखी बाईला कामावर थेट कोण घेणार ? असाही प्रश्न होताच.

याचदरम्यान विनिताकडे असलेला टी.व्ही. नादुरूस्त झाल्याने ती येथील सतीश इलेक्ट्रॉनिक्स या दुकानात टी.व्ही. दुरूस्तीसाठी आली होती. कदाचित टी.व्ही. हे निमित्त असावे. नियतीने तिची ही वणवण थांबवण्यासाठी हीच योग्य वेळ निवडली असावी. या दुकानाचे संचालक सतीश पवार यांच्याकडे आल्यानंतर त्यांच्या आईने या दु:ख सोबत घेवून फिरणाऱ्या विनीताची चौकशी केली. मात्र या आपुलकीच्या विचारधारेत विनिता माहिती कमी आणि अश्रूच जास्त सांडत होती. मात्र तिला या परिवाराने आधार देत आम्ही तुझ्यासोबत आहोत, हिंमत हारू नकोस.. असा सल्ला देत तिचे दु:ख हलके केले.

या काळात विनिताही कामाच्या शोधात होती. पवार परिवाराने तिला त्याच इलेक्ट्रॉनिक्सच्या दुकानात नोकरी देत तिला जगण्याचे बळ दिले. नव्हे तर आर्थिक स्थैर्य देण्यात मोलाचे योगदान दिले. एक आदर्श शिक्षिका... कुठलाही गर्व नाही... शिक्षणाचा बडेजावपणा नाही... केवळ प्रामाणिक सेवा... आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवायचाच... या भावनेने अनेक वर्षे या परिवाराशी जोडली गेली... दुकानातील कामगार असा विचार न करता या कुटुंबाने तिला आपल्या कुटुंबातच सहभागी करून घेतले. ती आता या कुटुंबाचा एक घटक झाल्याने तिचा वावरही वाढला होता. सुख-दुःखापासून ते किचनपर्यंत सर्वच ठिकाणी तिचा सहभाग या कुटुंबाला आता नवखा नव्हता.

काम आवरल्यानंतर अगदी कुटुंबाच्या सदस्यांसमवेत निवांतक्षणी तासन दोन तास गप्पा मारणारी विनिता... अगदी या कुटुंबाच्या कार्यक्रमांपासून तर सहलीपर्यंत ती सोबतच असायची... मात्र या गप्पांमधून नेहमी तिच्या बोलण्यात एक विषय हमखास असायचा... मला गरिबांसाठी काहीतरी करायचेय... मात्र काय करायचे? याचा निश्चित अंदाज तिला नसायचा... तिच्यातली उर्मी तिला स्वस्थ बसू देत नव्हती.

माझ्या फ्लॅटचाही वापर गरीब विद्यार्थी अथवा वृद्धाश्रमाच्या निमित्ताने झाला तरी मी तो द्यायला तयार आहे... असेही मध्येच ती पुटपुटायची...

याच दरम्यान विनिता आजारी पडली... नाशिकच्या कॉलेज रोड परिसरातील दवाखान्यात तिला भरती करण्यात आले. येथेही या पवार कुटुंबाने तिची सेवा केली. अगदी ती ॲडमिट असतानाही या कुटुंबातील उषाबाई यांनी तिच्यासोबत दवाखान्यात मुक्काम करत तिला आधार दिला. कारण उषाबाईंनी तिला आपली मुलगी म्हणून खूप जीव लावला होता. विनीताही त्यांना आईच म्हणायची... या हॉस्पिटलमध्ये असलेल्या डॉक्टरांना तिच्याकडे बँक बॅलेन्स असल्याचे कळाल्यानंतर अव्वाच्या सव्वा दवाखान्याचे बिल काढून तिच्याकडे असलेले पैसे काढून घेतले. याच ठिकाणी विनीताचे दुर्दैवाचे फेरे सुरू झाले. या आजारपणातून ती अखेरपयरत सावरू शकली नाही. तिच्याकडचे पैसे संपल्यानंतर उषाबाईंच्या डॉक्टर असलेल्या कन्येने तिची खूप सेवा केली. आपल्या क्लिनिकमध्ये नेण्यापासून ते तिला स्वत...च्या हाताने औषधे देण्यापर्यंत नव्हे तर तिला बाथरुमपर्यंत नेण्यापर्यंतची सर्व कामे त्यांनी केली.


घरी, दारी- सगळीकडे झोकून देऊन काम करण्याची वृत्ती या परिवाराने जोपासत या कुटुंब सदस्यासाठी अहोरात्र सेवा केली. मात्र विनीता या आजारपणातून सावरू शकली नाही. ती अंथरूणाला खिळून राहिली. आणि एक दिवस विनिताने या जगाचा अखेरचा निरोप घेतला. या कुटुंबावर कोसळलेले दु...ख खूप मोठे होते. कारण ती या कुटुंबाची सदस्य म्हणून आयुष्याचे पाऊल टाकत होती. विनिताच्या आकस्मिक जाण्याचा फार मोठा धक्का या कुटुंबाला बसला. विनिताच्या आयुष्यात येथील सामाजिक कार्यकर्त्या हेमलताताई बिडकर यांनीही खूप साथ दिली. नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या हेमलताताई उषाबाईंशी बोलताना सामाजिक बांधिलकीसंदर्भात तासन तास बोलत असतात. विनिताचे घर अनाथाश्रम अथवा तत्सम सामाजिक कार्यासाठी उपयोगात यावे, ही उषाबाई आणि हेमलताताई बिडकर यांचीही खूप इच्छा...

येथेही तिच्या नशीबाचा फास सुटला नाही. तिच्या वाट्याला आलेले घर तिच्या जवळच्या नातेवाईकांना मिळावे.. यासाठी या कुटुंबाने पुन्हा तिच्या मूळ छत्तीसगड येथील पत्त्यावर नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. सकाळ माध्यम समुहाच्या माध्यमातून थेट छत्तीसगडपयरत शोधाशोध सुरू झाली. मात्र बारा वर्षात घर सोडल्यानंतर ज्या भागात विनीता आणि तिचे रॉय कुटुंब वास्तव्यास होते, त्या छत्तीसगडमध्ये कमालीचा बदल झाला होता. ती राहत असलेल्या ठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या असल्याने ही शोधमोहिमही थांबली. एका आदर्श शिक्षिकेच्या जीवनातील फास तिच्या मृत्यूनंतर नाशिकच्या सिव्हील हॉस्पिटलपर्यंत पोहोचला. पोलिसांनी बेवारस आणि आकस्मिक मृत्यू अशी नोंद करून मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवला. पवार कुटुंबियांच्या विनंतीवरून पंधरा दिवस वाट पाहिल्यानंतर अखेर या शिक्षिकेचा रॉय परिवाराच्या अनुपस्थितीत मात्र पवार कुटुंबाच्या उपस्थितीत अंत्यविधी झाला. मात्र विनीताचे अनाथ, निराधार लोकांसाठी काहीतरी करण्याचे स्वप्न अखेर अपूर्णच राहिले.

नेहमीच हसमुख असणारी विनिता सॅम्युअल रॉय आज हसऱ्या चेहऱ्यात नव्हती. तर ती निपचित निरागस डोळे मिटून पवार परिवाराला सोडून देवाघरी गेली होती. तिच्या आठवणीने या कुटुंबाने आठवडाभर भूक अनुभवलीच नाही. मात्र विनीता या परिवाराला सोडून दूरच्या प्रवासाला निघून गेली होती. परंतु आजही तिचे मुझे गरीबों के लिये कुछ करके दिखाना है... हे वाक्य या परिवाराला अनुत्तरीत करून गेलेय.

लेखक संपर्क क्रमांक
८८८८९४७९७९

हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले.
Reg No. MAHMAR2015/67226 Mob.8208301001/9850964601



# स्त्री पुरूष समानता आणि विषम आचार

डॉ.शरद घाटे
ठाणे

भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रीपुरूष समानता आणि भिन्न जातीय मानव समानता घटनेतच कायद्याने भारतीय नागरीकांना बहाल करण्यात आली आहे. पण प्रत्यक्षात समाजात अशिक्षित आणि सुशिक्षित सर्व वर्गांतील स्त्री पुरूषांत ही कायद्याने दिलेली समानता धुडकावली जात असून स्त्रियांच्या वाट्याला तर पराकोटीची विषमता आणि अमानवी वागणूक दिली जात असलेली आढळते. स्त्री आजही दुय्यमच का? या प्रतिसाद मधील (आक्टो.२०१२ अंतर्नाद मधील) पत्रावरून सुचलेले काही विचार या टिपणात उतरवले आहेत. वृत्तपत्रांत ज्या बातम्या अगदी २०१९ सालीसुद्धा प्रसिद्ध होत आहेत. यावरून स्त्रीला पराकाष्ठेची अमानवी वागणूक दिली जाते. स्त्रिया आणि पुरूष या दोघांनाही पहिली मुलगी झालेली नको असत. समजा पहिल्या मुलीचा जन्म जरी आनंदाने स्वीकारला तरी तिच्या पाठीवर एकदा किंवा अधिकवेळा मुली जन्माला येणे उभयता स्त्री पुरूषांना नकोशी असतात, असे आढळून येते. काही दिवसांपूर्वी एका सरकारी कार्यक्रमात सुमारे चारशे मुलींचे नकोशी हे ठेवलेले नाव बदलून वेगळे नांव ठेवण्यात आल्याचे वाचनात आले. मुलगा व्हावा म्हणून अपेक्षा असताना मुलगी जन्माला घातली गेली तर तिला नकुशी हे नाव ठेवले जाते. अशा नकुशी नाव ठेवलेल्या स्त्रियांना तू समाजात कोणालाही नकोशी वाटलेस असे आयुष्यभर जाणवत रहायला लावणे हा केवढा मोठा अमानुष प्रकार आहे, हे सांगावयास नको. हळदीकुंकवाच्या कार्यक्रमात नवरा नसलेल्या स्त्रीला सोडून इतर स्त्रियांनाच फक्त कुंकू लावले जाते. ही विषमता स्त्रियाच पाळतात त्यावरून स्त्रियांना नवरा जिवंत असणे म्हणजे सौभाग्य आणि नवरा जिवंत नसणे म्हणजे दुर्भाग्य असे वाटत असते हेच दिसून येते. ती सौभाग्यवती असते. नवरा नसेल तर म्हणजे वारलेला असेल तर तिच्यामागे चुकून सौ. लिहिले गेले तर लिहिणाऱ्याला आणि वाचणाऱ्यालाही धक्का बसतो. (किंवा अपराधी वाटते) आपल्याकडे मुलगी दाखवून तिचे लग्न ठरविले जाते. लग्न ठरविताना एखादीला अनेकांकडून नकार ऐकवला जातो. पत्नी सुंदर पाहिजे एवढीच पुरूषाची अपेक्षा असते. पाहण्याचा वांदे पोह्यांचा कार्यक्रम झाल्यावर घरातील सर्व लहानथोर माणस चर्चा करतात ती नकटी आहे, ती चकणी आहे, ती काळी आहे, गोरी नाही, लूक आहे बारी (सडपातळ) नाही, तिचे दातच थोडे बाहेर आले आहेत. अशाप्रकारची चर्चा होत राहते. मुलगा कसा आहे त्याचा विचार न करता, आपल्या घरात येणारी मुलगी कोणत्या रूपाची आहे याचीच ही चर्चा चालू राहते. तिचा मनमिळावू स्वभाव आहे का, ती विद्यापीठात हुशार म्हणून गणली गेली आहे, अन्यथा नामवंत खेळाडू इत्यादी तिची गुणवैशिष्ट्ये लक्षात न घेता नुसत्या दिसण्यावरून तिला नकार दिला जातो असे दोन तीन नकार ऐकून मुलीचा आत्मविश्वास ढळतो, ती विचित्र वागू लागते अथवा तिला नैराश्य ग्रासते हे लक्षात घेतले जात नाही. लग्न होऊन मुलगी जेव्हा दुसऱ्याच्या घरी आपले घर समजून जाते तेव्हा बरेच दिवस तिला परक्याच्या घरची मुलगी आपल्या घरी आली असे जाणवून देण्यासारखी वागणूक दिली जाण्याची शक्यता असते. तिचे आईवडील, बहीणभाऊ आणि इतर माहेरची माणसे याचे संस्कार जन्मजात अथवा सहवासातून मिळालेले संस्कार, वागण्याची बोलण्याची, विचार करण्याची, कामसूपणाची अथवा आळसाची मंदगतीची आचारपद्धती यावरून तिला बोलणी खावी लागतात. नव्या घरात आल्यावर तिला नव्या घराच्या चालीरीती, नव्या घराच्या माणसांचे बरेवाईट स्वभाव यात तिच्या पूर्वीच्या घरच्या अनुभवांतील बदल समजून घेऊन त्यानुसार आपले वर्तन ठेवायला संधीच दिली जात नाही. घालून पाडून बोलणे, आई-वडिलांच्या नावाचा सतत उद्धार करणे, तिच्या उच्च शिक्षणावरून उणेदुणे बोलणे अशा प्रकारचा मानसिक त्रास दिला जाण्याची काही उदाहरणांत शक्यता असते. सध्या विविध दूरदर्शन वाहिन्यांवरून तरूण मुलींचे-त्यांच्या स्वभावाचे, वर्तनाचे, भांडणांचे, द्वेष मत्सराचे, कारस्थानांचे जे दर्शन घडविले जाते ते वास्तवापासून दूर आणि तरूण मुलींवर अन्याय करणारे असते. तरीसुद्धा घरोघर ते दिवसातील पंधरावीस तास आवडीने पाहिले जाते. त्यांतील अयोग्य आणि अन्याय चित्रण सहन केले जाते. वृत्तपत्रातून उत्साहाने मतप्रदर्शन करून चर्चा केली जाते. आपण शिक्षित आहोत पण सुशिक्षित, विचारी माणसे आहोत असे यावरून मुलीच वाटत नाही. मुलगा होणे अथवा मुलगी होणे याला शास्त्रीय दृष्ट्या पुरूष (म्हणजे बाप) जबाबदार असतो. असे असूनही एकापाठोपाठ दोन तीन मुलीच जन्माला घातल्याबद्दल स्त्रीलाच दोषी ठरविण्यात येते. मुलगी ही परक्याचे धन मानून माहेरची माणसे लग्नानंतर मुलीला दुरावतात.

सासरी तिचा मानसिक छळ होतो आणि वेड लागणे आत्महत्या यासारखे परिणाम होऊ शकतात. हे लिहिले हे संपूर्ण समाजाचे चित्र नाही. समाजात सु शिक्षित सु संस्कृत संवेदनशील माणसे अथवा कुटुंबे आहेत. त्यांनी मी चित्र रंगविले त्याबद्दल क्षमा करावी.

हे टिप लिहिण्याचा वेगळाच हेतू आहे. आपण आपल्या समाजातील कुटूंबांचे सुशिक्षित आणि अर्धशिक्षित अथवा अशिक्षित असे वर्गीकरण करत असतो. पण माणूस सुशिक्षित झाला म्हणजे विचार करून निर्णय घेतो अथवा त्याचे मतपरिवर्तन होते असे म्हणता येत नाही. बुद्धीला आवाहन करून माणसे बदलत नाहीत आणि म्हणूनच मानवजात शहाणी होत नाही. सामाजिक बदल मंदगतीने होण्यास मेंदूची विशिष्ट कार्यपद्धती कारणीभूत आहे. (संदर्भ - लोकसत्ता मंगळवार दि.६/१०/२०१२ मधील प्रशांत दिक्षित यांचा आकलन या सदरातील लेख पहावा पृ.७) बुद्धीला आवाहन करून अंधश्रद्धा संपत नाहीत. जातव्यवस्था दूर होत नाही. भ्रष्टाचार संपत नाही. महिलांना समान हक्क मिळत नाहीत. बालविवाह थांबत नाहीत. बुद्धीतील समज जोपर्यंत भावनेच्या प्रांतात उतरत नाही तोपर्यंत मेंदू त्यानुसार कृती करीत नाही. कधी कायद्याच्या धाकाने कृती केल्या जातात, माणसे बदलली असे वाटते. पण हा बदल संभाव्य शिक्षेच्या भीतीपोटी रेट्याशिवाय बुद्धी आपला प्रभाव टाकूच शकत नाही. बुद्धी डोळस असली तरी तिला हातपाय नाहीत असे भारतीय तत्त्वज्ञानात म्हटले आहे.

तरीही माणूस बदलतो समाज बदलतो. कामकरणाऱ्या पद्धतीचा मूळ साचा कायम असला तरी समाजात बदल झालेले दिसतात. हे कसे होते ?भावना उत्तेजित नसताना बुद्धीचा डोळा उघडलेला असतो. भावना शांत झालेल्या असतील तर बुद्धीचे केंद्र कार्यान्वित होते. अशावेळी मनुष्य वेगळे मत ऐकू शकतो. असे क्षण फार क्वचितच येतात. पण अशा क्षणात बुद्धी आपला प्रभाव दाखविते व मेंदूतील भावनांचे सर्किट बदलवून टाकते. बुद्धीला आपले वर्चस्व गाजविण्याची संधी तेवढ्या अल्प काळापुरतीच मिळते. कारण बुद्धीने सोडलेला विचार एकदा भावनांच्या प्रांतात गेला की मग त्या विचाराचे समर्थन करीत राहण्याचे दुय्यम काम पुन्हा बुद्धीला करावे लागते. मात्र बुद्धी शुद्ध असेल तर त्यापासून निर्माण होणाऱ्या भावनाही शुद्ध असतात आणि त्यांचे समर्थन करणेही योग्य असते. (प्रशांत दिक्षित-उपरिनिर्दिष्ट संदर्भ)

स्त्रीपुरूषांच्या परंपरागत चालत आलेल्या श्रद्धांवर बुद्धीपेक्षा भावनांचा पगडा अधिक असल्यामुळे बुद्धीने शिकविलेल्या नवविचारांचा प्रभाव पडून मतपरिवर्तन होण्याची क्रिया अत्यंत मंदगतीने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत होत असते. प्रशांत दिक्षित यांनी केलेले हे शास्त्रीय विवेचन भारतीय स्त्रीपुरूषांच्या अंधश्रद्धांवर अतिमंद पद्धतीने प्रभाव पडून मतपरिवर्तन अतिमंद पद्धतीने समाजात होत असते हे आपणांस समजावून देणारे आहे. त्यामुळे विवाह झालेल्या स्त्रियांनी नवऱ्याच्या नावाने कुंकू लावणे व मंगळसूत्र घालणे व विधवा स्त्रियांनी या दोहोंचा त्याग करणे, विवाहित तरूणींनी वर्षातून एकदा सावित्रीच्या नावाने पिंपळाला प्रदक्षिणा घालून सात जन्म हात पती मिळावा अशी प्रार्थना करणे अशासारख्या आता बुद्धीला न पटणाऱ्या रूढीपरंपरा स्त्रियांकडून पाळल्या जातात. त्याशिवाय सणावारांच्या निमित्ताने नरता मुरडता येते, एकत्र जमून आनंदात वेळ घालवित येतो ही कारणे ही स्त्रियांच्या निरर्थक परंपरा पाळण्यामागे असू शकतात. हिंदू स्त्रीपुरूषांच्या रक्तात पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या रूढी परंपरांबद्दलचा प्रभाव, आवडनिवड मिसळले असतात. अन्य धर्मीयांच्या स्त्री पुरूषांच्या रक्तात त्यांच्या धर्मातील रूढीपरंपरांचा प्रभाव असतो. त्यामुळे नकळत त्या रूढी परंपरा (बुद्धीला पटत नसल्यातरी) स्त्री पुरूषांकडून आचरिल्या जातात. समाजात पुरूष वर्गाकडूनच फक्त स्त्रीला दुय्यम स्थान दिले जात असे नाही तर स्वत: स्त्री वर्गही आपल्या सहजातीयांवर अन्याय करीत असतो. स्त्री पुरूष विषमता जातिभेद पाळणे यामागे अहंकार, द्वेष, स्पर्धा, मत्सर इत्यादी दुर्गुणही कारणीभूत असतात.

लेखक संपर्क क्रमांक
९८६९३९०५४४





# वाचन संस्कृती: दशा आणि दिशा

**संजय बोरूडे**
अहमदनगर

परवाच पुणे आणि ठाणे येथील वाचनालये नाइलाजाने बंद कराव्या लागत असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून वाचल्या आणि मन विषण्ण झाले.याबाबत कोणाला फारसे वाईट वाटल्याचे दिसून आले नाही . फेसबुक व्हॉटसअप आणि सोशल मिडीयाच्या व्हर्च्यूअल जगात वाचनालये खरोखरच कालबाह्य झालीत की काय ? असा प्रश्न त्यामुळे पडला. पण त्यात डोकावल्यावर त्यासंबंधी हळहळ व्यक्त करणाऱ्या किंवा भाबडया स्वरूपाच्या त्रोटक प्रतिक्रिया आढळल्या.. बाकी पुन्हा जैसे थे.

पुणे आणि ठाणे सारख्या महानगरातील वाचनालयांच्या बाबतीत असा प्रकार घडत असेल तर खेडयापाडयातील वाचनालयांबाबत तर बोलायलाच नको .

हे असे कशामुळे होत असेल ?समाजात बांधिलकी शिल्लक नाही ,की लोक वाचतच नाहीत?परवा प्रोफेसर कॉलनीतील एक वाचनालय बंद झाले व तेथे आईस्क्रीम दुकान चालत असलेले दिसले. लोक दुष्काळ असतानाही सण, उत्सव, इव्हेंट दणक्यात साजरे करताना दिसतात. पण ग्रंथ खरेदी,वाचनालय, साहित्यिक स्वरूपाचे उपक्रमांकडे पाठ फिरवताना दिसतात. हे काय झाले आहे लोकांना? असा प्रश्न पडू शकतो.

परंतु नेहमी लोकांनाच दोष देण्यापेक्षा वाचनालय चालवणाऱ्यांनी आपले आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. शासनाकडून अनुदान मिळू लागले की बरीचशी वाचनालये ऐंशी, पंच्याऐंशी टक्के सवलतीत मिळणारी व लोकप्रिय स्वरूपाची पुस्तके खरेदी करतात. त्यातून आर्थिक फायदा जरूर होत असेल परंतु सकस व अभिजात साहित्य उपलब्ध होत नाही. कारण ते इतक्या भरघोस सवलत उपलब्ध होत नाहीत.

परवा पुस्तक विक्रेते सपकाळ यांनी गाजलेल्या पुस्तकांच्या पायरेटेड आवृत्या स्वस्तात मिळत असल्याचा मुद्दा मांडला. तो ही महत्त्वाचा आहे. शिवाय पुस्तकाची पीडी.एफ.सहजपणे उपलब्ध होताना दिसते. या दोन्ही गोष्टी बेकायदेशीर व चुकीच्या आहेत. हे थांबायला हवं.

ज्याप्रमाणे शरीराची वाढ आणि विकास होण्यासाठी आपण अन्न ग्रहण करतो त्याप्रमाणे वाचनाने मनाचा आणि बुद्धीचा विकास होतो, हे लक्षात घेतले पाहिजे. वाचनाने वैचारिक निष्ठा ठाम होते. पण वाचन संस्कृतीचे पोषण करणाऱ्या वाचनालयावरच जर बंद करण्याची वेळ येत असेल तर हा चिंतेचा विषय आहे . सुजाण, सुसंस्कृत नागरिक घडविण्यात साहित्याचा महत्वाचा वाटा आहे . साहित्यातच मानवी विचारांना दिशा देण्याचं आणि क्रांतीची बीजं पेरण्याचे सामर्थ्य आहे .

पुस्तके , वर्तमानपत्रे , वेगवेगळे साहित्यीक नियतकालिके हे वाचनाचे मुळ स्रोत . स्वतःच्या धडावर स्वतःचे डोके ठेवण्याची क्षमता निर्माण करणारी ही साधने आहेत . पुस्तक निर्मिती, लेखनाचा दर्जा , लेखक , प्रकाशक आणि वाचकाच्या हातात पडणारे पुस्तक या सगळ्याचा मुळापासून विचार करण्याची वेळ आली आहे .केवळ सोशल मिडीयाचे अतिक्रमण ही एक आवई उठवून वाचन संस्कृतीस येत असलेल्या अपयशाचे चिंतन करता येणार नाही . एकूणच वाचनसंस्कृतीस पोषक असणाऱ्या सर्व साधनांचा नव्याने विचार करावा लागणार आहे .

वाचनलयांत उपलब्ध होणारी पुस्तके चांगल्या दर्जाची , अभिजात लेखकांची असण्याऐवजी लोकप्रिय साहित्यिकांची, विशिष्ट विचारधारेशी संबंधित आहेत .केवळ मनोरंजन करणारी , प्रणय सुलभ भावविश्वाचे भलावण करणारी, स्वस्त व निःसत्त्व दर्जाची आहेत की वास्तव पातळीवरचे जगण्याची परिभाषा मांडणारी पुस्तके उपलब्ध आहेत का ? समकालीन साहित्य वाचनालयामध्ये किती उपलब्ध आहे ? जुनाट, साठ सत्तरच्या दशकातील कथा -कादंबऱ्याची भलावण करत समकालीन साहित्याची हत्या वाचनालये करत आहेत . ययाती, मृत्युंजय च्या पलीकडे वाचक म्हणून आपले वाचन का जात नाही?याचा अर्थ आपण अजून वाचनाच्या प्राथमिक टप्प्यावर आहोत काय?हे ही वाचक म्हणून आपण तपासले पाहिजे.प्रत्येक काळात घडणारी सामाजिक स्थित्यंतरे , परिवर्तने अटळच आहेत . त्या अनुषंगाने वाचन साहित्यात होणारी परिवर्तन ही गरजेचे आहे .१९९० नंतरच्या साहित्याची मांडामांड नीट झाली नाही. जगायचे एकविसाव्या शतकात आणि नॉस्टाल्जिक होऊन वाचायचे विसाव्या शतकातले.. याला काय म्हणणार?

'वाचाल तर वाचाल ' हा मंत्र वाचन संस्कृतीचे महत्व स्पष्ट करण्यास पुरेसा आहे. सोशल मिडीयावर वाचनासाठी अनेक

वेबसाईटस् उपलब्ध आहेत . या वेबसाईटसवर समकालीन साहित्य उपलब्ध असते . आजच्या काळातील आजच्या जगण्याचे वास्तव मांडणारे लेखन साहित्य डाऊनलोड करुन वाचल्या जाते. नव्या युगाची भाषा सांगणारी ऑडिओ बुक्स आता उपलब्ध आहेत.या साठी पैसे मोजण्याची ही आजच्या वाचकांची तयारी असते . हे समकालीन साहित्य वाचनालयातून भेटायला हवे . म्हणजे वाचनालयाचे आकर्षण वाढेल . ठराविक काळानंतर जुनाट पुस्तकांचे व्यवस्थापन करुन नवीन पुस्तके वाचनालयातून उपलब्ध व्हावीत. स्क्रीनवर प्रकाशाचा झोत डोळ्यांवर ओढवून, डोळ्यांची हानी करून घेण्यापेक्षा घेण्यापेक्षा प्रिंट मिडीयाद्वारे उपलब्ध असणारी पुस्तके डोळे , मेंदू आणि वैचारिक जडणघडणीसाठी हितकारक आहेत. सहज उपलब्धता हा मुद्दा सर्वसामान्य जनतेसाठी फार महत्वाचा असतो . मोठया शहरांतील वाचनालये बंद करावी लागत आहेत तर दुसरीकडे खेडयांपाडयातून वाचनालये उपलब्ध नाहीत . ज्या खेडयांमधून उपलब्ध आहेत तिथे ती अमावस्या पोर्णिमा सारखी उपलब्ध होतात . त्या वाचनालयांचा दर्जाही म्हणावा तसा उत्तम नसतो किंवा स्वतंत्र शासकीय पातळीवरुन खेडयापाडयांतून ... वाडी – वस्त्यांवर वाचनालये चालवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा . स्वातंत्र्याच्या बाहत्तर वर्षातही उपलब्ध नाही हे दुर्दैव आहे .

वाचनालयानंतर महत्वाचा मुद्दा आहे तो वाचनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण . स्वातंत्र्यानंतर देशात उपलब्ध परिस्थितीनुसार वाचन हे शिक्षणासाठी , शिक्षण हे नोकरी मिळवण्यासाठी , नोकरी ही अर्थार्जनासाठी असा दृष्टीकोण निर्माण झाला . निसर्गाने मानवास बहाल केलेल्या चौसष्ट कला , त्यांचे संवर्धन आणि जगण्याचा आनंद या बाबी दुर्लक्षित झाल्या.बदलते शतक आणि जागतिकीकरणाच्या रेटयात मानवाच्या जगण्याच्या गरजा आणि वृत्ती , प्रवृत्ती आणि तंत्रे बदलली . वाचन हे प्रथमतः आनंदासाठी व त्याद्वारे जीवन जगण्याचा, विचाराचा दर्जा उंचावण्यासाठी केले पाहीजे हा विचार आमच्यात रुजायला हवा . या शतकात पिझ्झा ,बर्गर सारखी खादय संस्कृती उदयास आली .उंची राहणीमानावर हजारो रुपये खर्च होऊ लागले परंतू वाचनासाठी २०० रुपयाचे पुस्तक विकत घेऊन वाचावे ही मनोभूमिका आमची तयार झाली नाही . लेखक मंडळीही ' माझे पुस्तक 'म्हणत प्रसादासारखी पुस्तके वाटतात . शिवाय कंपूबाजी, पुरस्कार हंटिंग, कुचाळक्या, हेवेदावे यामुळेही अवमूल्यन झाले आहे . आपल्याकडची प्रकाशक मंडळीही पैसे मिळाले की सुमार दर्जाची पुस्तके छापून साहित्याच्या या अवमूल्यनात भर टाकत आहेत. शिवाय ते काढलेल्या पुस्तकांची जाहिरात करत नाहीत. लेखकाकडूनच पैसे घेऊन परवडत नाही अशी बोंब ठोकतात. वाचनाविषयी अनास्थेचे हेही एक कारण आहे . या उलट मला स्वतःला आलेला अनुभव सांगतो . पेंग्विन व रँडम हाऊस या जगातल्या दिग्गज प्रकाशनाने माझ्या इंग्रजी कवितांचे पुस्तक प्रकाशित केले. ते आज अमेझॉनपासून बुक टोपिया, नेटबुक्स, व्हाइटल सोअर्स, गुगल बुक्स आदी जगभरातल्या ऑनलाईन पुस्तक विक्री केंद्रांपर्यंत पोहोचवले आहे.

भारतातील मंदिरात तासनतास रांगेत ताटकळत उभे राहून देवाची दर्शन घेणाऱ्या भक्तांनी , मंदिरे गच्च भरली आहेत तर माणूस घडवणारी वाचनालये ओस पडलेली आहेत ,किंबहूना ते बंद करण्याची वेळ आमच्यावर येत आहे, हे नक्कीच आपल्या प्रगतीचे सुलक्षण नाही ,हे नक्की .... !!

लेखक संपर्क क्रमांक
९४०५०००२८०

गणेश इंटरप्रायझेस



दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

डी-१८९, अवधान एम.आय.डी.सी.धुळे



# सफरचंद खाताय? सावधान!

**जोसेफ तुस्कानो**
बोरीवली-मुंबई.

व्हाटसप्पवर गाजलेला एक विनोद असा आहे:एक डॉक्टर आणि एक इंजिनियर एका तरुणीच्या प्रेमात पडतात. तो इंजिनियर त्या मुलीला रोज एक सफरचंद खायला देतो;का? तर 'ॲन ॲपल इन ए डे कीप्स डॉक्टर अवे'. विनोदाचा भाग सोडला तरी एक मात्र खरे की जगभरात हे फळ आवडीने खाल्ले जाते. सफरचंद कुणाला आवडत नाही ? फळाचा गर खाताना, काही जणांना त्याच्या काळ्या बिया कुरतडून खायची सवय असते. पण,त्याच्या या कडू लागणार्याज बियामध्ये एक कटू वास्तव्य आहे व ते आता वैज्ञानिकांना कळून आले आहे. त्या बियामध्ये ॲमिग्दालीन नावाचे एक वनस्पती रसायन असते. सफरचंद, अप्रीकोट, बदाम, पीच व चेरी ;ही वनस्पतीच्या र 'रोझ फॅमिली'तील फळे आहेत आणि त्यांच्या बियांत हे रसायन सर्रास आढळते.

वास्तविक ॲमिग्दालीन हे रसायन हे या वनस्पतीच्या संरक्षण यंत्रणेचा भाग असतो. तसे ते रसायन निरुपद्रवी असते,पण जेव्हा बिया चिरडल्या जातात,चघळल्या जातात,कुरतडल्या जातात तेव्हा त्या रसायनाचे विघटन होते व त्याचे हायड्रोजन सायनाईड या विषारी रसायनात रूपांतर होते.सायनाईड हे रसायन विषारी असल्याचे जगजाहीर आहे. हे रसायन शरीरपेशींना होणाऱ्या ऑक्सिजनच्या पुरवठयात अडथळा आणते व ते मोठ्या प्रमाणात शरीरात जीवघेणे ठरते. जरी फळाच्या बियातील हे रसायन अल्प प्रमाणात असले तरी ते मोठ्या प्रमाणात शरीराला घातक ठरू शकते. तेव्हा, अख्खे सफरचंद खाताना सावधान असावे. मुलांना या फळांच्या बिया काढून, फोडी करून खायला द्यावीत,असे तज्ञ सल्ला देत आहेत.

आपल्या शरीराची संरक्षणयंत्रणा इतकी कार्यक्षम असते की शरीरात कळत-नकळत अल्प प्रमाणात घुसणाऱ्या अपायकरक पदार्थांना ती जेरबंद करत असते. विशेषत: तोंडातून शरीरात जाणाऱ्या अशा अपायकारक अन्नाचा ती बंदोबस्त करत राहते. परंतु, त्यांचे प्रमाण वाढीव असले की मात्र शरीर व्याधीचे बळी ठरते. मात्र,विषारी रसायने,अल्प प्रमाणातसुद्धा इंजेक्शनद्वारा सरळ रक्तात घुसतात तेव्हा त्यांचा परिणाम तत्काळ दिसून येतो.

शास्त्रज्ञांना आपल्या अभ्यासात आढळले आहे की माणसाच्या प्रतिकिलो वजनामागे ०.५ ते ३.५ मिलिग्राम सायनाईड शरीरात घुसल्यास तीव्र विषबाधा होऊ शकते. माणूस कोमात जातो. त्याचे हात-पाय लुळे पडतात. हृदयक्रिया व फुफ्फुसे निकामी होतात. अखेर,तो दगावतो . याचा अर्थ, ८१ ते २८६ मिलिग्राम सायनाईड ८१ किलो वजनाच्या माणसाच्या मृत्यूस करणीभूत ठरू शकते. तसेच त्याचे कमी प्रमाणातले आक्रमणदेखील शरीरातील डोकेदुखी,चक्कर येणे,पोटात पेटके येणे, अशक्तपणा,मानसिक गोंधळ;यासारख्या व्याधीचे बळी करते. अर्थात ,प्रत्येकाची बॉडी केमिस्ट्री वेगळी असल्याने विषाचे परिणाम कमी-अधिक आणि वेगवेगळे असतात. तरीही,लहान मुलांना जास्त धोका असतो, म्हणून संशोधक सावध करतात.

सफरचंदे विविध जातीची असतात व साधारणपणे त्याच्या एक ग्रॅम बियात १ते ४ मिलिग्रॅम ॲमिग्दालीन रसायन असते. त्यामुळे त्यातील सायनाईडचे प्रमाण अत्यल्प असते. बारिक कुटलेल्या किवा कुरतडलेल्या एक ग्रॅम बियातून ०.०६ ते ०.२४ मिलिग्राम सायनाईड बाहेर पडू शकते . साहजिकच. दळलेल्या सफरचंदाच्या दोन कप बियांचा रस शरीराला खचितच हानिकारक ठरतो. माणसाचे वजन,त्याची शारीरिक क्षमता व कुठल्या जातीची सफरचंदे खाल्ली जातात यावर ही विषबाधा अवलंबून असते. त्यासाठी पुढील तक्ता मार्गदर्शक ठरू शकतो व किती बिया शरीरात गेल्यास विषबाधा होते हे कळू शकते :

| शरीराचे वजन (किलो) | बिया (ग्राम) | बियांची संख्या |
|---|---|---|
| ९(मूल) | १९-५२९ | २७-७५६ |
| ५४ | ११३-३१७५ | १६२-४५३६ |
| ५९ | १२३-३४४० | १७६-४९१४ |
| ६४ | १३२-३७०४ | १८९-५२९२ |
| ६८ | १४२-३९६९ | २०३-५६७० |
| ७३ | १५१-४२३४ | २१६-६०४८ |
| ७७ | १६१-४४९८ | २२९-६४२६ |
| ८२ | १७०-४७६३ | २४३-६८०४ |
| ८६ | १८०-५०२७ | २५६-७१८२ |
| ९१ | १८९-५२९२ | २७०-७५६० |

यावरून लक्षात येते की ८२ किलो वजनाचा माणूस २४३-

६८०४ बिया एकदम खाल्ल्यास मरू शकतो व एक सफरचंदात २० पर्यन्त बिया असू शकतात. जर बिया अख्ख्या गिळल्या तर काही परिणाम होत नाही कारण त्याच्यावरील कठीण कवचामुळे जठरातले पाचकरस निष्प्रभ ठरतात. पण,आगीची परीक्षा बघायचीच कशाला?

अलिकडची ऑस्ट्रेलियात घडलेली घटना. एका बाईला २५ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली, कारण तिने आपल्या प्रियकरासाठी आपल्या नवर्याचा सफरचंदाच्या बियांचा चुरा खायला देऊन काटा काढला होता.शिवाय, 'मॉम' या चित्रपटात श्रीदेवीने सफरचंदाच्या बिया खायला देऊन खून केल्याचे एक दृश्य आहे ,त्यात दोनशे बिया वापरल्या होत्या,म्हणे. मग,या नव्या संशोधनाच्या पाश्वभूमीवर या घटनांची आठवण होत राहते.

लेखक संपर्क क्रमांक

९८२००७७८३६

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !



# धुळे नंदुरबार जिल्हा प्राथमिक शिक्षकांची सहकारी पतपेढी मर्या.धुळे

र.नं./डी.एल.ई.(डी.एल.ई.) बी.एन.के./(ओ)१०२/८५-८६ सन ८५ दि.२३/१०/८५

**वैशिष्ट्ये:-** ● सभा शेअर्स: ९,७४,७१,५००/- ● एकूण ठेवी-४७,८०,२४,७५५/- ● राखीव निधी-२,२९,१८,४१५/- ● येणे कर्ज - ६०,१०,२७,००३/- ● जामिनकी कर्ज - ७,००,०००/- ● आकस्मिक व इतर कर्ज -रू.१,५०,०००/- ● एकूण कर्ज मर्यादा - रू.८,५०,०००/-

**मुदत ठेव योजना**

| कालावधी दिवस | ३० ते ४५ दिवस | ४६ ते ९१ दिवस | ९१ दिवस ते ९ महिने | ९महिने ते १३महिने | १३महिने ते १५ महिने |
|---|---|---|---|---|---|
| व्याज दर | ५% | ७.५% | ८.५% | ९.५% | १०.५% |

संस्थेचे कार्यक्षेत्र : धुळे,साक्री,पिंपळनेर,शिरपूर,शिंदखेडा,दोंडाईचा,नंदुरबार,शहादा.अ.कुवा,तळोदा, नवापूर,धडगांव

**श्री.सुभाष भुराजी पगारे** व्हा.चेअरमन
**श्री.जितेंद्रसिंग जवानसिंग वळवी** चेअरमन
**श्री.रवींद्र उत्तम खैरनार** गटनेते
**श्री.गमन साहेबराव पाटील** पॅनल प्रमुख
**श्री.संजय तुकाराम पवार** गटनेते

**संचालक मंडळ**

श्री.शिवानंद दला बैसाणे, श्री.शरद भबुतराव पाटील, श्री.भिमराव पंढरीनाथ माळी,
श्री.दिनेश सदाशिव पाडवी, श्री.शिरीष रूपचंद कुवर, श्री.फुलसिंग अर्जुन वसावे,
श्री. अनिल शिवाजी सोनवणे, श्री.आनंदराव नवल पाटील, श्री. मांगीलाल अंबर गांगुर्डे,
श्री.रामचंद्र कर्मा पटले, श्री.अनिल नामदेव नहिरे, श्री.रविंद्र भटू बोरसे,
श्रीमती मनिषा वसंतराव बोरसे श्रीमती सरला लोटन पाटील,
श्री.राजेंद्र माधवराव भदाणे (तज्ञ संचालक) ,श्री.बाळासाहेब झावरू पाटील (तज्ञ संचालक)



# साने गुरूजी- आमच्या गणेशोत्सव !

प्रा.श्री.द.महाजन
पुणे

स्वातंत्र्यपूर्व काळातली गोष्ट आहे. शैक्षणिक वर्ष १९४६-४७ आमचा इंग्रजी ५ वी ए चा वर्ग (हल्लीची नववी) पुण्यातली सुप्रसिद्ध शाळा नूतन मराठी विद्यालय प्रशाला उर्फ 'नू.म.वि.' त्या काळी शाळेत शाळेचा असा गणपती बसवला जात नसे. गणेशोत्सव साजरा केला जात नसे. काही वर्गावर्गातून गणपती बसवला जायचा. पण वर्गातील गणपतीची सजावट, आरती आणि इतर काही कार्यक्रम यांना वेळेचं बंधन असे. शाळा सुटल्यावर फक्त एक तास म्हणजे संध्याकाळी ६ वाजेपर्यंतचा वेळ त्यासाठी मिळायचा. आमच्या वर्गातील मुलांनी, म्हणजे मुलग्यांनी असं ठरवलं की आपण आपल्या वर्गाचा गणोशोत्सव शाळेतल्या आपल्या वर्गात न करता, आपल्यापैकी कोणाच्या तरी घरी करायचा. आमची शाळा मुलांची होती. त्यामध्ये मुली नव्हत्या. शाळेत एक शिक्षिका सुद्धा नव्हती.

कोणाच्या घरी आपला गणपती बसवायचा? ते ठिकाण मध्यवर्ती भागातलं असावं, ते शाळेच्या जवळपास असावं म्हणजे शाळा सुटल्यावर तेथे जायला सोयीस्कर होईल. मुख्य म्हणजे त्या घरात गणपती बसवायला योग्य अशी मोठी जागा हवी. विचारांती असं ठरलं की मेहुणपुऱ्यातल्या पद्माकर वर्तकच्या घरी गणोशोत्सवाची मुहूर्तमेढ करायची. शाळेपासून चालत पाच मिनिटांच्या अंतरावर वर्तकांचा स्वत:चा मोठा वाडा होता. हा पुण्यातल्या सुप्रसिद्ध वाड्यांसारखा नव्हता. ती सिमेंट काँक्रीटची नव्याने बांधलेली इमारत होती. त्यामध्ये एक बऱ्यापैकी मोठा हॉल होता. आमच्या शाळेच्या वर्गापेक्षाही मोठा. पन्नास एकजण सहज बसू शकतील असा ऐसपैस हॉल एकाध्याच्या घरी असणं दुर्मिळच. बऱ्याच मुलांची घरे तर अगदी छोटी आणि भाड्याची, जुनाट विटामातीच्या बांधकामाची होती. मुख्य म्हणजे आमचा सेक्रेटरी बोधनी वर्तकच्या घरी जाऊन त्याच्या पालकांना विनंती करून त्यांची परवानगी मिळवून आला होता.

झालं. आम्हा. पुलांमध्ये उत्साह संचारला. ऐच्छिक वर्गणी गोळा करायला सुरवात झाली. माधव गोटेला खजिनदार नेमण्यात आले. कोणाच्या घरून सतरंजी, तर कोणाच्या घरून विजेच्या दिव्यांची माळ मिळू शकेल त्याची चाचपणी सुरू झाली. सर्वांनी मिळून श्रींची मूर्ती आणायला केव्हा जायचे ते ठरले. आपल्या वर्गाचा हा गणोशोत्सव म्हणजे वर्गाचे स्नेहसम्मेलनच समजावे, त्यासाठी कार्यक्रमांची कशी आखणी करायची हे ठरवण्यासाठी चारपाच जणांची समिती तयार झाली. चित्रकला, हस्तकौशल्य ह्या विषयात पारंगत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी सजावटीची जबाबदारी आपणहून स्वीकारली. गणेशचतुर्थी आठ दिवसांवर आली. शाळा सुटल्यावर वर्गातच थांबून सर्वांनी कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी झालेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी चर्चा करायचे ठरले. त्यावेळी वसंत ठुसे सहज असं म्हणून गेला. आपण पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमाला कोणाला तरी मोठ्या व्यक्तीला बोलवायचं का? सेक्रेटरी बोधनीला ही कल्पना आवडली. तो म्हणाला म्हणजे एक प्रकारे आपल्या स्नेहसम्मेलनाचे उदघाटनच त्यांच्या हस्ते केल्यासारखं होईल. सगळ्यांनीच ही कल्पना उचलून धरली. कोणा मान्यवराला बोलवायचे? यावर चर्चा सुरू झाली. नावं सुचवण्यात येऊ लागली. लेखक आचार्य अत्रे, राजकीय नेते काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे गणपतराव नलावडे, बाळकृष्ण केसकर अशी नांव घेतली गेली. तेव्हढ्यात कुणीतरी म्हणालं, ''आपण साने गुरूजींना बोलावू यात का ? ते आपल्या शाळेचेच माजी विद्यार्थीही आहेत.'' साने गुरूजी त्यावेळी आम्हा बाळगोपाळांचे लाडके, अत्यंत आवडते लेखक होते. सर्वांचे एकमत झाले. साने गुरूजींनाच बोलायचं. पण त्यांना कोण बोलावणार? आणि आपल्या मुलांच्या बोलावण्यावर ते येतील का? नाहीच यायचे ते. का आपण आपल्या कोणा शिक्षकांना हे काम सांगू या? नाही नकोच. इतक्या मोठ्या माणसाचा विचार करायलाच नको. त्यापेक्षा आपल्या मुख्याध्यापकांना, सुपरवायझरना किंवा काटदरे सरांसारख्या कोणाला तरी बोलवावं हे बरं.

इतक्यात स्वच्छतागृहात किंवा पाणी प्यायला 'पाणघरात' गेलेल्या बाळ देशापांडेने वर्गात प्रवेश केला. साने गुरूजींना बोलवण्याचा विषय ऐकून तो म्हणाला, ''मी बोलावतो, पांडू ला घेऊन येण्याची जबाबदारी माझी!

सगळेजण चाटच पडले. ''सानेगुरूजींना आमच्या घरी सगळे पांडूच म्हणतात. त्यांचं नाव पांडूरंग सदाशिव साने. पांडूरंग कोकणातून शिकायला पुण्यात आला तेव्हा माझ्या आजोबांनी त्याला आमच्या घरात ठेवून घेतले. आठवड्यातून दोन दिवस

जेवायलाही आमच्याच घरी असायचा. पाच दिवस वार लावून जेवणाची व्यवस्था आजोबांनी पाच घरात करून दिली होती. माझे वडील पांडूबरोबर खेळले, भांडले आहेत. दोघंही आपल्याच शाळेत शिकत होते ना, त्यावेळी.'' सगळा वर्ग एकदम शांत झाला. अवाक होऊन बाळचं बोलणं ऐकून त्याच्याविषयीसुद्धा सगळ्यांना आदरयुक्त प्रेम वाटायला लागले. मला ही गोष्ट थोडीशी माहिती होती. बाळच्या घरी गेलेलो असताना एकदा त्याने सांगितलेले आठवले की साने गुरूजी विद्यार्थीदशेत त्यांच्या घरी राहात होते. तीच खोली आता त्याची अभ्यासाची खोली होती. साने गुरूजी येणार, ते आपल्याला भेटणार, जवळून पहायला मिळणार, आपल्याशी बोलणार हा सुखद विचाराने सर्वजण शहारूनच गेलो. उत्सवाच्या तयारीला, त्याच्या उत्साहाला उधाण आले.

दोन दिवसांनी बाळ देशपांडेने निरोप आणला की साने गुरूजी भेटले. ते येणार आहेत. संध्याकाळी साडेपाच वाजता जाऊ यात म्हणाले. मी त्यांना घेऊन येतो. सर्वांनी मोठ्याने ओरडत आनंदाने जल्लोश केला. पदमाकरच्या घरी जाऊन हॉलची साफसफाई केली गेली. गणपती बसवण्यासाठी टेबलावर पाट ठेवून त्यावर भरजरी शालीचे आच्छादन केले गेले. त्यावर गणेशमूर्ती ठेवून भोवताली सजावट केली गेली. विजेच्या दिव्यांची माळ लावण्यात आली. पुढे हॉलभर सतरंज्या आंथरल्या. फुले, हार, पुजेचे साहित्य सगळी जय्यत तयारी पूर्ण झाली. साने गुरूजींना बसण्यासाठी वर्तकच्या घरातील भारी नक्षीदार खुर्ची ठेवण्यात आली. भालू पेंडसेने उकीचे मोदक आणतो म्हणून सांगितले होते. जय्यत तयारी पूर्ण झाली. शिक्षकवर्गापैकी चारपाच जणांनी येण्याचे मान्य केले होते.

गौंश चतुर्थीचा दिवस उजाडला. शाळेला सुटी होतीच. सकाळपासून सगळ्यांची गडबड सुरू होती. घरचा गणपती बसवून झाल्यावर जवळपास राहणारे बरेचजण तयारींवर अखेरचा हात फिरवण्यासाठी जमा झाले होते. सेक्रेटरी बोधनीने कोणाकोणाला काहीबाही करायला सांगितले होते ते सर्व नीट झाल्याचे पाहून समाधान व्यक्त केले. दुपारी चार वाजल्यापासूनच सर्वजण जमा होऊ लागले. सव्वा पाचच्या सुमाराला गुरूजनही उपस्थित झाले. साने गुरूजींच्या स्वागतासाठी प्रवेशद्वाराजवळ सगळे जमा झाले. गोखले सर, बोधनी, वर्तक ह्यांनी पुढे होऊन साने गुरूजींना हार घालून, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करावे असे ठरले.

ठीक साडेपाचला बाळ देशपांडे साने गुरूजींना घेऊन आला. गोखले सर पुढे होऊन त्यांना हार घालायला गेले. साने गुरूजींनी हार त्यांच्या हातातून घेऊन त्यांनाच घालू लागले. म्हणाले, ''गोखले सर आहे हारतुरे कशाला?'' त्यांनी गोखले सरांची गळाभेट घेतली. गोखले सरांनी त्यांना सेक्रेटरी बोधनी आणि पदमाकर वर्तकची ओळख करून दिली. साने गुरूजींच्या हस्ते गणेशाची पूजा करून झाल्यावर सुखकर्ता, दुखहर्ता........ही आरती झाली. सर्वांना पेढे वाटण्यात आले. इतिहासाचे तुळपुळे सर आणि विज्ञानशिक्षक ना.वि.दीक्षित सर ही आले होते. साने गुरूजींना खुर्चीवर बसण्याची विनंती केली. ते म्हणाले, ''सर्वांनी खालीच बसू या.'' ते खाली बसू लागल्यावर तीनही सर त्यांच्याजवळ गणपतीकडे अगदी पाठ करून बसायला नको म्हणून तिरके एका कोपऱ्याच्या बाजूला बसले. गोखले सरांनी सांगितल्यावर आम्ही सर्वजण समोर बसलो. गोखले सर बोलायला उठले. त्यांनी साने गुरूजींचे स्वागत करून त्यांना धन्यवाद दिले. बोधनीने सानेगुरूजींविषयी अत्यंत आदरपूर्वक त्यांच्या महत्कार्याबद्दल थोडक्यात सांगायला सुरवात केली. त्यात मुख्यत: महात्माजींच्या सत्याग्रह मोहिमेतील सहभाग, तुरूंगवास, शामची आई, भारतीय संस्कृती अशा पुस्तकांचे लेखन, स्वातंत्र्य चळवळ, राष्ट्रसेवादलाची स्थापना आणि साधना साप्ताहिकात लेखन संपादन यांचा समावेश होता. गोखले सरांनी सानेगुरूजींना बोलायची, मार्गदर्शन करायची विनंती केली.

साने गुरूजी उठले, त्यांनी वाकून नमस्कार केला. म्हणाले, 'मी आणि गोखले सर आम्ही तीस वर्षांपूर्वी ह्याच आपल्या नूमवित शिकत होतो. पुण्यात आमचे कोणी नातेवाईक नव्हते ना ओळखीचे. देशपांडेंच्या घरात माझी राहण्या जेवण्याची सोय केली. अगदी घरचा म्हणून वागवले, मला प्रेम दिले. नंतरही माझे जाणेयेणे, त्यांच्याकडे राहणे चालूच राहिले. मी पुण्याच्या प्रेमातच पडलो. पुणेकर झालो. पुण्यात त्यावेळी लोकमान्य टिळक होते, न्यायमूर्ती रानडे, गोपाळकृष्ण गोखले होते. आगरकर होते. शाळेत व्यासंगी, मनापासून शिकवणारे गुरूजन होते. मी कमालीचा भाग्यवान आहे. बाळ माझा मित्र आहे. त्याचे वर्गमित्रही आपण सर्वजण मित्रच आहोत. मी आपल्याशी गप्पा मारायला आले आहे. प्रथम प्रत्येकाने आपले नाव सांगून परिचय करून द्यावा. सांगितले. साने गुरूजी उभे राहूनच ऐकत होते. त्यांची ती साधी, प्रेमळ, विनम्र मूर्ती आम्ही डोळेभरून पहात होतो. अजून ती अंत:चक्षूसमोर आम्हाला दिसते. साधे, पांढरे खादीचे कपडे पायजमा, नेहरू शर्ट आणि गांधी टोपी.

साने गुरूजींच्या प्रेमळ वाणीचा प्रवाह खळखळत वाहू लागला. ते म्हणाले, ''गणपती ही विद्येची देवता आहे. तुम्ही विद्यार्थी आहात. मी ही विद्यार्थी आहे. आयुष्यभर कायम विद्यार्थी राहा. केवळ परीक्षार्थी होऊ नका. ज्ञानार्थी बना. तुम्ही भाग्यवान आहात. शिक्षणाच्या माहेरघरी तुम्हाला राहायला, शिकायला मिळते आहे. तुमची पिढी फारच भाग्यवान आहे. पारतंत्र्याची रात्र संपत आलीय. स्वातंत्र्याची पहाट होते आहे. झुंजुमुंजू झालं आहे. लवकरच स्वातंत्र्यसूर्य उगवणार आहे.''

''तुम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक बनणार आहात. पण त्याबरोबरच तुमच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. राजकीय

स्वातंत्र्य लवकरच मिळेल. पण आर्थिक स्वातंत्र्य, समानता, सामाजिक स्वातंत्र्य, वैचारिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय नुसत्या राजकीय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही. आपल्या देशात प्रचंड विषमता आहे. दारिद्र्य सामाजिक अन्याय, अस्पृश्यता, अंध:श्रद्धा महिलांची दुर्दशा पाहून वेदना होतात. विशेषत: खेडोपाडी तर परिस्थिती अतिशय गंभीर आहे. दोन वेळा चार घास खायला न मिळणारे, अंगभर तर सोडाच, पण कमीत कमी आवश्यक तेव्हढे वस्त्र न मिळणारे लाखो देशबांधव पाहून रडू येते. प्राण्यांपेक्षाही वाईट वागणूक मिळणारे अस्पृश्य, माणूस म्हणूनही जनता न येणाऱ्या आपल्या माता भगिनी आहेत. मंदिराची पायरीही चढायची बंदी असलेले आपले लाखो बांधव आहेत. कुत्रा, मांजर, शेळी आपल्या घरात येऊ शकतात, पण हरिजन येऊ शकत नाहीत. डोळ्यात पाणी येणं, रडायला येणं स्वाभाविक आहे.'' असं म्हणत असातानाच साने गुरूजींना रडे आवरेना. ते ओक्साबोक्षी रडू लागले. डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. गोखले सरांनी त्यांना शांत करून खाली बसवले. पण त्यावेळी सरांचे डोळेही पाणावलेलेच होते. आमच्या सगळ्यांच्याच डोळ्यात पाणी आले. साने गुरूजींनी आम्हाला शब्दश: रडवले. क्षमा करा म्हणत ते खाली बसले.

तोपर्यंत पेंडसेच्या घरून गरम गरम उकडीचे मोदक आले होते. सर्वांना मोदक आणि गरम दूध देण्यात आले. नंतर गोखले सरांनी आम्हाला साने गुरूजींचे चरित्र सांगितले व वाचायले दिले. स.प.महाविद्यालयातून बी.ए.झाल्यावर ते जळगाव जिल्ह्यात अमळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होते. १९२४ ते १९३० त्यांनी अमळनेरला अत्यंत मनस्वी, देशप्रेमी अध्यापक म्हणून नाव कमावले. सर्वांच्या आदर प्रबळ साने गुरूजी म्हणून त्यांनी नाव कमावले. १९३० मध्ये महात्माजींच्या आवाहनाला साद देऊन त्यांनी नोकरी सोडून स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली.

आज ७३ वर्षे झाली तरी आम्ही त्यावेळचे वर्गमित्र दरवर्षी एक दिवस एकत्र येऊन स्नेहसंमेलन साजरे करतो गप्पा मारतो. पूर्वीच्या आठवणी जागवतो. त्यावेळी पहिल्या संम्मेलनाची व साने गुरूजींची आठवण होतेच होते. आता स.प.महाविद्यालयाजवळच्या रस्त्याला साने गुरूजी मार्ग असे नाव देऊन पुणे महापालिकेने त्यांचे नाव अजरामर केले आहे.

लेखक संपर्क क्रमांक
७७७४०५६८८०





# शेतकरी राजा, उठा...

**लतिका चौधरी**
दोंडाईचा-धुळे

शेतकरीराजा,
सलाम तुला !
तू 'राजा' आहेस.प्रजेसाठी दिनरात खपतोस.
राबतोस.जीवाचं रान करतोस.अन् रक्ताचं पाणी करतोस.....
जरी फिरून जातं तुझ्या
कष्टावर पाणी.....! असू देत..

'असू देत' म्हणनं किती सोपं ह्याची जाणीव आहे.तुला
काय,किती,कसं सोसावं लागतं ह्याची कल्पनाही आहे.अन् बघ
मन कसं भरून
येतं तुझ्या मनाची नुसती कल्पना करून.. ..
भविष्याच्या पोषणाची......

तू जगाचा'पोशिंदा' आहेस ...पण पोशिंदा बनतांना पोट उपाशी
ठेवत पेरावा लागतो दाणा
घासातला.....जपून ठेवलेला ...काळ्या मातीत,हौसे-मौजेची
....जीवाची माती ....!
तुझी सारी हौस भागवतो बांधावरच .....ईच्छा
अपेक्षांना बांध घालत ...उतरत्या प्रहरापर्यंत...!

तापल्या प्रहरी डोक्यावर थंडपणे ऊन झेलत
हाकत असतो नांगर देहाचा....जमिनीला
भुसभुशीतपणा यावा म्हणून.....मन मात्र पक्क
....आभाळाचा सावत्रपणा सोसण्यासाठी....!

सावत्रपणे वागतोस म्हणे पोरांशी...नुसते देत
राहतोस शब्द- 'पुढच्या पिकावर सदरा, चपला,
पाटी,पुस्तक घेऊन देईन ' असा ....अन् देत
राहतोस पिकास पैसा...पाणी...रक्त....आयुष्य
.....काळ्या मातीवर भविष्याच्या रेघोट्या
आखत.....चांगल्या...वाईट.....

घेतो वाईटपणा पोरांचा.....बायकोची कुरकुर
....शेतावर रात्रंदिन कष्टाचे डोंगर उपसत...
'स्व' ला गाडत...दोष स्विकारत.....
तसा तिचाही दोष नाही रे...!काय वाईट केलं
तिनं सुखाची स्वप्ने पाहून? तुझ्यासवे कसरत
करता करता तिलाही वाटतं कुठं कुठं मनातल्या
मनात.....शेजारणीसारखं नटावं-थटावं....
नसाव्यात कातडीचा पोत दावणाऱ्या साड्या झिरमिरीत
.....घालावीत घुंगरू-काचं-नाड्या-
लावलेली रंगीबेरंगी अर्धी...तोकडी....उघड्या
पाठीची पोलकी. ....नजरा घोंगावणारी....!

पण बाई,तुझं अंगभर करकचून नेसलेलं लुगडं
....ठसठशीत रेखाटलेलं... पूर्ण सूर्याचं बळ देणारं कुंकवाचं बळ
न्यारच हं....? खान्देशी
बावनकशी असं तुझं मजबूत ईराद्याचं पहाट
प्रहरी जागणं....राबणं....झिजणं.... हेव्याचं
वाटतं गं आम्हा शेजारणींना ....! मशिनीच्या
जगाला सरावलेल्या.....फक्त सिनेमातच शिवार
पाहिलेल्या आम्ही.....असो.

शिवाराच्या भेगा सावळाव्यात म्हणून शेतकरी
राजा,तू शिंपडत असतो घाम दिनरात....
स्वतः च्या पायाच्या भेगांकडे मात्र दुर्लक्ष....!

तुझं लक्ष असतं नभाकडं...पाऊसचांदण्याकडं
.....चातकासारखं.....आणि तुझ्याकडे बघत
असतात जमिनीतली दाणं केविलवाणी...तुझं
प्रार्थनागीत गाभूळल्या ढगानं ऐकावं...पाझरावं
......त्यांच्यात प्राण यावा ...जीव यावा म्हणून
जीव तुझा कसा फिरत राहतो रानोमाळ....
पाखरांसवे.... या झाडावरून त्या झाडावर....
सावली मिळावी म्हणून....विसाव्याला...तनाला
....मनाला....सर्जाला सुद्धा.....!

सर्जा हपापत असतो तुझ्यासवे....जमिनीला
श्वास देण्यासाठी......उन्हाच्या रानात....कडबा
कोरडा तोंडातच घुटमळतो....रवंथ सुरू असते
.....विचारांचे....चांदण्यांचं गाव कधी येतं.....
हिरवाईनं पारणं कधी फिटतं ह्याची वाट बघत
सारं आभाळ ऊतरलेलं पापणीवर पाखरांच्याही....!

पाखरांच्या ओठातून येते धून जगण्याची....
मोडलेलं घरटं.... पुन्हा...नवीन उभारण्याची
त्यांच्यासाठी......अन्  छप्पर शेतकऱ्याच्याही डोक्यावर
उभारण्याची.....कारण........
कारण ते जाणतात....त्यानं दिला देह त्याचा
आंदण रानाला वंचित असा...वस्त्राला....
भावनांना गाठी मारीत.....तयार करतो खळं....
येणाऱ्या सुगीसाठी.....तयार करतो आरती
देहाची.....पानापानातल्या....दाण्यादाण्यातल्या
ईश्वरासाठी....!        ईश्वराच्या पायी सारा ठेवत
......बांधत असतो आपल्या कष्टाचे....स्वप्नांचे
उत्साहाने........!
स्वप्न हिरवाईचे....बाईचे....पोरांचे....
पाखरांचे....,तुडवली जातात कधी अवर्षण तर
कधी गारपिटीच्या वादळाने.....! ठिगळे लावत
असता पून्हा फाटतं आभाळ डोक्यावरचं.....!

डोक्यावरचं ओझं कर्जाचं ....व्याजाचं.. सावकाराचं....
पिकल्या कणसाचं.... पोरीचं..! वाट पहात बसलेली
सुगीची....
भांबावलेली ...हिरमुसलेली....कोमेजलेली...
आकसलेली...पस्तावलेली.  तरी देते धीर बापाला
आश्वासक....!

आश्वासणे होतात मृगजळ शासनाची....
सावकाराची.....
सावकार होतात मोठे अन् घटत घटत नाहीशा
होतात सोयी सवलती....मार्गही जगण्याचे...!
डोळ्यापुढे अंधार.....दिसतो मार्ग फक्त
आत्महत्या....
दूर होतात नाती.....जवळ येतो फासाचा गळ
.. ... विहिरीचा तळ.....विषयाची कुपी....
दिवस फिरतात म्हणून......!

पण शेतकरी राजा,
बसलेले दिवस घर बांधत नाहीत....आले तसे
निघून जातात. ...भरते जखम भळभळती एकदा ...
फुंकर वेदनेवरी देऊन जातात.....
लक्षात ठेव,
संघर्षच जीवन घडवतो....संकटेच संधी देतात......
काटेरी वाट टाळतो माणूस पण काटेच
वाटेला बळ देतात....म्हणून...
म्हणून असं कधी खचू नको
मृत्युला कवटाळू नकोस...
मरणाने प्रश्न कधी सुटत नसतात
धैर्यानेच मार्ग गवसतात
मृत्यूने संपत काहीच नाही
जीवन इतके स्वस्त नाही
पोरकं कधी समजू नकोस
घराला पोरकं करू नकोस
आम्ही सारे पाठीशी राहू
वेळीअवेळी साथ देऊ
अनावश्यक खर्च टाळू
हौसेमौजेला आळा घालू
दारोदारी झाडे लावू
पाण्याचा थेंब थेंब वाचवू
शेतकरी नाही तर शेत नाही
शेत नाही तर पीक नाही
पीक नाही तर खाणार काय?
बळीराजाशिवाय जगणार काय?
हे बळीराजा,
प्रत्येक झगडा थांबविण्यासाठी नसतो...
पुनश्च सावरून उठण्यासाठी असतो....
म्हणून उठ राजा उठ,उठ मावळ्या उठ....
शिवाजीचा मर्दगडी तू, सरणावरूनी पुन्हा  उठ....!!!

लेखक संपर्क क्रमांक
९३२६६५६०५९



# एकोनव्वद

**डॉ.मेघश्री दळवी**
मुंबई

आपण संख्यांचा विचार करतो,तेव्हा ५, १०,५०, १०० अशा संख्या पटकन डोळ्यासमोर येतात. कोणी एखादी संख्या मनात धरायला सांगितली तर सहसा एक ते वीस मधल्या संख्या धरल्या जातात. या गडबडीत एकोणनव्वद ही संख्या मागेच पडते. एक तर उच्चारायला कठीण, वर कोणत्याही पाढ्यात येत नाही ती. त्यामुळेच एकोणनव्वद कधीही सहज आठवत नाही.

पण तरीही एकोणनव्वद ही एक खूप वैशिष्ट्यपूर्ण संख्या आहे. एकोणनव्वद ही दोन वर्गांची बेरीज करून दाखवता येते.

$८९ = ८^{२} + ५^{२}$

ती चार घनांची बेरीज करून दाखवता येते.

$८९ = २^{३} + ३^{३} + ३^{३} + ३^{३}$

आणि एक घन आणि एक चतुर्थ घात यांची बेरीज अशीही दाखवता येते. $८९ = २^{३} + ३^{४}$

याशिवाय एकोणनव्वदची आणखी एक गंमत आहे. पायथागोरसचं काटकोन त्रिकोणाचं प्रमेय तुम्हांला माहीत असेलच. त्यात काटकोन करणाऱ्या दोन बाजूंच्या वर्गांची बेरीज ही तिसऱ्याम बाजूच्या वर्गाइतकी असते. पूर्ण संख्या असलेल्या तीन बाजू जेव्हा या पायथागोरसचा सिद्धांतात बसतात, तेव्हा त्यांना पायथागोरसची त्रिकं म्हणून ओळखलं जातं. ३-४-५ किंवा ५-१२-१३ ही त्रिकं तुम्ही वापरली असतील. त्यातल्या ३९-८०-८९ या त्रिकामध्ये एकोणनव्वदने हजेरी लावलेली आहे.

एकोणनव्वद ही संख्या फिबोनाची मालिकेमध्ये देखील येते. आधीच्या दोन संख्यांची बेरीज करून पुढची संख्या,अशी ही फिबोनाची मालिका पुढे पुढे जात राहते. झाडांच्या फांद्यांची खोडाभोवतीची रचना किंवा सूर्यफुलाच्या केंद्रभागी असलेल्या बियांची मांडणी ही सर्पिल प्रकारची असते आणि त्यामागेही असते फिबोनाची मालिका.

शून्यापासून सुरुवात करून ०, १, १, २, ३, ५, ८, १३ या फिबोनाची मालिकेत पुढे गेलं की तुमची एकोणनव्वदशी भेट होईल. आता याच एकोणनव्वदने आपण एकला भागून बघू.

१/८९ = ०.०११२३५९५५०५६१७९७७५...

यातले सुरुवातीचे अंक ०, १, १, २, ३, ५ हे फिबोनाची मालिकेचे आहेत हे तुमच्या लगेचच लक्षात येईल. पण गंमत म्हणजे पुढच्या संख्याही फिबोनाचीमालिकेतल्या आहेत, फक्त त्या एकेकट्या नसून एकाखाली एक लिहून त्यांची बेरीज केलेली आहे.

०.०
०.०१
०.००१
०.०००२
०.००००३
०.०००००५
०.००००००८
०.०००००००१३
०.००००००००२१
..........

असं लिहीत गेलात आणि त्यांची बेरीज केली तर मिळेल ०.०११२३५९५५०५६१७९७७५... म्हणजेच १/८९. आहे ना मजा? आपल्याला वरवर खास वाटली नाही तरी एकोणनव्वद ही चित्तवेधकसंख्या आहे खरी.

आणि हो, आणि एकोणनव्वद आहे मूळ संख्या, म्हणजे तिला फक्त स्वत: आणि एक या संख्यांनीच भाग जातो. आता लक्षात आलं असेल ना, ती कोणत्याही पाढ्यात का दिसत नाही ते!

(संगणक व्यवसायात असून त्यांना गणितात विशेष रुची आहे. अनेक वर्षांपासून विविध मराठी प्रकाशनांमध्ये त्या विज्ञानकथा आणि विज्ञान लेखन करतात.)





# अद्‌भूत पक्षिविश्व

**उमेश वाघेला**
पुणे

रंग-रूप, सूर-ताल, आकार, अधिवास सगळ्या बाबतीत कमालीचे वैविध्य असलेल्या, निसर्गात प्रत्येकाची वेगळी आणि महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पक्ष्यांच्या निरीक्षणाने आनंद तर मिळतोच, पण त्याचबरोबर आपल्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासातही मोलाचा उपयोग होतो.

माणूस आज जे काही शिकला आहे किंवा जे-जे शोध लावले आहेत ते सगळे निसर्गनिरीक्षण करूनच. निसर्ग अभ्यासाची पहिली पायरी म्हणजे पक्षिनिरीक्षण होय. अगदी पक्ष्यांसारखे आकाशात उडण्याचे स्वप्न पाहणाऱ्या माणसाने पक्ष्यांना समोर ठेवूनच विमानाचा शोध लावला होता. राइट बंधूंनी विमान बनवण्याआधी अनेक देशांमध्ये अनेक संशोधक उडण्याचे वेगवेगळे प्रयोग करत होते. अगदी पक्ष्यांची पिसे वापरून त्याचे मोठे पंख तयार करूनही उडण्याचे प्रयत्न झाले आहेत. खरंच पक्षिविश्व इतके अदभुत आणि रम्य आहे, की लेखक कवी, गीतकार, संगीतकार, चित्रकार, शिल्पकार अशा अनेकांना अजरामर रचना करण्यास पौराणिक काळापासून प्रेरणा देत आले आहे. या पृथ्वीवर अशी एक इंच जागा नाही, जिथे पक्ष्यांची सावली पडली नसेल. आज जगात पक्ष्यांच्या सुमारे ८६०० प्रजाती असून उपप्रजातींसह मोजल्यास ३०००० एवढी आहेत. संपूर्ण भारत व लगतच्या देशांत पक्ष्यांच्या १३०१ प्रजातींची नोंद असून, भौगोलिक परिसरानुसार उपप्रजातींचा विचार केल्यास हा आकडा २४०० इतका आहे. आपल्या महाराष्ट्र राज्यात ५६८ पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद झाली आहे. जगात आढळणाऱ्या एकूण पक्ष्यांच्या प्रजातींपैकी १३ टक्के भारत व लगतच्या देशात आढळतात. आपला भारत देश विविध अधिवासाने संपन्न आहे. आपला भारत देश विविध अधिवासाने संपन्न आहे. समुद्रकिनारे, पश्चिम घाट आणि पूर्ण घाट, गुजरातचे खारट पण, राजस्थानचे वाळवंट, लद्दाखचे कोरडे वाळवंट, हिमालय आणि पायथ्याची जंगलं असे भौगोलिक वैविध्य आपल्या देशाला लाभले आहे, त्यामुळे पक्ष्यांचेही वैविध्य मोठे आहे.

पक्षिनिरीक्षण हा 'शून्य' पैसे खर्च येणारा जगातला लोकप्रिय छंद आहे. निरीक्षणाची सुरूवात अगदी आपल्या घरापासूनच करू शकतो. अधिवासानुसार पक्ष्यांचे खाद्य आणि प्रकार बदलत जातात. मनुष्यवस्त्यांवर अवलंबून असलेले पक्षी म्हणजे चिमणी, कावळा, साळुंकी, घार, गव्हाणी घुबड व असे अनेक आहेत. मनुष्यवस्ती सोडल्यास चिमणी इतरत्र कोठेही दिसत नाही. बागा व उद्यानात दिसणारे सूर्यपक्षी, दयाळ, शिंपी, चिरक, ब्राम्हणी मैना, पोपट असे अनेक गोड गाणारे पक्षी आहेत. माळरानावर दिसणारे शिक्रा, ससाणे, गरूड, खार, साप, उंदीर छोट्या पक्ष्यांची शिकार करून त्यांच्यावर नियंत्रण ठेवतात. शेती परिसरात खाटिक, कोतवाल व इतर पक्षी टोळ, खंडोबाचा घोडा कीटकांचा समाचार घेत असतात. पाणथळ अधिवासात ओढे-नाले, नद्या, तलाव, दलदल या ठिकाणी बदक आणि बगळ्यांचे अनेक प्रकार थापट्या, खंड्या, मीनखाई घार, टिबुकली, वारकरी, तुतवार व खारफुटीची जंगलं आणि समुद्रकिनारी अग्निपंख, समुद्री गरूड यांसारखे अनेक पाणपक्षी असतात.

पक्षी ही निसर्गात होणाऱ्या बदलांना त्वरित निर्देशित करतात. एखाद्या पाणवठ्यावर दिसणारा शेकाट्या ते पाणी प्रदूषित झाल्याचे निर्देशित करतो, तर छोटे मासे खाणारा खंड्या त्या पाण्यात असलेले जलजीवन उत्तम आहे, असे दर्शवतो. अनेक पक्षी फुलांमधला मकरंद पिऊन परागीवहनाची मोठी भूमिका बजावतात. घुबड, ससाणे यांसारखे पक्षी उंदरांना खाऊन धान्य वाचवून आपल्यावर मोठा उपकार करत आहे. आपल्या देशात उंदीर जितके धान्य फस्त करतात, त्यातून दहा कोटी लोकांची पोटं भरता येईल. उंदरांच्या एका जोडीला संरक्षण दिल्यास त्यांची पिलावळ वर्षभरात ८८८ एवढी होऊन जाते, कारण तीन आठवड्यांची झालेली पिल्ले प्रजननक्षम होऊन जातात. पक्ष्यांमार्फतच वड, पिंपळ, पायर यांसारख्या अनेक झाडांचा बीजप्रसार फक्त पक्ष्यांनी ती फळं खाऊन विष्ठा केल्यावरच होऊ शकतो. आपण अशा झाडांच्या कितीही बिया लावल्या तरी त्यास अंकुर फुटत नाही. वड, पिंपळ आणि कडुलिंब हे सर्वाधिक प्राणवायू तयार करणारे निसर्गाचे कारखाने आहेत. पूर्ण वाढलेले एक पिंपळ रोज कार्बन डाय ऑक्साइड शोषून १८ माणसांना पुरेल इतका ऑक्सिजन अर्थात प्राणवायू तयार करते. एका माणसाला रोजी किमान तीन सिलिंडर एवढा ऑक्सिजन लागतो. एका ऑक्सिजन सिलिंडरची किंमत साधारण रू.१०००/- असल्यास आपल्याला वर्षभरात एक झाड किती रूपयांचा प्राणवायू विनामूल्य देतात, त्यामुळे आपल्यासाठी झाडे, झाडांसाठी पक्षी

वाचवायला पाहिजे. एकदा नष्ट झालेले जंगल आपल्याला तयार करता येत नाही. पण ते पक्षीच करू शकतात, म्हणून पक्ष्यांचे संवर्धन होणे अतिशय महत्त्वाचे आहे.

पक्ष्यांवरून आपल्याकडे पावसाचे, हिवाळ्याचे फार पूर्वीपासून भाकीत केले जात आहे. पावश्या पक्ष्यांचा पेरते व्हा, पेरते व्हा आवाज ऐकू आला, की पावसाळा जवळ आल्याचे मानतात. तर आफ्रिकेतून स्थलांतर करून येणारा चातक पक्षी दिसल्यास पावसाळा सुरू आणि सायबेरियावरून येणारा धोबी पक्षी आला, की पावसाळा संपला आणि हिवाळा सुरू. हिवाळ्यात युरोप, रशिया, सायबेरिया, मंगोलिया या देशांत हिमवृष्टी झाल्यावर जमीन बर्फाने झाकली जाते, तळी गोठतात त्यामुळे पक्ष्यांना खायला मिळत नाही, म्हणून ते दक्षिणेकडच्या उबदार असलेल्या भारत येतात. या स्थलांतरित पक्ष्यांमधे चिमणीएवढ्या तांबूल नावाच्या पक्ष्यापासून ते सारस कुळातला कुरंग पक्षीही असतो. यांच्या वाटेत मोठा हिमालय पर्वत लागतो. पटकादंब नावाचे हंस पक्षी मंगोलियावरून येताना जगातला सर्वात उंच पर्वत एव्हरेस्टपेक्षाही जास्त उंचीवर उडत येतात. हिवाळ्यात या पक्ष्यांचे निरीक्षण करणे म्हणजे एक सुखद पर्वणीचे असते. स्थलांतर करून येणाऱ्या एकूण पक्ष्यांमध्ये सुमारे ३० % पक्षी पाणपक्षी असातत. दरवर्षी नवीन पक्षिनिरीक्षकांनी पाणवठ्याला भेट दिल्यास सुरूवात उत्तम होईल.

पक्षिनिरीक्षणाचे फायदे:

निरीक्षण शक्तीत वाढ होते, एकाग्रता आणि धैर्यात वाढ होते, रंगांचे ज्ञान वाढते, निसर्ग व पर्यावरण क्षेत्रांत उच्चशिक्षण घेण्यासाठी उपयोग होतो, सुजाण नागरीक बनता येते, मन प्रसन्न राहून सकारात्मक जीवनशैली जगता येते,

पक्षिनिरीक्षणाच्या टिप्स :

भडक, चटकदार कपडे घालू नका, ज्या परिसरात जाणार असाल त्याला मिसळून जातील, असे कपडे घालावे. उदा. दाट झाली असलेल्या जंगलात हिरवट रंगाचे तर माळरान परिसरात मळखाऊ किंवा मातकट रंगाचे कपडे घालावेत, मोठ्या संख्येने निरीक्षणास जाऊ नये. दोघं-तिघंच असावेत एका ग्रृपमध्ये, गडबडगोंधळ करू नये, मोठमोठ्याने बोलू नये. शक्यतो न बोलता खाणाखूणा करून आपसात संवाद साधावा, पक्ष्यांच्या मागे धावू नये, त्याऐवजी एकाच ठिकाणी शांत बसून रहावे. पक्ष्यांना विश्वास बसला, की ते हळूहळू जवळ येतात, मात्र त्यांना डिवचू नये, एखादी चांगली दुर्बीण घ्यावी, त्यामुळे पक्ष्यांची बारीकसारीक माहिती टिपता येते. आज दिसलेल्या पक्ष्यांची माहिती एका वहीत नोंदवून ठेवा. त्यात पक्षी कुठे होता? झाडावर, जमिनीवर की पाण्यात? काय करत होता? चरत होता, फळं खात होता, की किडे का घरटे बनवण्यासाठी साहित्य जमवत होता? निरीक्षणाचा दिनांक,वेळ,स्थळ नोंदवून ठेवा. पुन्हा काही दिवसांनी तो पक्षी परत त्या ठिकाणी कधी दिसला ते पहा, साप-विंचूपासून सुरक्षेसाठी पायांत बूट, डोक्यावर उन्हापासून वाचण्यासाठी टोपी, किडे-कीटकांपासून रक्षणासाठी अंगावर फुल पॅन्ट-शर्ट तर मुलींनी चुडीदार घालावा., सोबत पिण्याच्या पाण्याची बाटली व खाऊच डबा घ्यावा. मात्र पक्ष्यांना आपले खाद्य खायला घालू नये. तिथे प्लॅस्टिक किंवा कोणताही कचरा करू नये., पक्षिनिरीक्षणाची आदर्श वेळ म्हणजे सकाळी ६.३० ते ८.३० तर संध्याकाळी ४ ते ६ अशी आहे. हिवाळ्यात स्थलांतरित पक्षी येत असल्याने आदर्श ऋतू मानला जातो.

चलातर मग हिवाळा आलाच आहे. सुरू करूया पक्षिनिरीक्षण. माझ्यातर्फे तुम्हां सर्वांना हॅपी बर्डिंग .''

लेखक संपर्क क्रमांक
९८८११०१५४१



''हीच तर म्हणाली शेठजी, नऊ माशांत हाताची अंगठी होईल म्हणून!''



अल्पबचत मोहिम!



# मना घडवी संस्कार

**रविंद्र मांजुलकर**
नाशिक

सुसंस्काराची शिदोरी घेऊन माणूस अनेक संकटांना हसत-हसत सामोरा जात असतो म्हणून 'मन घडावी संस्कार' असे म्हटले जाते. संस्कृती आणि सभ्यता या दोन गोष्टींमधला सुवर्णमध्य किंवा दुवा आहे सुसंस्कार !

माणसाने निर्माण केलेल्या आणि नंतरच्या पिढीने संरक्षित आणि संवर्धित केलेल्या ऐतिहासिक बाबींचा समावेश संस्कृतीत होतो, तर टापटीप आणि चैनीसाठी निर्माण केलेल्या भौतिक बाबी म्हणजे सभ्यता ! आज आपण संस्कृतीपेक्षा सभ्यतेवर जास्त भर देत आहोत. कारण प्राचीन भारतातील आणि जगातील उल्लेखनीय ऐतिहासिक स्थळं केवळ उधळपट्टीद्वारे मजा करणारी टाईमपासची ठिकाण बनली आहेत. सभ्यतेचा बुरखा पांघरून आपण सभ्यतेची पाळमुळं रुजवतोय; म्हणून माणसाला 'सुसंस्कार'च माणुसकी, सहकार्य, राष्ट्रीय साधनसंपत्तीची जपवणूक शिकवणार आहेत. वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार, विषमता, अमानुषपणा, संशय, हिंसाचार, व्यसन, जातीय दंगली, बॉम्बस्फोट, दहशदवाद यांसारख्या अनैतिक गोष्टी केवळ सुसंस्काराच्या अभावामुळेच घडत आहेत. आज माणसाचा सख्ख्या भावा-बहिणीवर विश्वास राहिला नाही. आईवडिलांसारखी पवित्र नाती अनीतीमुळे बदनाम होत आहेत. 'लहान मूल म्हणजे मातीचा गोळा, आकार द्यावा तशी मूर्ती घडते !' यासारखे सुविचार केवळ शाळेच्या भिंतीवर नावापुरते दिसत आहेत, ज्यांच्यापासून संस्कार, आदर्श घ्यावेत, तेच आदर्शांची, संस्कारांची पायमल्ली करीत आहेत. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनून सर्वसामान्यांच्या मानगुटीवर बसला आहे, एवढं सगळं सांगायचं कारण म्हणजे सर्वसामान्य माणसाचं जीवन कुत्र्या मांजरासारखं, फुलं आणि फुलपाखरांसारखं क्षणभंगुर झालं आहे.

राजकारणी, गुन्हेगार सर्वसामान्यांच्या जिवावर आपली पोळी भाजून घेत आहेत. राष्ट्र आणि समाज केवळ मेंढरांचा कळप झाला आहे. सुसंस्काराअभावी विदारक आणि भयावह दाहक असं वास्तव समोर आ वासून उभं आहे, याला उत्तर आणि रामबाण औषध एकच, ते म्हणजे सुसंस्काराची जपवणूक आणि शिकवणूक.

भारताचं स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आणि सर्वसामान्यांना दोन वेळची हक्काची सुखाची भाकर मिळवून देण्यासाठी, त्यांचा जगण्यावरचा विश्वास दृढ करण्यासाठी आपण सारे सुसंस्काराची शिदोरी बाळगूया..

'सोबतीला चंद्र देतो,
अंतरीचा ध्यास देतो,
तुम्ही जिथे जाल तेथे
मी विश्वास देतो...!'

असा अढळ विश्वास आईवडिलांचा मुलांवर, मुलांचा माता-पित्यावर, भावाबहिणीचा एकमेकांवर, पती-पत्नीचा परस्परांवर, पुढाऱ्यांचा जनतेवर आणि जनतेचा लोकशाहीवर असला पाहिजे. सुसंस्काराच्या माध्यमातून ज्ञानाची कवाडं सताड उघडी झाली पाहिजेत. जन्मानंतर पालक, शिक्षक, समाजशिक्षक, विवाहानंतर जोडीदार, वृद्धापकाळी नातवंडं हे सुसंस्कारांचे विविध काळातील विश्वासचक्र, ज्ञान आणि सांस्कृतिक, वैचारिक, आर्थिक, सामाजिक शैक्षणिक जाणीव जागृत करणारे असावेत.

लहानपणीच दुसऱ्यांच्या वस्तू घेऊ नये, चोरी करू नये, मनावर ताबा ठेवावा, चांगल्या सवयी लावाव्यात, वडीलधाऱ्यांच्या मान राखावा, झोपेतून उठल्यावर रात्री झोपेपर्यंत साऱ्या चांगल्या बाबी मनापासून कराव्यात, दुसऱ्यांचे वाईट चिंतू नये यांसारख्या चांगल्या सवयी लावल्या तर तरुणपणी व नंतरही वाईट विचारांचा स्पर्श होणार नाही, किंबहुना चांगल्या वाईटाची समज वेळीच येईल. योग्य वय, काळ आणि वेळेत सर्व गोष्टी घडल्या पाहिजेत. सरकारने आणि बऱ्याचशा सवलती दिल्या असल्या तरी सर्वसामान्यांतील किती लोकांनी त्यांचा उपयोग आपले, पर्यायाने आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे भले करण्यासाठी केला आहे, याची जाणीव ठेऊन समाजात उदबोधनाचे पवित्र कार्य आपण सुसंस्काराच्या माध्यमातून प्रामाणिकपणे केले पाहिजे. आपल्या अंगी उपजत असलेल्या कलागुणांची जोपासना करण्यासाठी योग्य आणि आश्वासक पावलं उचलणं ही काळाची गरज आहे. 'उद्योगाचे घरी, देवता लक्ष्मी वास करी' ही उक्ती ठरविणारे चांगले संस्कार केवळ आपलंच नव्हे तर विश्वाचं कल्याण करतील. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी विश्वाच्या कल्याणासाठी मागितलेले 'पसायदान' सुसंस्कारांची मौल्यवान अशी खाण आहे. भारतभूमीच्या पोटी जन्माला आलेल्या प्रत्येकाला जन्मापासून ही संस्कृती दुसऱ्याला वाचविण्यासाठी, प्रसंगी स्वतःच्या प्राणाची आहुती देणारी भूतदया शिकवते, ती केवळ सुसंस्कारांमुळेच !

लेखक संपर्क क्रमांक
९८५०८६६४८५

KATHA

# भुऱ्या

**प्रा.किरण दशमुखे**
सटाणा-नाशिक

परिपाठाच्या वेळी माझ्या वर्गाच्या रांगेकडे माझं लक्ष गेलं. रांगेत सर्वात शेवटी उभ्या असलेल्या भुऱ्याची अन् माझी नजरानजर झाली. माझी नजर चुकवत भुऱ्या त्याच्या पुढील मुलामागे शक्य तेवढा लपण्याचा प्रयत्न करीत होता. तर जवळ पास महिनाभरानंतर एखाद्या धुमकेतूसारखा भुऱ्या आज उगवला याचे मला आश्चर्य वाटत होते. महत्वाचे म्हणजे त्याचा शोध घेऊनही तो मला सापडला नव्हता आणि आज अचानक असा दत्तक म्हणून उभा.

भुऱ्या गावाबाहेर पाल ठोकून राहणाऱ्या एका ठिकाणाहून येत होता. त्याचे वडील असेच काही तरी फुटकळ काम करायचे. रानात जाऊन लावऱ्या पकडून आणायचे. त्याची आई गावात घरोघर फिरून विकायची. यातून मिळणाऱ्या पैशात त्यांचा उदरनिर्वाह चालायचा. इतरवेळी जोडधंदा म्हणून भुऱ्याचे वडील म्हशी भादरण्याचे काम करायचे. ते ही नाही मिळालं तर गल्लो गल्ली आरोळ्या ठोकून विळी, चाकू, कात्री यांना धार लावून द्यायचे. तळहातावर पोट घेऊन फिरणारं असं हे कुटूंब होतं.

साधारण जूनच्या शेवटाला त्याची आई त्याला माझ्याकडे शाळेत घेऊन आली होती. तिला बिचारीला आपल्या मुलाने लिहिण्या-वाचण्यापुरती तरी शाळा शिकावी असं वाटत होतं. त्यांच्या घरात मात्र कुणालाच लिहिता वाचता येत नव्हतं. त्यांच्या कित्येक पिढ्यांनी शाळेचं तोंड देखील पाहिलेलं नव्हतं.

मी भुऱ्याला पहिल्या इयत्तेत प्रवेश दिला. माझ्याकडे असलेली नवी पुस्तके दिली. पण मात्र त्या कशाचाच आनंद त्याला झाला असं मला जाणवलं नाही. अन्यथा शाळेतून नवी पुस्तके मिळाली की मुले आनंदी होतात. त्या पुस्तकाचे मुखपृष्ठ न्याहळतात. काही मुले हळूवारपणे पुस्तकावरून हात फिरवतात कुणी वास देखिल घेऊन पाहतं. नव्या पुस्तकाचा वास सुंदर येत असतो. पण यातील कुठलीच प्रतिक्रिया भुऱ्याकडून उमटत नव्हती. तो अगदी मख्खपणे वागत होता व जसे काही चोराला पकडून तुरूंगात आणावे तशी त्याची अवस्था झाली होती. त्याचे नाव विचारले तर ते ही त्याला सांगता येत नव्हते. फक्त भुऱ्या एवढंच सांगायचा. त्याच्या आईला तरी कुठे त्याचे नाव संबंध सांगता आले होते. मी पूर्ण नाव सांगा असं सांगितल्यावर ते काय असतं म्हणाली अन् विचारात पडली. तेव्हा मी जरा युक्तीने भुऱ्याच्या बापाचे नाव विचारले. आता मात्र ती माऊली जरा लाजली. अन् पतीचं नाव कसं घ्यायचं या विचारात पडली. परंतु शाळेत नाव दाखल करतांना मुलाचं नाव, बापाचं नाव, आडनाव लिहावं लागतं हे सांगितल्यावर तिने भुऱ्याच्या बापाचं नाव संकर असं सांगितलं. आडनाव विचारल्यावर काळे म्हणाली. मी भुऱ्याचे नाव भुऱ्या असे लिहितांना बरे वाटत नाही म्हटल्यावर त्याची आई म्हणाली, ठेवा मास्तर तुमीच काही भी नाव ठेवून द्या त्याचं. आम्ही तरी कुठं बुकं शिकलेली । बघा तेवढं गरीबाचं लेकरू आहे, घ्या पदरात.

मी भुऱ्याकडे निरखून पाहिलं. पोरगं मात्र गोरंपान होतं. मी त्याचं नाव गणेश असं ठेवलं. भुऱ्याच्या खानदानात लेखनाचा श्रीगणेशाच मुळी भुऱ्या पासून होणार होता म्हणून गणेश असं नाव ठेवलं.

गणेश शंकर काळे, रजिस्टर नावाची नोंद लागल्यानंतर भुऱ्याची आई लक्ष ठेवा मास्तर असं सांगून हात जोडून निघून गेली. मी भुऱ्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु भुऱ्याला माझी भाषाच समजत नव्हती. आई वडील आणि भोवतालचे जात बांधव यांच्यातच राहण्याची त्याला सवय होती. आपल्या सारखी प्रमाणभाषा त्याने कधीच ऐकलेली नव्हती. यामुळे मुलांमध्ये तो फारसा मिसळत नव्हता. भाषेची अडसर वाटत असल्याने तो तोंडही उघडत नव्हता. पहिलाच दिवस असल्याने मी भुऱ्याला अधिक काही प्रश्न विचारले नाही. रूळेल हळू हळू म्हणून मी नेहमी प्रमाणे वर्गात शिकविण्यास सुरूवात केली. अधून मधून माझं लक्ष भुऱ्याकडे जातच होतं. भुऱ्याच्या मनात चाललेले आंदोलनं मला जाणवत होते. पिंजऱ्यात वाघ पकडून ठेवावा आणि त्याने बाहेर पडण्यासाठी जशी धडपड करावी तशी भुऱ्याच्या मनात तगमग चालली होती. मात्र बाहेर कंपाऊंडला कुलूप लावलेले असल्याने आणि माझ्यासकट सर्व मुलांचे भुऱ्याकडे लक्ष असल्याने त्याला पळता येत नव्हते.

मधली सुट्टी झाली. सर्व मुले जेवणासाठी मैदानावर झाडाखाली जमली. मुलांना शाळेकडून मोफत खिचडी देण्यात येत होती. भुऱ्या मोठ्या चपळाईने खिचडी घेण्यासाठी रेटारेटी करून रांगेत घुसला. त्याने सोबत आणलेल्या पिशवीतून एक डबा काढला आणि खिचडी घेतली. आता मात्र भुऱ्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव मला

उमटलेले दिसत होते. मी त्याच्या नकळत त्याचे निरीक्षण करीत होतो. आता माझ्या लक्षात आलं, भुऱ्याला नव्या कोऱ्या पुस्तकापेक्षाही गरम गरम खिचडीचं महत्त्व अधिक होतं. किंबहुना खिचडी खाण्यासाठीच तो शाळेत आला होता. सर्व मुले खिचडी खाऊन झाल्यानंतर वर्गात येऊन बसली. मात्र भुऱ्या काही नजरेस येत नव्हता. शाळेच्या आवारात त्याचा शोध घेतला पण त्याचा पत्ता लागला नाही. खिचडी पोटात पडल्यानंतर तो कंपाऊंडवरून उडी मारून घरी पळून गेला होता. परत दुसऱ्या दिवशी त्याची आई त्याला शाळेत सोडवायला आली. मी त्याच्या आईला तो काल शाळेतून पळून गेल्याचे सांगितले. तिनेही फारसे मनावर घेतले नाही. आता माझ्या लक्षात आले होते, भुऱ्याचा शाळेत येण्याचा उद्देश केवळ पोटाची भूक भागवावी हाच होता. भुऱ्याच्या कुटूंबाविषयी थोडी अधिक माहिती घेतल्यानंतर मला कळलं, त्यांच्या जमातीत उंदीर, मांजर, चिमण्या, लावऱ्या इ.मारून खातात. भूकेसाठी रानात मिळेल ते खाणारी ही जमात होती. त्यांच्या दृष्टीने तांदळाची खिचडी मिळणे म्हणजे मोठ्या सणाच्या जेवणासारखे होते. शाळेत मुलांना खिचडी मिळते हे कळल्यामुळेच भुऱ्या शाळेत येत होता. मात्र कितीही समजावून सांगितले, धाक दाखविला तरी भुऱ्या नजर चुकवून मधल्या सुट्टीनंतर शाळेतून पळूनच जायचा. बऱ्याचदा त्याला दप्तराचीही गरज लागत नव्हती. ते तसेच शाळेत पडून रहायचे.

भुऱ्याचा आपल्या आईमध्ये मात्र फार जीव होता. तिच त्याची एकमेव प्रेमाची व्यक्ती होती. बऱ्याचदा भुऱ्या आपल्या आईसाठी डब्यात खिचडी उरवून नेतांना मी पाहिले आहे. तेव्हापासून मी खिचडी वाढणाऱ्या बाईंना त्याला दोनदा जास्त खिचडी देण्याची सूचना केली होती. भुऱ्या सकाळी नियमित शाळेत येत होता. कधी पळण्याची संधी मिळाली नाही तर पूर्ण वेळ शाळेत बसत होता. मात्र अभ्यासात लक्ष देण्याऐवजी तो खिडकीतून किंवा दरवाजातून बाहेर आकाशाकडे पहात रहायचा. चार भिंतीच्या शाळेऐवजी त्याला निसर्गातील शाळा हाक मारतेय असं वाटत रहायचं. वर्गात इतर मुलांशी भुऱ्या खूप आक्रमक वागायचा. आपल्याशी कुणी प्रेमाने वागू शकतं याची त्याला खात्रीच नव्हती. काही वेळा तो मुलांच्या दप्तरातील साहित्य चोरून त्याच्या बॅगमध्ये ठेवायचा. एकदा त्याने एका मुलीकडे नवी कंपासपेटी पाहिली. त्याला ती खूप आवडली. मधल्या सुट्टीनंतर त्याने ती कंपासपेटी चोरून नेली. दुसऱ्यादिवशी त्याच्या आईने मला ती कंपासपेटी परत केली. भुऱ्याचे हे वर्तन बघून मी त्याला एक नवी कंपासपेटी आणून दिली. ते पाहून भुऱ्याचे डोळे क्षणभर लकाकले. त्याला आता माझ्या विषयी प्रेमाचा विश्वास आला. हळू हळू भुऱ्या शाळेत रमू लागला होता. मी मुलांना भुऱ्याच्या अनुपस्थितीत त्याची परिस्थिती समजून सांगितल्यावर मुलेही त्याच्याशी प्रेमाने वागत होती. भुऱ्या हळू हळू मानसाळू लागला होता. मुलांमध्ये रमू लागला होता. त्याच्या सामाजीकरणाला आता कुठे सुरूवात झाली होती.

कधीही शाळेचं तोंड न पाहिलेल्या घराण्यातून आलेला भुऱ्या आता नियमित शाळेत येऊ लागला होता. अ,आ,इ शिकू लागला होता. १ ते १० अंक लिहू वाचू लागला होता. या गोष्टीचा मला व माझ्या वर्गातील सर्वच मुलांना खूप आनंद वाटत होता.

परंतु एक दिवस अचानक भुऱ्या शाळेत आलाच नाही. दोन दिवस तीन दिवस चांगले आठ दिवस झाले तरी भुऱ्या शाळेत येत नव्हता. नेमके काय झाले ते पहावे म्हणून मी त्याच्या गावाबाहेरील वस्तीवर गेलो. तेथे चार पाच कुटुंब पाल ठोकून रहात होते. भुऱ्या शंकर काळे याचा तपास केला तेव्हा कळलं भुऱ्याच्या बापाने त्याच्या आईला दारूच्या नशेत रॉकेल टाकून जाळले होते. ती बऱ्याच मोठ्या प्रमाणात जळाली होती. आजूबाजूच्या पालवाल्यांनी तिला सरकारी दवाखान्यात नेले होते. आणि अखेर त्यात तिचा अंत झाला होता. भुऱ्याच्या बापाला पोलिस घेऊन गेले होते. भुऱ्याला त्याचा मामा आपल्या घरी घेऊन गेला. भुऱ्यामध्ये माझ्यासकट वर्गातील सर्व मुलांनी खूप स्वप्न पाहिले होते. गतानुगतिक काळापासून अक्षरशत्रू ठरलेल्या जमातीतील भुऱ्याला लिहा वाचायला शिकवायचे, खूप शहाणे करायचे हे आमचे स्वप्न पूर्णपणे भंगून गेले होते. मी खूप निराश झालो. आजूबाजूचे लोक मला भुऱ्या रहात होता ती पालाची जागा दाखवत होते. ते जळून खाक झाले होते. माझ्या डोळ्यापुढे भुऱ्या उभा रहात होता. मी हताशपणे शाळेत परत आलो. संपूर्ण वर्गाला भुऱ्याची व्यथा समजली. माझ्यासकट मुलांना खूप हुरहुर वाटत होती. परंतु आता भुऱ्याची आणि आपली भेट होणे शक्य नव्हते. भुऱ्या आमच्यापासून कायमचा दूर निघून गेला होता. त्याची आई त्याच्यापासून काळाने हिरावून नेली होती. भयानक दारिद्र्य, व्यसनाधिनता, निरक्षरता याचा भुऱ्या बळी ठरला होता...

लेखक संपर्क क्रमांक
९४२०८८९५७५



# एक होतं गाव...

**संभाजी पाटील**
तमगव्हाण,जळगांव

'सावकारवाडी' नाव जरी श्रीमंत वाटत असलं तरी परिस्थितीनं गांजलेली,भूमीहीन,अल्पभूधारक , रोजंदारीनं काम करणारी ,सहा महिने लेकराबाळांसह गाव सोडून परागंदा होणा-या ऊसतोडणी कामगारांचीच संख्या अधिक होती.हातावर मोजण्याइतके लोक सोडले तर सगळं गाव  स्थलांतर करणारं.घराच्या कुलूप लावून, कुत्री, गुरंढोरं आपल्या घराच्या ओसरीवर येऊ नये म्हणून तिथं काटे टाकून जात.पावसाळ्याच्या तोंडावर सगळे गावी परतायचे तेव्हा वाडी गजबजलेलं 'गाव' वाटायचं.सगळी माणसं प्रामाणिक आणि कष्टाळू तशीच देवभोळीही.मागील वर्षीच चौकात मंदिर बांधायला वाडीनं पंचवीस लाख रुपये जमवले.पंचक्रोशीत नसेल असं भव्य मंदिर उभं राहिलं.स्वच्छता,आरोग्य आणि शिक्षणाबाबत मात्र वाडी उदास होती.स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणाचे तीन-तेरा होत.पावसाळ्यात घरोघरी माणसं आजारी पडत.कर्ज काढून दवाखाना भरायचे आणि कर्ज फेडायला पुन्हा गाव सोडायचे .हा दुर्दैवाचा फेरा काही टळत नव्हता.काय करावं ?गावाचं पुण्य तर कमी पडत नव्हतं

**रामकथा**

ङ्सावकार'वाडीत यावर्षी गीतरामायणावर आधारित 'राम कथा'सादर होणार ही बातमी वा-यासारखी गावभर पसरली. शेतात,बांधावर,आडावर, पारावर,शाळेत,गल्लीत सगळीकडे एकच चर्चा -गावात 'राम कथा 'सादर होणार आणि राम कथेतील पात्रं वाडीतीलच असणार.आता लहान पोरांपासून,तरुण, म्हाता-यांना सुद्धा आपण रामकथेत स्वत: भाग घेतल्याची स्वप्नं पडू लागली.सावकार वाडीत एवढा मोठा कार्यक्रम होणार म्हंटल्यावर अबालवृद्ध तयारीला लागले. तसे मदतीला सगळेच नेहमी तयार असायचे.म्हातारी माणसं आता सल्लागार मंडळात होती तर तरुण मंडळाने नियोजनात आघाडी घेतली होती.'राम कथा' कार्यक्रम समितीची घोषणा झाली.बँनरवर फोटो छापून आले आणि मंडळी अधिक जोरात कामाला लागली. पहिलं काम म्हणजे कार्यक्रमाला लागणारा निधी जमवणे. कार्यकर्ते घरोघर फिरले.ज्यांचं हातावर पोट होतं त्यांनी सुद्धा देवाच्या कार्याला हात आखडता घेतला नाही. परिस्थिती प्रमाणे जास्तीत जास्त निधी देऊन प्रत्येकाने आपला सहभाग नोंदवला. नोकरीच्या निमित्तानं गावची काही मंडळी बाहेरगावी होती त्यांना फोन गेले.'गावात पहिल्यांदाच 'राम कथा' होत असून आपल्याकडून भरघोस मदतीची अपेक्षा आहे.'

स्वत:च्या मासिक नियोजनात काटकसर करुन सगळ्यांनी मदत पाठवली.सहा लाखांपर्यंत निधी जमा झाला.देवाच्या कार्याला कधीच कमी पडत नाही. ही श्रद्धा.

भावी लोकप्रतिनिधी सुद्धा गावात येऊन गेले.कार्यकर्त्यांना भेटून 'भंडा-याची पंगत' माझ्याकडून हे सांगून गेले.रामकथेसाठी नावाजलेल्या महाराजांचा शोध सुरु झाला.शहरात मागील वर्षी ज्यांनी पूज्य रामभाऊ महाराजांच्या भक्तीमय रसाळ वाणीतून कथा ऐकली होती.त्यांनी रामभाऊंच्याच नावावर शिक्कामोर्तब करायला लावलं.

मारुती मंदिराच्या पटांगणावर भव्य मंडप उभारण्यात आला.आता जो तो 'तो' दिवस कधी येईल याचीच वाट पहात होता.

आज पूज्य रामभाऊ महाराज गावात येणार होते.केवढा उत्साह! सडा, रांगोळ्या,गुढ्या आंब्याची पानं,नारळाच्या झावळ्यांनी सजवलेल्या कमानी.महाराजांच्या स्वागताला वेशीवर शेकडोंनी महिला डोईवर तुळस,कलश घेऊन हजर होत्या तर तरुणांच्या पथकानं मोटारसायकल रँली काढून महाराजांना वेशीवरच सलामी दिली.महाराजांसाठी खास निवास ,भोजन व्यवस्था करण्यात आली.

पंचक्रोशीतील गावांना निरोप गेले.लोक बैलगाड्या,दुचाक्या घेऊन येऊ लागले. रामकथेच्या निमित्तानं गावात दिवाळी आली.पोतं भरुन साखरेची बुंदी गाळण्यात येऊन जेवणासाठी दररोज वेगवेगळा मेनू ठरवण्यात आला होता.रामकथा पूज्य रामभाऊ महाराजांच्या तोंडून ऐकणं म्हणजे पर्वणीच होती. कान ऐकून तृप्त होत होते आणि पोट जेवून.पहिल्या दिवशी बालकांड,अयोध्याकांड सादर झाली.गीत रामायणातली गीतं आणि प्रत्यक्ष राम,लक्ष्मण, सीता, दशरथ, वानरसेना. रामायणातली सगळी पात्रं सावकार वाडीतल्या घरा घरात अवतरल्यामुळे वाडी 'रामराज्य' अनुभवत होती.

काय आवाज!काय शब्दफेक!अख्या गावावर महाराजांनी मोहिनी घातली.

**बबन्याची धम्माल!**

अरण्यकांडात

'जेथे राघव तेथे सीता.....' म्हणत सीताही रामासोबत वनवासात

गेली.तेव्हा सगळ्या सावकारवाडीतल्या सीतांनी कधीच नव-याला सोडून जायचं नाही असं मनोमन ठरवून टाकलं.

राम,लक्ष्मण,सीता, वनवासात असतांना एक अभद्र गोष्ट घडली.

'या इथे लक्ष्मणा बांध कुटी....' हे गाण्यात महाराज तल्लीन झाले असतांनाच लक्ष्मणाचं पात्र करणा-या किसनरावांच्या बबन्याचं पोट कळ मारायला लागलं. सगळा मेकप झालेला.आता याला स्टेज वरुन बाहेर कसं आणि कुठं न्यायचं ?कथेचं काय होणार ?या कल्पनेनंच कार्यकर्त्यांच्या पोटात खड्डा पडला.नाव 'सावकारवाडी' असलं तरी गावात एकही संडास बांधला नव्हता.

**नाव मोठं,लक्षण खोट**

पोटात गडबड झाली म्हणल्यावर बबन्याला शौचासाठी पांदीच्या लय पुढे शिवारात न्यावं लागणार होतं कारण गावच्या पुर्वेकडचा आणि पश्चिमेकडचा रस्ता हे दोन्ही महिलांसाठी राखीव होते.सकाळी लवकर आणि रात्री अंधारात बायका गावाजवळच बसायच्या.सगळीकडे घाणीचं साम्राज्य.दुपारच्याला पोटात काही गडबड झालीच तर थांबायचं, अंधार पडायची वाट पहात.

शेजारच्या गावानं मागील वर्षी ग्रामस्वच्छता अभियानात राज्यात दुसरा क्रमांक मिळवला होता; पण आमच्या वाडीत शौचालय बांधायचं आणि घराशेजारी ?हे लय वंगाळ समजलं गेलं.

शीशी....

तर लक्ष्मण झालेल्या बबन्याच्या पोटात कळा यायला सुरुवात झाली.काहीही करुन त्याला बाहेर घेऊन जावंच लागणार होतं.एक जण बाबांच्या कानात कुजबुजला.एकानं हळूच बबन्याला स्टेज वरुन खाली घेतलं अन् धरुन त्याला पांदीकडं नेऊ लागला तर शाळकरी पोरं त्या लक्ष्मणाच्या वेशातल्या बबन्या मागं लागली.महाराजांनी मधल्या काळात वेळ मारुन नेण्यासाठी दोन-तीन देशभक्तीची गाणी म्हंटली.लोकांना छान वाटलं.

श्रावण महिना असल्यामुळे अधुनमधून पाऊस पडत होताच.सगळीकडं चिखल झालेला. पांदीच्या पुढंच्या बांधावर बबन्या मोकळा झाला अन् धोतर नेसण्याच्या नादात चिखलातनं अस्सा धापकन सरकला !....सगळा चिखलात बरबटला.बापरे!आता काय करायचं? तिकडे कथा चालू.मंडप श्रोत्यांनी खचाखच भरलेला आणि बबन्या चिखलानं बरबटलेला.विचार करायला वेळ नव्हता.बबन्याला घाईत तस्साच धुतला.ओला झालेल्या बबन्याला पाहून महाराज चक्रावून गेले.

बबन्या ओला अन् स्टेज वरील बाकी कोरडे?आता काय करायचं?मग कुणीतरी शक्कल लढवली.'तो' महाराजांच्या कानाला लागला.म्हणाला,सगळ्यांना ओलं करा.वनवासात पाऊस आला नसंल काय? अन् राम ,लक्ष्मण ,सीता ओले झाले नसतील काय?शेवटी सगळ्यांना भिजवून स्टेजवर आणलं.मेकपचा सगळा विचका झाला.अरण्यकांडाची कथा संपली.सगळ्या भक्तांना एकच कोडं पडलं की महाराजांनी स्टेजवर ओली पात्रं आणण्याचं कारण काय?छे!एव्हढे गाजलेले महाराज पण आजची कथा काय जमली नाय बुआ.

घडलेल्या घटनेची सगळ्यांनाच चुटपूट लागली.सगळीकडे हीच चर्चा .भक्तमंडळीच्या प्रतिक्रियांनी महाराजही अस्वस्थ झाले.

**आपलेदीपस्तंभ**

आज कथेचा तिसरा दिवस होता.

महाराजांनी एखादं गीत म्हणून कथेला सुरुवात करण्याऐवजी गावक-यांशी संवादच साधायचं ठरवलं.

मंडळी जमा झाली.महाराज म्हणाले, मंडळी ,रामायण व महाभारत ही आपली दोन महाकाव्ये भारतीय संस्कृतीचे दोन शाश्वत आधारस्तंभ आहेत.भारतीय सांस्कृतिक जीवनाच्या वाटचालीत, पडझडीत आजही मार्गदर्शन करणारे दीपस्तंभ आहेत.रामायण महाभारत या ग्रंथांतील तत्वज्ञानाने भारतीय संस्कृतीला नीतिमूल्यांचे ,जीवनाच्या शाश्वत मूल्यांचे अधिष्ठान मिळाले आहे.रामायणाच्या रुपाने आदर्श जीवन कसे असावे ?याचा नीतिपाठ प्रस्तुत केला आहे.रामायणातील महन्मंगल चारित्र्याच्या गुण संस्कारामुळे येथील समाजमनाचे पोषण झाले.विकसन झाले.आसेतुहिमाचल पसरलेल्या या देशात सांस्कृतिक एकता निर्माण होऊ शकली.त्याच एकात्मतेच्या बळावर ही संस्कृती इतिहासातील अनेक आक्रमणं पचवू शकली. वाल्मिकी रामायणात आदर्श मनुष्याचे १६गुणांचे वर्णन आहे आणि हे गुण रामात एकवटले होते म्हणून तर राम 'पुरुषोत्तम' होता.'आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मज'

राम हा सुद्धा आपल्यासारखाच माणूस होता.आपणही रामासारखं आदर्श व्हावं.रामायणातली सगळी कांडं वाचा,ऐका,आचरणात आणा ;पण अजून ऐक कांड आहे ते नीट ऐका आणि आचरणात नक्की आणा.त्याचं नाव

**स्वच्छताकांड**

मंडळी ,संत गाडगेबाबा म्हणत,

'जेथे नाही देव जागी,
कारे श्रमता तेथे उगी,
रोगराईचे उघड कारण,
अस्वच्छता मन प्रदोषण.'

जो पर्यंत मनातील अज्ञानाचा मळ धुतला जाणार नाही ,तो पर्यंत मन स्वच्छ होणार नाही. रोगराईचे कारण देव नसून आपणच आहोत.आपण जर स्वच्छता राखली तर सर्व रोगराई दूर होईल.

ज्या गावात गाडगेबाबांचे किर्तन व्हायचं त्या गावातल्या पटकीच्या साथीचा फेरा चुकतो असा गावक-यांचा समज होता ;पण वस्तुस्थिती अशी होती की,गाडगेबाबा ज्या गावात कीर्तन करत त्या गावाची

आधी सफाई करीत होते त्यामुळे तेथील रोगजंतूंचा फैलाव होत नसे.

मंडळी ,भारत हा खेड्यांचा देश आहे.ग्रामविकास झाला तरच राष्ट्रविकास होईल.स्वच्छता, शिक्षण,आरोग्य,रोजगार यात खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेत ग्रामविकासाचे मंत्र सांगितले तेही अनुसरा.महाराज बोलत होते.

बबन्यामुळे गावक-यांना अजून एक कांड समजलं.

गाव करी ते राव कायकरी

बबन्याला घडलेली घटना चांगली जिव्हारी लागली होती.वर्षभरात बबन्याच्या पुढाकारात लोकांनी मोठं काम केलं.स्वच्छतेची गोष्ट लोकांनी फारच मनावर घेतली.गावात घरोघरी संडास बांधले.आता कुणीच उघड्यावर शौचास बसत नव्हतं.गावाच्या चौतर्फा रस्त्यांवर झाडं लावली.स्वागताच्या कमानी बांधल्या.फुलझाडं लावली.लोकांचं आरोग्य सुधारलं.दवाखान्याचा खर्चही कमी झाला.मुलं शाळेत रमू लागली.गावची शाळा गुणवत्तेत पुढे आली.पाणी अडवा,पाणी जिरवा,पाणी बचतीच्या योजना गावात आल्या.कृषी अधिकारी गावात मार्गदर्शन करु लागले.शेतीत प्रगती झाली.रोजगार गावातच मिळू लागला.स्थलांतर कमी झालं.तालुक्यात गावाचं नाव झालं. बबनराव आता सरपंच झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गावानं स्वच्छता अभियानातही भाग घेतला.

प्रथम क्रमांकाचं बक्षिस मिळवलं.डोईवर फेटा बांधून सरपंच आणि रामभाऊ महाराजांसोबत गावक-यांनी बक्षिस घेतलं.आता घराच्या ओसरीवर काटे टाकून कुणीच परागंदा होत नव्हतं.

लेखक संपर्क क्रमांक
९४०५६६९०८६

9403755341
9665057002

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा !

जय बालाजी फर्निचर






गोद्रेज कपाट, सोफासेट, देवघर, टि.पॉय, चौरंग पाट व सर्व प्रकारचे लाकडी फर्निचर योग्य भावात मिळेल.

पत्ता: ३५अ,फुलचंदनगर, वासुदेवबाबा मंदिरामागे,शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे

# चोरी...

**धर्मराज माहूलकर**
औरंगाबाद

इन्स्पेक्टर जाधव पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या खुर्चीवर येऊन बसले. ते पोलीस स्टेशनला बदलून आल्यापासून गुन्हेगारांना चांगलाच वचक बसला होता. गुन्हेगारांना त्याचा चांगला धाक उभा राहिला होता. संपूर्ण पोलीस खात्यात जाधव हे एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नावाजले होते. आता त्यांच्यासमोर कोणतेच ताज्या गुन्ह्याचे प्रकरण नव्हते त्यामुळे ते निवांतपणे सिगारेटची वलये सोडीत बसले होते. मधून मधून ते फाईलीमध्ये पाहात होते. तोच........

सर, आत येऊ कां?

त्यांनी दरवाजाकडे पाहिलं. दरवाजात एक तरूण उभा होता. त्याची शरीरयष्टी भक्कम होती. त्याचा चेहरा गोल असून उत्तम कपडे त्याने अंगावर चढवले होते. केस मागे वळवून बसवले होते. डोळ्यावर चष्मा होता. साडेपाच फूट उंचीचा तो तरूण सुंदर होता.

' काय प्रकरण असावे बरं या मुलाचे?' नेहमीप्रमाणे जाधव विचार करीत होते. आतापर्यंत त्यांच्या अनुभवावरून फिर्यादीची काय फिर्याद असावी याचा त्यांना अंदाज येत असे.

या. जाधव म्हणाले. तो तरूण जाधवांच्या टेबलसमोर येऊन उभा राहिला.

'बसा ना.' जाधव म्हणाले, काय काम होतं?

थंक्यू म्हणून तो तरूण खुर्चीत बसला.

सर, चोरी झालीय!

मोटार सायकल चोरीला गेली का तुमची'?

नाही सर.

मग चारचाकी गाडी, पैसे, दागिने वगैरे?

हो सर! पण गाडी, दागिने, पैसे तेवढे महत्वाचे नाहीत. आणि हे चोरीला गेले म्हणून फिर्याद द्यायला मी कदापि तुमच्याकडे आलो नसतो!

मग काय प्रकरण आहे तुमचं?

सर, माझी बायको चोरीला गेली?

काय! बायको? अहो बायको चोरील जायला ती काय पैसे, दागिने, किंवी गाडी वगैरे आहे का! ती काय एखादी वस्तू आहे का ती चोरीला जावी. काहीतरी सांगताय तुम्ही!

नाही साहेब, मी खोटं बोलत नाही. खरंच माझी बायको चोरीला गेलीय हो!

नाव काय तुमचं? इन्स्पेक्टर जाधवांना आता त्या तरूणाविषयी संशय येऊ लागला होता.

प्रमोद नलावडे. एका आय.टी. कंपनात काम करतो मी.

किती वर्षे झाली तुमचं लग्न होऊन?

अडीच वर्षे.

तुमची बायको नोकरी वगैरे करते का?

नाही साहेब ती घरीच असते.

तुमचा काही वितंडवाद, भांडण वगैरे?

नाही साहेब अजिबात नाही. आमचं खूप प्रेम आहे एकमेकांवर! मला ऑफिसमधून यायला थोडा उशीर झाला तर कासाविस होते ती! लग्न झाल्यापासून आमचं भांडण वगैरे काहीही झालं नाही. कारण गाडी, बंगला, चांगली नोकरी हे सर्व आहे आमच्याजवळ. माझ्याकडून पूर्ण स्वातंत्र्य मिळालं आहे तिला. आमचा एकमेकांवर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे मतभेद वगैरे हा प्रकार नाही.

थोडं स्पष्ट करतो नलावडे, पुष्कळ वेळा असं होतं की सर्वकाही व्यवस्थित असूनही काही प्रकरणं घडतात. लग्ना अगोदर प्रेमप्रकरणं असतात. मुलींना ती गोष्ट अस्वस्थ करीत असते आणि मग त्या टोकाचा निर्णय घेतात. आपल्या प्रियकरांकडे पळून जातात. बरीच अशी प्रकरणं घडलेली आहेत.

नाही साहेब असं घडायचं काहीच कारण नाही. कारण माझी बायको माझ्या नात्यातलीच आहे. तिच्याबाबत मला पहिल्यापासूनच माहिती आहे. कारण ती माझ्या मामाचीच मुलगी आहे.

बरं, तुम्ही तिच्या नातेवाईकांकडे चौकशी केली का?

हो सर, सर्व चौकशी करून झाली. तिच्या माहेरी व तिच्या नातेवाईकांकडे मी स्वत: जाऊन आलो. फोनवरून सर्व नातेवाईकांकडे चौकशी केली. पण ती तिकडे गेली नाही हे सर्वांनी सांगितलं.

बरं, तिचं व्यक्तिमत्व कसं होतं?

अहो, ती माझ्या मामाचीच मुलगी असल्यामुळे मला तिच्याविषयी सर्व माहिती होती. खूप हुशार आहे ती! वर्गात पहिला नंबर कधी चुकला नाही तिचा. कुढणं, विचार करणं, विपरीत वर्तन

करणं हा प्रकारच नाही. तुमच्या प्रश्नाचा रोख माझ्या लक्ष्यात आला. तिनं आत्महत्या केली असावी असा तुमचा संशय. पण ते कदापि शक्य नाही साहेब. ती अतिशय उत्साही आणि भरभरून जगणारी व जीवनाचा आस्वाद घेणारी मुलगी आहे ती!

आता इन्स्पेक्टर जाधव चक्रावूनच गेले. त्यांनी अशा प्रकारच्या प्रकरणाचा अभ्यास करतांना वर सांगितलेल्या कारणांशिवाय वेगळे कारण त्यांना आढळलं नव्हते.

बरं किती दिवस झाले या गोष्टीला?

तीन दिवसांपूर्वीची ही गोष्ट आहे!

ज्या क्षणापासून तुमची पत्नी गायब झाली त्याविषयी जरा सविस्तर सांगा ना.

साहेब, २६ तारखेची ही गोष्ट आहे. त्याअगोदर मला कंपनीत दोन दिवस खूप काम निघालं. दररोज मध्यरात्री किंवा पहाटे पहाटे मी घरी परतलो. अर्थात दोन दिवस मला खूप जागरण झालं. एकतर मला जास्त जागरण सहन होत नाही. दोन दिवसांचं जागरण माझ्यासाठी खूप झालं. २६ तारखेला मी जरा लौकरच घरी आलो. मला विश्रांतीची अत्यंत आवश्यकता होती. रात्री आठलाच मी जेवण करून झोपलो.

माझी पत्नी इतक्या लौकर झोपणे शक्य नव्हतं. ' मी शेजारी जाऊन येते.' म्हणून ती घराच्या बाहेर जायला निघाली. ' दाराला कुलूप लावून जा.' असे मी तिला सूचवले, कारण माझी झोपमोड व्हायला नको होती. त्याप्रमाणे तिने दाराला कुलूप लावले अन् ती गेली.

दोन रात्री जागरण असल्यामुळे मला रात्री जागच आली नाही. सकाळी उठल्यानंतर मी आजूबाजूला पाहिलं. नेहमीप्रमाणे माझ्या बाजूला असणारी माझी बायके पलंगावर नव्हती. सकाळी कामाला उठली असेल म्हणून मी तिला हाक मारली पण मला प्रत्युत्तर मिळाले नाही. उठून मी इकडे तिकडे पाहिलं. घरात कोठेही माझी बायको नव्हती. मी थोडा घाबरलो आणि दाराकडे धावलो. दार बाहेरुन बंद होते. मी माझ्या शेजा-यांना आवाज दिले. मी खिडकीतून त्याला दाराची कडी काढण्याविषयी सांगितले. तो म्हणाला,

अहो, दाराला कुलूप आहे.

ते शब्द ऐकताच मी प्रचंड घाबरलो. कारण काल रात्री आठ वाजता बाहेर गेलेली माझी बायको परतली नाही हे दारावरील कुलूप सांगत होतं. तशा बेचैन अवस्थेत मी ड्युप्लिकेट चावी घेऊन दार उघडून घेतले. सैरावैरा धावून मी सर्व अपार्टमेंट तपासून पाहिले. पण कोठेही माझी बायको नव्हती. त्याक्षणीच माझ्या अंगातले त्राणचं गेले. मटकन् खालीच बसलो मी! त्यानंतर मी खूप तपास केला; पणँ माझी बायको सापडली नाही.

बरं मला सांगा नलावडे, तुमच्या अपार्टमेंटवर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावलेले आहेत का?

हो साहेब. आमच्या अपार्टमेंटला सर्व बाजूंनी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावलेले आहेत!

निवांत राहा नलावडे. आपण या प्रकरणाचा तपास लावूच!

लगेच जाधवसाहेबांनी एक कॉन्स्टेबलला 'आम्रलता' या अपार्टमेंटवरील सर्व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आणायला पिटाळले.

नलावडे तुम्ही थोडं बाहेर बसलं तरी चालेल. कॅमेरे येताच मी तुम्हाला बोलावतो.

प्रमोद नलावडे बाहेर येऊन बसला आणि इन्स्पेक्टर जाधव या प्रकरणातील धागेदोरे शोधायला लागले.

बऱ्याच वेळानंतर हवालदार आम्रलता अपार्टमेंटमधील सर्व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे घेऊन हजर झाला. इनस्पेक्टर जाधवांनी २६ तारखेचे फुटेज बाजूला केले व बारकाईने ते फुटेजचे निरीक्षण करू लागले. शेवटी त्यांना रात्री १० वाजता दोनजण, बाई आणि पुरूष हातात हात घालून जात असलेले दिसले. त्यांनी काळजीपूर्वक त्या दोघांना एनलार्ज करून पाहिले. ते मोठ्याने ओरडले,

नलावडे इकडे या! नलावडे आत आला.

ही बाई कोण आहे?

माझी बायको आहे सर!

आणि हा तिच्याबरोबर कोण आहे?

नलावडेने काळजीपूर्वक त्या व्यक्तीकडे पाहिलं आणि तो चक्रावूनच गेला, कारण ते चित्र त्याचेच होते. तो तोच होता.

का आम्हाला परेशान करता तुम्ही लोक. उलटी सुलटी कामं करता तुम्ही आणि निस्तरायला लावता आम्हाला! झोपेत चालायची सवय आहे का तुम्हाला?

नाही साहेब, मी कधीही झोपेत चालत नाही!

मग हा कोण आहे?

तो तर मीच दिसतोय. पण त्या रात्री मला जागचं आली नाही आणि दुसरे म्हणजे मी स्वत: कुलूप उघडून बाहेर येईल कसा? आणि माझी बायको अजूनही माझ्याकडे परत आलेली नाही. त्या दिवसापासून ती गायब झाली ते आजतागायत. मला वाटतं माझ्यासारखा दिसणारा एखादा तो दुसराच तरूण असावा!

नाही नलावडे. त्या फुटेजमधील माणूस तुम्हीच आहात. तुमचा चेहरा, उंची, अंगातील कपडे आता तुमचे जसे आहेत तसेच चित्रात दिसत आहेत!

साहेब, मला आता काहीच कळेनासं झालंय. मला काहीच सूचत नाही!

नलावडेच्या वर्तनावरून तो खोटं बोलत आहे असं जाधवांना वाटत नव्हतं. दु:खाचे भाव त्याच्या चेह-यावर स्पष्ट दिसत होते.

आणि विशेष म्हणजे नलावडेच्या बायकोचा कोठेही पत्ता नव्हता. नलावडे सज्जन माणूस असून पापभिरू आहे याची त्यांना खात्री झाली होती. पुढील तपास करायचे सांगून त्यांनी प्रमोद नलावडेला निरोप दिला आणि सचिंत त्यांच्या खुर्चीवर बसून राहिले.

या प्रकरणाचा तपास कसा करावा हेच त्यांना समजेनासे झाले. सी.सी.टी.व्ही. फुटेजशिवाय दुसरा कोणताही पुरावा त्यांच्याजवळ नव्हता. बरं नलावडेच्या बायकोबरोबरचा पुरूण हा नलावडेच होता. तपास करावा तर कसा हा प्रश्न त्यांना भेडसावीत होता. एक आव्हान म्हणून हे प्रकरण त्यांच्यासमोर उभे होते.

मध्ये सात दिवस निघून गेले. या सात दिवसात या प्रकरणात कोणतीही प्रगती झाली नव्हती. नलावडेची बायको गायब होती. बरं तिनं आत्महत्या करावी असं कारणही घडलेलं नव्हतं. परिस्थिती होती तशीच होती.या प्रकरणात कोठून सुरूवात करावी हे जाधवांना समजत नव्हतं. असे सचिंत बसलेले असतांना त्यांच्यासमोर नुकतीच त्यादिवशीची डाक येऊन पडली. त्यातील महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक कार्यालयाकडून आलेला लखोटा त्यांनी उचलला आणि तो ते वाचू लागले.

ङ्ग सर्व संबधीतांना सूचीत करण्यात येते की, आता चालू असलेल्या बावीसाव्या शतकानुसार पोलीसासमोरील आव्हानेसुद्धा बदलत आहेत. आपण कधी कल्पना केली नसेल अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आता सुरूवात झालेली आहे. बदलत्या काळाप्रमाणे पोलिसांनासुद्धा बदलणे आवश्यक होऊन बसले आहे. पोलीस बदलले तरच ते गुन्ह्याचा शोध लावू शकतील हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे. येणा-या काळात घडून येणारे गुन्हे व गुन्हेगार कशाप्रकारचे असू शकतील हे सांगणे व पोलीस खात्याने त्यांना सामोरे जाणे यासाठी केलेली ही सावधगिरीची सूचना आहे.

बंधूनो, एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीला सायबर गुन्ह्यांना सुरूवात झाली होती. त्यावेळी सायबर गुन्हा व गुन्हेगार हा प्रकार सर्वस्वी नवीन होता. पण एकविसाव्या शतकामध्येच आपल्या जिगरबाज पोलीस खात्याने सायबर गुन्हे समजणे व सायबर गुन्हेगार शोधून काढणे यावर प्रभुत्व मिळवले. कोणताही सायबर गुन्हेगार आज महाराष्ट्र पोलीसांच्या तावडीतून सुटू शकत नाही. त्यामुळे सायबर गुन्ह्यामध्ये बरीच कमी आली असून सायबर गुन्हेगारांना चांगलाच आळा बसला आहे.

पण या बावीसाव्या शतकात एक अकल्पित अशी गुन्हेगारी समोर येते आहे. आपल्याला हे सर्व नवीन आहे. आपल्याला माहीत आहे की आइनस्टाईन या शास्त्रज्ञाने दोन समांतर विश्वाला जोडणारा दरवाज अस्तित्वात असावा अशी कल्पना विसाव्या शतकात मांडली होती. ही कल्पना आता प्रत्यक्षात आली असून ब-याच शास्त्रज्ञांना समातंर विश्वाची दारे कोठे आहेत हे माहिति झाले आहे. एवढेच नव्हे तर समाजातील सर्वसामान्य लोकांनादेखील थोडे पैसे खर्च केले की समांतर विश्वात जाणे येणे सुलभ झाले आहे. या संधीचा गुन्हेगार फायदा न घेतील तरच नवल. हे गुन्हेगार समांतर विश्वात जाऊन तेथे लुटमार, खून, दरोडे, अपहरण करून पुन्हा आपल्या विश्वात परत येतात. अशा या गुन्हेगारांना शोधून काढणे मोठे अवघड असते. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आता सुरूवात झाली आहे. त्यासाठी सावधगिरी म्हणून तुम्हाला ही सूचना देण्यात येत आहे.

मूळ विश्वातील व्यक्ती ही उजखोरी असते व समांतर विश्वातील व्यक्ती ही डावखोरी असते. तसेच मूळ विश्वातील व्यक्तीच्या मेंदूचा डावा भाग प्रभावी असतो तर समांतर विश्वातील व्यक्तीच्या मेंदूचा उजवा भाग हा प्रभावी असतो. एवढाच काय तो फरक आपल्या लक्षात आला आहे. आपले शास्त्रज्ञ आणखी काय काय भेद असू शकतात याचा अभ्यास करीत आहेत. एकदा का हे भेद आपल्याला समजले की गुन्हेगारांना पकडणे सोपे होऊन जाईल. यामध्ये जसजशी प्रगती होईल त्याप्रमाणे आपल्याला कळविण्यात येईल.

महासंचालक

ईन्स्पेक्टर जाधव साहेबांनी सर्क्युलर वाचून संपवले. प्रमोद नलावडेची केस या प्रकारची आहे याची त्यांना खात्री झाली. आता या प्रकरणी काय करता येईल यासाठी त्यांनी वरिष्ठांशी संपर्क साधला.

लेखक संपर्क क्रमांक
९७६५००६४८४



KATHA

# मंग्या...

**गुलाब बिसेन**
कोल्हापूर

मंग्या बांधाच्या रस्त्याने झपझप पावले टाकत घराकडे निघाला होता. एका हातात वडिलांनी पकडलेल्या खेकड्यांची पिशवी आणि दुसर्या हातात चिव्याची काठी घेऊन तो घराकडे लांब लांब पावले टाकत चालला होता. वडिलांसोबत खेकडे धरायला गेल्याने त्याला शाळेला उशीर होणार होता. अभ्यासात हुशार असलेल्या मंग्याने शाळेचा अभ्यास रात्रीच पूर्ण केला होता. परंतु शाळेला वेळेत हजर राहण्याचा सरांचा नियम कडक असल्याने तो गडबडीत चालला होता. घरी जाऊन त्याला आंघोळ आटोपून जेवायचेही होतेच. सकाळपासून वडिलांसोबत ओढ्याच्या पाण्यात खेकड्यांची पिशवी धरून फिरल्याने तो पुरता दमला होता. तसा तो खेकडे धरायला कधी जात नव्हता. पण खेकड्यांना त्यांच्या बिळातनं बाहेर कसे काढतात ? हे बघण्यासाठी तो आज वडिलांसोबत गेला होता.

मंग्या बांधाचा रस्ता कापून मुख्य रस्त्याला लागला. याच रस्त्याला गावाच्या सुरूवातीला त्याची शाळा होती. जसजशी शाळा जवळ येत होती तशी त्याच्या हृदयाची धडधड वाढत होती. सरांना जर मी अशा अवस्थेत दिसलो तर ते मला शिक्षा केल्याशिवाय सोडणार नाहीत. या विचारानेच तो गांगरून गेला होता. त्यामुळे शाळेपुढून जाताना मुलांचा डोळा चुकवत तो चालला होता. एवढ्यात त्याच्या भावकीतील त्याच्याच वर्गात शिकणाऱ्या रव्याला तो दिसला. मंग्या दिसताच रव्याने मोठमोठ्याने बोंब ठोकली ,

''सर , मंग्या खेकडे धरून घराकडे निघालाय बघा.''

रव्याच्या या ओरडण्याने मंग्या अधिकच घाबरला.

रव्याच्या पहाडी आवाजाने वर्गात असलेले सर बाहेर आले. त्यांनी मुलांना मंग्याला बोलवून आणायला सांगितलं. सरांची आज्ञा कानावर पडताच वर्गातील सुर्या आणि बब्या ही टवाळखोर पोरं धावत सुटली. त्यांनी मंग्याला सरांचा निरोप न देता सरळ त्याच्या ढेंगत हात घालून त्याला एखाद्या आरोपीप्रमाणे उचलून सरांच्यापुढे आणून ठेवला. या अचानक पडलेल्या धाडीने तो थरथर कापू लागला. त्याच्या तोंडून शब्दही फुटेना. या अचानक झालेल्या धाडीवेळी झटापटीत मंग्याच्या हातातील खेकड्यांची पिशवी हातातून कधी निसटली हे त्याला कळलेच नाही. पिशवीतील काळेकुट्ट मोठाले खेकडे आपल्या नांग्या उंचावत पिशवीच्या बाहेर येऊन मैदानभर सैरावैरा पळू लागले. आता शाळेला न येता वडिलांसोबत खेकडे धरायला गेल्याने सरांचा आणि खेकडे पसार झाल्याने घरी वडिलांच्या हातचा मार खावा लागेल. यावर मंग्याने शिक्कामोर्तबच केले. सरांच्या पुढे थरथरत उभा असलेला मंग्या शाळेला प्रामाणिक होता. त्यामुळे सरांनी प्रसंगावधान राखत शाळेतील मोठ्या मुलांकडून मैदानात सैरावैरा पळणार्या खेकड्यांना पकडून आधी पिशवीत घालायला लावले. पिशवीचे तोंड घट्ट बांधून पिशवी टेबलावर ठेवली आणि मुलांना परिपाठ घेण्याची सूचना दिली.

मुले परिपाठात तल्लीन झाली. मंग्या मात्र भिजलेल्या कपड्यांत काकडत बसला. त्याचे अंग अजूनही थरथरतच होते. परिपाठानंतर सर काय शिक्षा करतील याचाच तो मनात विचार करत होता. परिपाठ झाल्यावर सरांनी वर्गातून परिसर अभ्यासाचे पुस्तक आणले. त्यातील मोठ्या खेकड्याचे चित्र असलेले पान उघडले. मुलांना या गोष्टीचे नवलच वाटले. कारण सर्वजण सर मंग्याला काय शिक्षा करतात. हे बघण्यासाठी उतावीळ झाली होती. सरांनी खेकड्यांची पिशवी उघडली. त्यातील एका मोठ्या आकाराच्या खेकड्याला लोखंडी चिमट्याने पकडून बाहेर काढले. आणि ते सर्व मुलांना खेकड्याचे एक एक अवयव दाखवत , त्यांची माहिती देऊ लागले. खेकड्यांचे अवयव , त्यांचे अन्न , अधिवास , पर्यावरणाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व इत्यादि परिसर अभ्यासातील संपूर्ण शास्त्रीय माहिती प्रत्यक्ष खेकड्याच्या मदतीने मुलांना हसत हसवत सांगितली. त्यामुळे मुलांना दररोज दिसणारा खेकडा आज वेगळाच भासत होता.

सरांच्या या परिसर अभ्यासाच्या तासाने मंग्याला शिक्षा व्हावी म्हणून टपून बसलेले बब्या आणि सुर्या जरा हिरमुसले. मंग्याचा चेहरा मात्र आनंदाने फुलला. आता आपली शिक्षेतून सुटका झाली. असे त्याला मनोमन वाटले. सरांनी संपूर्ण माहिती सांगितल्यावर खेकड्याला परत पिशवीत ठेवले. मंग्याला पुढे बोलावून खेकडा उपलब्ध करून दिल्याबद्दल टाळ्यांच्या गजरात त्याचे अभिनंदन करून खेकडे घरी ठेवून यायला सांगितले.सरांच्या या अभिनंदनाने आपली सरांच्या आणि घरी वडिलांच्या शिक्षेतूनही सुटका झाली शिवाय आज खेकड्याचा रस्सा खायला मिळणार या आनंदात मंग्याने खेकड्यांची पिशवी घेतली आणि तो उड्या मारतच घराकडे पळाला.

लेखक संपर्क क्रमांक
९५०४२३५१९१

# चिमुकली भेट...

**अरूण पाटील**
जळगांव

बाहेर पावसाची रिपरिप सुरु होती.  शाळेचा आणि वाहनांचा रस्ता एकच असल्यामुळे मुले सावधपणे रस्त्याच्या कडेने शाळेत येत होती. हळूहळू रिकामे वर्ग भरायला लागले होते. रात्रीपासून गप्प असलेल्या भिंती जणूकाही बोलायला लागल्या होत्या. मुलांचे रोजचे बाक तसेच बाकावर बसणारा मित्र ठरलेला असायचा. निरभ्र आकाशात ढगांची गर्दी व्हावी तशी शाळेत चिमुकल्यांची गर्दी होतांना दिसत होती. नेहमीप्रमाणे प्रार्थना झाल्यानंतर मुलं ओळीने आपापल्या वर्गात जात होती.

मधल्या सुटीत पावसाळी वातावरण व गारठा असल्याने आपोआपच चहा पिण्याची इच्छा होईल असे ते वातावरण होते. अशावेळी  नामुदादांच्या हातचा चहा फार उर्जा देऊन जाई. त्यात काय काय टाकून ते चहा अगदी फक्कड व सुपर्ररर्र...बनवतात विचारू नका. चहाच्या वासानेच चहा पिल्यासारखे वाटते. अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे दुपारची हवादेखील सोबत गारठं आणत होती. मधल्या सुट्टीत मास्तर नेहमीप्रमाणे चहा पिण्यासाठी निघाले असता; शाळेच्या गेट बाहेर एक अनोळखी मुलगा दिसला. गावातला मुळीच नव्हता. सोबत त्याची आई आणि दोन छोट्या बहिणीदेखील होत्या. मास्तरांनी  विचारले, ताई हा तुमचा मुलगा? शाळेत जातो? तुम्ही कुठे कामाला आहात? आणखी गावात किती दिवस थांबणार? मालकाचं नाव काय? असे अनेक प्रश्न विचारले. त्या माऊलीच्या बोलण्यावरून लक्षातच आले कि त्यांचा मुलगा शाळाबाह्य होता. कधीही शाळेत न गेलेला. गावापासून दोन किलोमीटर अंतरावर शेतात स्थिरावलेले हे कुटुंब. पोटाची वीतभर खळगी भरण्यासाठी शेकडो मैल अंतर कापून गावात आलेलं कुटुंब अधिक जवळचं वाटायला लागतं. मास्तरांनी त्या मुलाला विचारलं.

नाव काय रे तुझं?

मंग्या.

आमच्या शाळेत येशील? त्यानं होकारार्थी मान हलविली. त्याच्या डोळ्यांमध्ये शिकण्याची उमेद दिसत होती. त्याचे डोळे त्याला शाळेत येण्यासाठी खुणावत होते. सोबत त्याची बहिण होती. तिचे डोळे मात्र मास्तरांकडे पाहून हसत होते. साधारण चार वर्षे वय असेल तिचे. डोक्यावरून कपाळावर डोळ्यांपुढे आलेला तिच्या केसांच्या बटांचा न सुटणारा गुंता स्पष्टपणे दिसत होता. तिच्यापेक्षा आणखी एक लहान. ती मात्र मस्तपणे तिच्या आईच्या कमरेवर बसलेली होती. तिला काय हा प्रकार सुरु आहे ते कळत नव्हते. तिचे डोळे काळेभोर होते. तिच्या डोळ्यात जिज्ञासा आणि कुतूहल दिसत होतं. या सृष्टीत काय काय पाहावे असे तिला झालं होतं. तोकडा फ्रॉक घालून ती एखाद्या बाहुलीप्रमाणे दिसत होती. मास्तरांना पाहून ज्यांच्याकडे हे कुटुंब कामाला होते ते सद्गृहस्थ त्याठिकाणी आले. ते म्हणाले कि, पावरा समाजाचे कष्टकरी भटके कुटुंब आहे. दोन वर्षे ते आपल्याकडेच थांबणार आहेत. शेतावर. त्यांच्याकडे कोणताच कागद नाही. उद्या पोराला तुमच्या शाळेत दाखल करून घ्या. त्यानंतर ते सर्वजण निघून गेले. मधल्या सुटीची वेळ संपली. शाळेची घंटा झाली. संध्याकाळी घरी आल्यानंतर संवेदनशील आणि अस्वस्थ मास्तरांच्या डोक्यात विचारचक्र सुरु झालं. सारखं मंगेशची आठवण येत होती. त्याने घातलेले ते फाटके कपडे नजरेसमोर दिसत होते. चड्डी लांब घातली होती पण वाटत नव्हती. कारण ती गुढग्याच्या थोडी खाली येत होती पण त्याच्या पावलांपर्यंत पोचतच नव्हती. मंगेशच्या विचाराने मास्तर अस्वस्थ झाले होते.

दुसऱ्या दिवशी मास्तर शाळेत आले तेव्हा मैदानात मुलांचा घोळका दिसला. चौकात गारुडीच्या खेळापाशी दिसतो तसा. उशिरा येणारी मुलं देखील वर्गात दप्तर न ठेवता गर्दीत पसार होत होती. नेहमीपेक्षा काहीतरी वेगळं वाटलं. जरा जवळ जाऊन पाहिलं तर मुलांच्या घोळक्यात एक केसाळ कुत्रा दिसला. फिक्कट तपकिरी रंगाचा. त्याच्या डोक्यावर पांढऱ्या रंगाचा पट्टा टिळा लावल्यासारखा दिसत होता. दोन्ही कानांना आणि नाकाला काळा रंग दिल्यासारखं दिसत होतं. दोन्ही डोळ्यांमध्ये निखारे चमकत होते. वाघाच्या डोळ्यात चमकतात तसेच. असे कुत्रे गावात नसतात तर जंगलात असतात याची मास्तरांना खात्रीच पटली. मास्तरांनी आवाज दिला, अरे सरका बाजूला चावेल तो. त्या कुत्र्याला गोंजारणारा, त्याच्या पाठीवरून धीटपणे फिरणारा कोवळा नाजूक हात त्यांना दिसला. तो हात दुसऱ्या तिसऱ्या कोणाचा नसून काल भेटलेल्या मंगेशचाच होता. आणि तो केसाळ जंगली कुत्रा पण त्याचाच होता. मास्तरांना पाहून सर्व मुले पांगली. ते मंगेशला म्हणाले,  हा कुत्रा तुझ्यासोबत आला?

हा.

आता रोज येणार तुझ्यासोबत?

ना. असं म्हणत तो पोरांसोबत गेला. त्याचा तो केसाळ जंगली कुत्रा त्याच्या मागेमागेच फिरत होता. तेवढ्यात प्रार्थनेसाठी घंटा वाजली. मंगेश कुठल्यातरी रांगेत उभा राहिला. प्रार्थना संपली. मुलं ओळीनं आपापल्या वर्गांकडे निघाली. मंगेश देखील.... त्याचा कुत्रा मात्र मैदानात मंगेशच्या वर्गाशेजारीच बसत असे.


सर्व शिक्षकांनी चर्चा करून मंगेशला त्याच्या वयाच्या अंदाजानुसार प्रवेश दिला. सचिन सर, अमर सर, अमोल सर, प्रतिभाताई सर्वच शिक्षकांना आनंद वाटला. मंगेश आता शाळाबाह्य नव्हता. मंगेश शिक्षकांना अधिक जवळचा वाटू लागला. मास्तरांना त्याच्या पालकांची भेट घ्यायची होती म्हणून ते मंगेशला म्हणाले, आज आपण तुझ्या घरी जाऊ या. तुझ्या वडिलांना भेटायचं आहे. त्यानं मान हलविली. मास्तर आणि मंगेश बाईकने निघाले. घरं संपली, गाव संपलं आणि त्यांची मोटारसायकल मंगेशच्या इशार्यानुसार बैलगाडीच्या रस्त्याने पुढे पुढे जात होती. रस्त्याला फाटा फुटल्यावर मास्तरांनी विचारले, मंगेश कोणत्या रस्त्याने जायचं? तो म्हणाला, शिद्दी जास! महाभारतातील कृष्णाप्रमाणे मंगेश सारथ्याचं काम करत होता. मग गाडीवरच गप्पा सुरु झाल्या. मंगेश तू कोणाबरोबर खेळतोस घरी? तो म्हणाला, शिमली अन टका. त्याच्या बहिणी. शाळेच्या फाटकाजवळ भेटल्या त्याच. शिमली धाकटी आणि टका तिच्यापेक्षा धाकटी आईच्या कमरेवर बसलेली. शिमली आणि टका यांना सांभाळण्याचं काम मंगेश करत होता. रस्त्याला आणखी फाटा फुटल्यावर मास्तरांनी विचारावं त्याआधीच मंगेश म्हणाला, शिद्दी जास! तेवढ्यात मास्तरांनी दुचाकीच्या आरशात पाहिलं तर मंगेशचा तो केसाळ कुत्रा त्यांच्या पाठीमागून येतच होता. वळणं घेत दुचाकी गर्द झाडीतून मंगेशच्या घराकडे शेतावर निघाली. बैलगाडीच्या रस्त्याच्या दुतर्फा उभी असलेली हिरवीगार झाडं स्वागत करीत आहेत असंच वाटत होतं. थोडं पुढं गेल्यावर आकाशात दिसणाऱ्या इंद्रधनुच्या कमानी प्रमाणे एक पाण्याचा तीन-चार इंच व्यास माप असलेला पाईप रस्त्याचा अलीकडं असणाऱ्या झाडाच्या शेंड्यावरून रस्ता ओलांडत पलीकडच्या झाडाच्या शेंड्यावर बसला होता. दुसऱ्याच्या शेतात पाणी नेण्याचं काम तो पाईप करत असावा. चंगलीच आयडिया केली होती त्या शेतकऱ्याने. फुलांचा मोठ्ठा हार स्वर्गातून पडून तो झाडांमध्ये अडकल्यासारखा दिसत होता. शेळ्या, गुरेढोरे मनसोक्तपणे चरत होती. मधेच पक्षांचं सुमधुर गाणं ऐकू येत होतं. मास्तरांना निसर्गात हरवल्यासारखं वाटलं. खूप मज्जा वाटत होती. पण आरशातून मागे पाहिल्यावर रागच येत होता. कारण तो कुत्रा पिच्छाच करत होता वेड्यासारखा. शेवटी रस्त्याला लागुनच असलेल्या शेतावर ते जाऊन पोहोचले. गावापासून दोन किलोमीटर अंतरावर. दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी केली अन ते शेतातून पायवाटेने निघाले. मंगेशने त्याच्या वडिलांना आवाज दिला. त्याचे वडील नुकत्याच जमिनीतून वर आलेल्या ज्वारीच्या पिकांना पाणी पाजत होते. शेतात हिरवी सतरंजीच अंथरली आहे की काय असं चित्र दिसत होतं. मंगेशचं घर छोटं आणि पत्र्याचं होतं. मास्तर खाटीवर बसले. खाटीच्या बाजूलाच तो केसाळ जंगली कुत्रापण येऊन बसला. त्याची भीतीच वाटत होती. मंगेशच्या वडिलांनी प्यायला दिलेले पाणी फिल्टरच्या पाण्यापेक्षाही गोड लागत होते. मातीच्या वासानेच पोट भरल्यासारखं वाटलं. घरात डोकावून पाहिले तर तीन दगडं मुठभर राखेच्या भोवती कंपाऊंड केल्यासारखे दिसत होते. बाजूला आगपेटीपण होती. एक रिकामी भाकर्यांची टोपली पिठाने अर्धवट भरलेल्या डब्यावर ठेवली होती. तीन पातेले मंगेश, शिमली आणि टका यांच्यासारखे मोठे, छोटे आणि आणखीनच छोटे असे दिसत होते. पत्र्याच्या भिंतीलाच वायरची रिकामी पिशवी आणि कडीचा डबा अडकवलेला होता. शिमली आणि टका दिसत नव्हत्या. त्या आईसोबत गावी गेल्या होत्या. मंगेशच्या वडिलांनी सांगितले कि, 'मंगेशने शिमली आणि टका यांच्याप्रमाणेच या कुत्र्याचा लहनपणापासून सांभाळ केला आहे. त्याला लळा लावला आहे म्हणून तो कुत्रा त्याच्याशिवाय राहत नाही.' मास्तरांना नवलंच वाटले. त्या कुत्र्याला मग मंगेशने बांधून ठेवलं. आणि आवश्यक ती सर्व माहिती घेऊन मास्तर परत शाळेत पोचले.

जेवणाची सुटी व्हायला काही मिनिटे बाकी होती. मास्तर चौथीच्या वर्गात गणित विषय शिकवत होते. पण त्यांच्या डोक्यात मंगेशचं गणित होतं. त्यांना ते सोडवायचं होतं. त्यांनी मंगेशला वर्गात उभं केलं आणि विद्यार्थ्यांना त्याची कौटुंबिक, आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती उलगडून सांगितली. त्या संवेदनशील मुलांना मंगेशची दयाच आली. मास्तर वर्गातील सर्व मुलांना उद्देशून म्हणाले, बालमित्रांनो आपला मंगेश शाळेत दाखल केलाय. आता आपण सर्वजण त्याचे पालक आहोत. म्हणून आपल्या पद्धतीने त्याला काहीतरी शैक्षणिक मदत करायची आहे. तुमच्याजवळ जास्तीचं काही वाचन लेखन साहित्य असेल तर तुम्ही मंगेशला द्याल का? कोणकोण देणार? सर्वच मुलांनी बोटं वर केलीत ज्यांनी केली नाहीत त्यांच्या घराला कुलुपं होती. ते उद्या देणार असं सांगत होते. जेवणाच्या सुटीनंतर मुलांनी खोडरबरं, अर्धवट कोऱ्या वह्या, कंपासपेटी, पाटीवरच्या पेन्सिली, वाहिवरच्या टोक न काढलेल्या पेन्सिली, शार्पनर, पाटी, ताटली, पाण्याच्या बाटल्या, अर्धवट वापरलेले रंगखडू, चित्रकला वही या सर्व वस्तू आणून दिल्या. एकाने तर त्याचं जुनं दप्तर आणून दिलं. सर्व साहित्य टेबलावर

रचल्यानंतर ते भातुकलीच्या खेळामधील वस्तूंप्रमाणे दिसत होतं. याठिकाणी जर मंगेशची लहान बहिण टका आली असती तर तिने सर्व रचलेल्या वस्तू फेकून दिल्या असत्या. त्या पुन्हा शिमलीने रचल्या असत्या. असं काहीतरीच मास्तरांना सुचायला लागलं. त्यांना सर्वच विद्यार्थ्यांचं कौतुक वाटलं. एक विद्यार्थी दुसऱ्या गरजू विद्यार्थ्याला मदत करतांना पाहून त्यांना समाधान वाटले. खरोखरच विद्यार्थ्यांना शिक्षणाचा खरा अर्थ उलगडल्याचा अनुभव त्यांना आला.

लेखक संपर्क क्रमांक
९४०३८०७६९३





# शिक्षितांनो, सुशिक्षित व्हा ...!

**अनिल गोरे (मराठीकाका)**
पुणे

शासन मान्यता घेताना शासनाने विहित केलेल्या अर्हतेचे (ीशिीलीळलशव िींश्रळषळलरींळेप) शिक्षक नोकरीवर नेमू असे प्रतिज्ञापत्र लिहून देऊनही अनेक खासगी विनाअनुदान इंग्लिश माध्यम शाळा त्यानुसार अर्हतेचे उमेदवार शिक्षक म्हणून नेमत नाहीत.

पालकांकडून घेतलेल्या शुल्काचा बहुतांश वाटा स्वतःकडे राहून आपल्याला गडगंज कमाई व्हावी यासाठी अशा बहुसंख्य शाळांचे शाळामालक शक्य तितक्या कमी वेतनावर शिक्षक भरती करतात कारण शाळा हे त्यांचे कसाईकमाईचे साधन असते.

कमी वेतन घ्यायला तयार असलेले उमेदवार शासनाने विहित केलेल्या किमान अर्हतेहून खूप कमी शिकलेले असले, त्यांना शिकवण्याचे कौशल्य नसले किंवा मुळात शिकवण्याची आवडच नसली पण एखादी बरी नोकरी मिळेपर्यंत जे पैसे मिळतील तेवढे बरे मानून फळ्याजवळ यांत्रिकपणे उभे राहून शिकवण्याचा अभिनय करू शकतील इतपत पात्रतेचे असले तरी त्यांची भरती या शाळा करतात.

किमान पात्रतेहून कमी पात्रतेचे उमेदवार भरती केल्याबद्दल यांना शासकीय यंत्रणेने जाब विचारल्याचे व शिक्षकांची अर्हता तपासून ती पुरेशी नसल्याने कारवाई झाल्याचे एकही उदाहरण नाही.

या शाळा पालकांना मुलांच्या गणवेशाची टापटीप, गळबंदाची गाठ आणि ठेवण, नखे कापणे, केसांची आखूड लांबी, मोज्यांचा ताठपणा, मुलांच्या पायातील जोडे चमकवणे, गंध किंवा कुंकू लावायचे की नाही अशा बाह्य व पोशाखी बाबीत इतके गुंगवून टाकतात की शिक्षक स्वतः किती शिकले या सर्वात महत्वाच्या बाबीची चौकशी करावी अशी इच्छाही पालकांना होत नाही. कमी अर्हतेचे शिक्षक नेमल्याबाबत जाब विचारणे तर सोडाच पण अर्हतेची साधी चौकशीही पालक करत नाहीत.

अशा शाळांवर पैसा उधळून मुलांच्या शिक्षणावर भरपूर खर्च केल्याचे समाधान मानणारे पालक गलेलठ्ठ वेतनावर नोकरीला असतात किंवा चांगला धंदा करणारे, नफा कमावणारे व्यावसायिक असतात.

या गलेलठ्ठ वेतनाची नोकरी करणाऱ्या पालकांना नोकरी मिळताना यांची शैक्षणिक अर्हता पुरेशी असल्याशिवाय त्यांना नोकरी मिळत नाही. व्यावसायिक पालकांनाही व्यवसायासाठी आवश्यक पुरेसे कौशल्य, साधने व भांडवल असल्याशिवाय चांगला नफा मिळत नाही.

हे माहीत असूनही मुलांना इंग्लिश शाळेत घालायचे असे या पालकांच्या मनात आल्यावर ते शिक्षकांची अर्हता, पात्रता, गुणवत्ता हे मुद्दे सोडून शाळेच्या इमारतीची रचना, रंगरंगोटी या कमी महत्वाच्या बाबी पाहून आणि जास्तीत जास्त शुल्क घेणारी शाळा जास्तीत जास्त चांगली असे मानून शाळा निवडतात.

आपल्या नोकरी, व्यवसायात दर्जा, उपलब्ध बौद्धिक पायाभूत व्यवस्था यांचा अतिशय बारकाईने व तपशीलवार विचार करणारे लोक इंग्लिश शाळा या कल्पनेच्या मोहजालात असे गुरफटतात की शिक्षणासाठी सर्वात आवश्यक घटक शिक्षक आहे व तो संबंधित यंत्रणेने निश्चित केलेल्या अर्हतेचा असलाच पाहिजे हे त्यांच्या लक्षातच नसते. इथे त्यांची नोकरीतील शिक्षितांची कार्पोरेट दृष्टी अंधुक होते व व्यावसायिकांचा व्यवसायातील चलाखपणा लुप्त होतो आणि ते मतिगुंग स्थितीत शिरतात व त्याच स्थितीत शाळाप्रवेशाचा निर्णय घेतात.

शिक्षक किती शिकले याची निदान चौकशी करायचा संदेश मी १००० हून अधिक व्याख्याने आणि १०० हून अधिक लेखांमधून समाजातील पालकांना दिला. काही पालकांनी केलेल्या चौकशीच्या प्रयत्नात जे हाती लागले त्यानुसार बहुतेक खासगी अविना अनुदानित इंग्लिश माध्यम शाळांमध्ये पुरेशी अर्हता असलेले शिक्षक नाहीत हे पालकांना समजले किंवा काही ठिकाणी जंग जंग पछाडून शिक्षक किती शिकले हे या शाळा सांगायला तयार नव्हत्या !

हा अनुभव आल्यावर योग्य निर्णय घेऊन मागील वर्षी ९४०१० आणि गेल्या पाच वर्षात ३११०० मुले, त्यांच्या पालकांनी ' अपुरी अर्हता असलेले शिक्षक नेमलेल्या अशा इंग्लिश माध्यम शाळांमधून ' काढली व अनुदानित मराठी माध्यम शाळांमध्ये घातली. या अनुदानित मराठी माध्यम शाळांमध्ये शाळांमध्ये शिक्षक ते शिपाई व कारकून देखील स्वतः किती शिकले हे दाखवणारी पाटी लावलेली असते. या पाटीवर प्रदर्शित केलेली माहिती माहिती अधिकाराखाली अर्ज करून पडताळता येते.

इंग्लिश माध्यमात मुले ढकलताना वरील ३११००० सूज्ञ पालकांप्रमाणे सर्व पालकांनी शिक्षक किती शिकले याची चौकशी शाळेला भरमसाठ पैसे देण्यापूर्वी करावी असे मी सुचवतो.

१ ली ते ५ वी साठी प्राथमिक शिक्षक किमान १२ वी उत्तीर्ण + डी. एड. उत्तीर्ण + टीईटी उत्तीर्ण असावा ही किमान अर्हता आहे.

६वी ते ८ वी साठी उच्च प्राथमिक शिक्षक किमान मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण + डी. एड. उत्तीर्ण + टीईटी उत्तीर्ण असावा ही किमान अर्हता आहे.

९वी व १० वी साठी माध्यमिक शिक्षक किमान मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण + बी. एड. उत्तीर्ण असावा ही किमान अर्हता आहे.

शाळा निवड हा अविचाराने घेण्याचा निर्णय नसून विचाराने घेण्याचा आहे. वरील अर्हता असलेले सर्व शिक्षक १ ली ते १० पातळीवर नेमलेले आहेत का याची खात्री करून मगच शाळेची इमारत, रंगरंगोटी या दुय्यम महत्वाच्या बाबी विचात घ्याव्यात. असे मी इतर सर्व बाबतीत हुशारीने, दक्षतेने विचारपूर्वक निर्णय घेणाऱ्यांना सुचवतो.

शिक्षित पालकांनी मुलांसाठी शाळा निवडताना वरीलप्रमाणे माहिती घेऊन मग निर्णय घेतला तर शिक्षित पालक सुशिक्षित वर्गातही गणले जातील असे मला वाटते.

लेखक संपर्क क्रमांक
९४२२००१६७१






# नवी दिशा नवे स्वप्न!

**युवराज माने**
परभणी

प्रतिकूल परिस्थितीत बाग फुलविण्यासाठी केवळ मेहनत नव्हे तर धाडस लागते.

व्यथित अंतःकरणाने मी माझ्या आयुष्यातील पहिली कर्मभुमी असलेल्या शाळेचा निरोप घेतला . खूप जड मनाने नव्या शाळेकडे निघालो. ज्या ठिकाणी सात आठ वर्ष आपलं मन गुंतलं होतं, गावातील प्रत्येक व्यक्तीशी एक वेगळा ऋणानुबंध जुळला होता .प्रत्येक मुलाचा आणि माझा एक सुरेल संगम साधला होता. अशा ठिकाणाहून दुसऱ्या अनोळखी ठिकाणी जाताना मन विषणं झालं होतं. नव्या शाळेच्या दिशेने जात असताना मागील सात-आठ वर्षाचा काळ अगदी डोळ्यासमोरून सर सर सरकू लागला होता. खरंतर मा.गटशिक्षणाधिकारी मला त्याच शाळेत कार्यरत राहा असं वारंवार सांगत होते. पण ज्या ठिकाणी वातावरण कलुषित झालं त्या ठिकाणी काम करताना अनेक अडचणी येतात हे मी जाणून होतो. म्हणून मी स्वतःहून गटशिक्षणअधिकारी यांना विनंती केली ,की मला दुसरी शाळा हवी आहे. तेव्हा तालुक्यापासून दूर अंतरावर अगदी घनदाट जंगलास लागून असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पलखेडा येथेच जागा रिक्त होती .ज्या ठिकाणी गेल्या तीन-चार वर्षापासून कोणताही शिक्षक जाण्यास उत्सुक नव्हता. त्यामुळे त्या शाळेत एकच शिक्षक कार्यरत होता. अतिशय दुर्गम भागात असलेली ही शाळा. तत्कालीन गटशिक्षणाधिकारी यांनी प्रथम मला शाळा पाहून येण्याची विनंती केली. परंतु मी कोणतीही शाळा घेण्यास उत्सुक होतो. त्यामुळे मला शाळा पाहण्याची गरज नव्हती. कारण प्रशासनावरील माझा विश्वास उडालेला होता. ज्या ठिकाणी गरज नाही त्या ठिकाणी शिक्षक देऊन चाललेली व्यवस्थित यंत्रणा व्यथीत करणे व एका बाजूला जिथे शिक्षक नाही अशा ठिकाणच्या मुलांचे शैक्षणिक नुकसानही होत असताना डोळेझाक करणं यावरून प्रशासन किती मुर्दाड असू शकतं हे कळल होत.त्यामुळे मी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पलखेडा स्वीकारली आणि शाळेच्या दिशेने निघालो.

गोरेगाव तालुक्यातील हे गाव माझ्या परिचयाचे नव्हतं. त्यामुळे विचारत विचारत निघालो. तालुक्यापासून दूर अंतरावर जंगलाला लागून असलेलं छोटस गाव. विस्तीर्ण अशा झाडाझुडुपांमध्ये वसलेलं. आजूबाजूला मोठमोठे तलाव.गावाच्या सुरुवातीलाच एक मोठं वडाचे झाड होतं. दूर दूर अंतरावर कौलारू छत असलेली घर दिसत होती. पूर्ण आदिवासी बहुल असलेलं हे गाव. वडाच्या खाली बसलेल्या चार आजोबांना मी शाळा कुणीकडे आहे विचारलं. प्रथम त्यांना समजलं नाही. परंतु माझ्या बोलण्यातील शाळा हा शब्द त्यांनी ऐकला. त्यांनी एकमेकांमध्ये त्यांच्या गोंडी भाषेतून संवाद साधला. आणि मला इशाऱ्याने शाळेची दिशा दर्शवली. पुढे मी चालु लागलो. चालता चालता रस्त्याच्या आजूबाजूला लाकडांनी उभे केलेले कौलारू घरं व शेणानं सारवलेलं चकचकीत अंगण व अंगणात बांधलेली गुरंढोरं ,शेळ्यामेंढ्या ,कोंबड्या पहात पहात चालू लागलो. आदिवासी पोशाखातील अनेक बाया पोरं निदर्शनास आली. या सर्वांच्या समोर मी हातात बॅग घेऊन शाळेच्या दिशेने चालणारा माणूस पाहून काहींनी अंदाज बांधला नवा गुरुजी होय काय. त्यांच्यापैकी एकजणाला मी विचारलं शाळा कुठे आहे? तेव्हा एक व्यक्ती माझ्या सोबत शाळेच्या दिशेने निघाला. त्याचा चालण्याचा वेग वाढला होता. या शाळेत नवा गुरुजी आलोय असं म्हटल्यानंतर तर तो अधिकच वेगाने चालू लागला. मी आज रुजू होण्यास येणार आहे असं त्या शाळेतील गुरुजींनी काही गावकऱ्यांना सांगून ठेवलं होतं. काही गावकरी आवर्जून शाळेत हजर होते. शाळेच्या जवळ आल्यानंतर माझी नजर शाळेतील चिमुकल्यांना शोधत होती.शाळा म्हणजे दोन खोल्यांची. एका खोलीत पहिली दुसरी व दुसऱ्या खोलीत तिसरी चौथी वर्ग बसवल्या जायचे. शाळेच्या परिसरात मी आलेलो पाहून पूर्वीचे कार्यरत असलेले गौतम गुरुजी व गावकरी समोर आले. सर्व गावकऱ्यांनी व गुरुजींनी माझं पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं. गावकरी मनापासून आनंदी झाले होते. कारण गेल्या चार वर्षापासून शाळा फक्त गौतम गुरुजींवर चालत होती. वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही एवढ्या आतमधल्या आदिवासी गोंडी बांधवांच्या मागणीकडे प्रशासन लक्ष देत नव्हतं. दवडीपार या ठिकाणी माझ्यासाठी सहा दिवस शाळा बंद ठेवली हे या ठिकाणच्या गावकऱ्यांना माहीत झालं होतं .तेच गुरुजी आपल्या शाळेत येत आहेत याची गाववकर्यांमध्ये खूपच चर्चा रंगली होती. अंतकरणपूर्वक आनंद गावकऱ्यांना होत होता. *गावकऱ्यांचा स्वागतरुपी पाहुणचार घेऊन झाला तरीही शाळेतील चिमुकले

अद्याप माझ्या नजरेस पडले नव्हते. स्वागतपेक्षा मला चिमुकल्यांची भेट घेणे महत्त्वाचं वाटत होतं.कारण ,ज्याना गेल्या तीन-चार वर्षात शिक्षणाचा मुख्य प्रवाहात लाभला नव्हता तो माझ्यारूपात आता मिळणार होता. मी त्या चिमुकल्यांच्या आवाजाची व त्यांच्या पावलांची आतुरतेने वाट पाहत होतो.

थोड्याच वेळात मला गावकऱ्यांसह ज्या ठिकाणी सर्व मुलं माझी स्वागत करण्यासाठी वाट पाहत होते.त्या ठिकाणी नेण्यात आलं. वर्गात प्रवेश करताच मुलांनी स्वागत टाळ्या वाजवल्या. आणि माझ्या नव्या चिमुकल्यांचे डोळे मला न्याहाळू लागले .एका क्षणात नव्वद डोळ्यांच्या नजरेला नजर मिळाली. केवळ ४५ विद्यार्थी असलेली ही छोटी 'ज्ञानदायीनी'.सर्व डोळे मला न्याहाळत होते. मुलांनी स्वतःच्या हाताने बनवलेले छोटे-छोटे पानाफुलाचे गुलदस्ते मला देण्यात आले. लेकरांची कुजबुज सुरू झाली .मला पाहून प्रसन्न झालेले चेहरे पहाताना मला कृतार्थ झाल्यासारखं वाटलं .क्षणभर मन खिन्न झाल.ज्या ठिकाणी दररोज मला सहाशे डोळे पाहायचे आज त्याच ठिकाणी पूर्ण शाळेचे विद्यार्थी फक्त ४५ होते. पण मी माझ्या चेहऱ्यावरला भाव या लेकरांना दिसू दिला नाही.माझी कुणालातरी खरंच गरज आहे याची जाणीव झाली .तुम्हा सर्वांना भेटून मला खूप आनंद झाला. असं मी त्यांना म्हणालो. तेव्हा चार-पाच मुलांनी टाळ्या वाजवल्या. इतर मुलं पाहत राहिले. मी प्रश्नार्थक नजरेने मुलांकडे पाहत होतो तेवढ्यात गौतम सरांनी मुलांना सांगितलं ,अरे ,गुरुजी म्हणाले, तुम्हा सर्वांना भेटून मला आनंद झाला आहे. गोंडी भाषेतील शब्द वापरून गौतम सरांनी हा संदेश मुलांपर्यंत पोहोचवला आणि पुन्हा शाळेच्या आवारात टाळ्यांचा आवाज कडाडला. म्हणजेच मागच्या शाळेतील विद्यार्थी पोवारी भाषिक होते आणि या ठिकाणी चे विद्यार्थी संपूर्ण आदिवाशी व गोंडी भाषिक!पुन्हा एकदा भाषिक अडचण निर्माण झाली. मनात वेगवेगळे विचार येऊ लागले. आपल्याच नशिबी असं कसं? पण शाळेत नवीन गुरुजी आला आहे .आम्हाला नवीन गुरुजी मिळाला आहे हे मुलाच्या चेहर्यावरचे भाव पाहिल्यानंतर माझ्या डोक्यातील खिन्नता व खूप सारे प्रश्न निघून गेले. आणि म्हणतात ना ''नशिबात फाटकं आलं तर त्याला नेटकं करावं.''

अतिशय घनदाट जंगलाला लागून असलेलं हे आदिवासी बहुल वस्तीचं गाव .जिथून घनदाट जंगलाला सुरुवात होते असं टोकावरील गाव. परंतु निसर्गाने नटलेलं व सौंदर्याने बहरलेलं. गावातील गोंडी बांधव या जंगलाच्या आधारानेच आपली उपजीविका भागवणारे.जंगलावर निस्सीम प्रेम करणारे .कुणाशीही लबाडी न करणारे सरळमार्गी गोंडी बांधव. आपल्या जवळ असलेल्या थोडयाफार शेतीमध्ये दिवस-रात्र खपणारे. व जंगलातील लाकूडफाटा आणून बाजारात विकणारे ,त्याचप्रमाणे गावाच्या अवतीभोवती घुमरा धरण व कलपात्री तलावात मासेमारी करणारे काही बांधव. एवढ्यावर कुटुंबाची उपजीविका भागवत नसल्यामुळे काही बांधव गाव सोडून नागपूरसारख्या ठिकाणी कामानिमित्ताने चार-सहा महिने जायचे. त्यामुळे शाळेत चार-सहा महिने मुलांची संख्या रोडावलेली असायची. अशा गावांमध्ये नव्यानं सर्व सुरू करायचं एक आव्हानच होतं. पहिले चार आठ दिवस मी गावकरी आणि विद्यार्थ्यांची मन ओळखण्यात घालवली. मुलांची गोंडी भाषा माझ्यासाठी प्रमुख अडसर होता. माझं बोललेलं अर्धवट मुलांना समजायचं. परंतु मुलांनी बोललेलं मला काहीच समजायचं नाही. सर्व इशाऱ्यावर चालायचं. मागील तीन-चार वर्ष एकाच गुरुजीवर शाळा चालत होती त्यामुळे शाळेचे प्रशासन सांभाळून विद्यार्थ्यांपर्यंत एका गुरुजीला पोहोचणं! शक्य व्हायचं नाही .त्यामुळे पटावरील बहुतांश विद्यार्थी शाळेत उपस्थित राहायचे नाहीत. हे आम्हा दोन्ही शिक्षकांच्या समोर मोठा आव्हान होतं.

जंगलाला लागून असलेली शाळा त्यामुळे विद्यार्थी जंगलामध्ये भटकंती करायचे .शिकार करणे , जंगलातील तलावांमध्ये मनसोक्त डुंबणे, मासे पकडणे, मोहाच्या झाडाचे मोह जमा करणे,सोबतच जंगलामध्ये हे मोळ्याआणायला जाणे ,तेंदूपत्ता गोळा करणे ,शेळ्या-मेंढ्या चारालायला जाणे , जंगलातील फळ, भाज्या जमा करणे, यामुळ मुलांना शाळेपेक्षा ही 'निसर्गशाळाच' खूप आवडायची . निसर्गाच्या सानिध्यात वावरणारी ही मुले. भूगोलाच्या मांडीवर खेळतात, शिकार करताना वेळेच गणित अचूक साधतात, संवादाची भाषा इशाऱ्याने हेरतात, अंगा खांद्याला जखम झाल्यास विज्ञानातील औषधही जाणतात..... पण गावच्या शाळेत येण्यास मात्र मनापासून दचकतात.... मुलांना आनंद व्हायचा तो या जंगलातील सुख देणाऱ्या या गोष्टींमुळे. इथे कसलंही बंधन नसायचं . मोकळे आकाश आणि आजूबाजूला वाहणार्या खळखळ नद्या. मनसोक्त उड्या मारण्यासाठी गावातील मित्रमंडळी.

यावर काय करता येईल असा विचार करू लागलो.दवडीपार येथील विद्यार्थ्यांना शाळेत राबविण्यात ज्या पद्धतीने आम्हाला यश मिळालं होतं त्या पद्धतींचा अवलंब याठिकाणी राबविण्यास सुरुवात केली.

जंगलातून मोळ्या घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांशी मी संवाद साधला. त्यांच्या आवडीचं रूपांतर शाळा आवडीत करण्याचं ठरवलं. आता मी व शाळेतील विद्यार्थी यांच्यात चांगलीच गट्टी जमली होती. आम्ही सर्व मुलांना 'आपली शाळा सुंदर असायला पाहिजे ना ?' या विषयावर चर्चा सत्र घेतलं. मुलांकडून त्यांच्या अपेक्षा काढून घेतल्या. मुलांनी सुचविलेल्या अपेक्षाप्रमाणे सर्वांनी काम करायचं ठरवलं. शाळेच्या सुरक्षा भिंतीपासून सुरुवात करायचं

ठरलं. दुसऱ्या दिवशीपासून आम्ही लाकडी सुरक्षाभिंत बनवण्यास सुरुवात केली. सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकाने चार बांबू व दोन लाकडाचे खोड घेऊन येण्यास सांगितलं. परंतु मुलं लहान असल्याने त्यांना ते शक्य होईना झालं. मग आम्ही सर्वजण प्रत्येकाच्या घरी जाऊन हे सर्व सामग्री जमा केली. हे सर्व पाहून गावकरी आश्चर्यचकित झाले. गावकऱ्यांनीही आमच्या ह्या श्रमदानामध्ये सहभागी होण्यास सुरुवात केली. आणि आम्ही सर्वांनी मिळून प्रथम शाळेभोवती लाकडी सुरक्षा भिंत उभी केली. आम्ही मुलांसोबत प्रत्यक्ष काम करू लागलो. खड्डे खोदणे ,लाकूड तोडणे, अशा पद्धतीचे काम करताना मुलं पाहू लागले. त्यामुळे त्यांना शाळेविषयी व गुरुजींविषयी आपुलकी निर्माण झाली.विद्यार्थ्यांना शाळा ही आपली स्वतःची वाटू लागली. मग आम्ही सर्व जणांनी मिळून शाळेच्या आवारात प्रत्येकाने एक झाड लावायचं ठरवलं. आणि बघता बघता शाळेच्या परिसरात खूप सारे झाडं लावण्यात आली. प्रत्येक गोष्टीची काळजी प्रत्येकाने घ्यायचं असं ठरवण्यात आलं.

त्यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांना शाळा आपली स्वतःची 'आई' वाटू लागली. दवडीपार याठिकाणी केलेलं काम याठिकाणी उपयुक्त ठरलं. मागील शाळेतील गावकऱ्यांनी माझ्याप्रती दाखवलेला विश्वास भविष्यातील ही काम करण्यासाठी माझी खूप मोठी जिम्मेदारी वाढली होती. शालेय परिसरात असा अचानक झालेला बदल पाहून तेथील गावकरी व प्रशासनातील केंद्रप्रमुख या सर्वांना आनंद झाला.

प्राथमिक शाळेमध्ये नियोजनाला फार महत्व असते. मुलांच्या विश्वात खेळ आणि खेळणी यांना फार महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन प्रथम मुलांना शाळेत भरपूर खेळण्यास वाव दिला. त्यांच्यावर कसल्याही प्रकारचा अभ्यासाचं दडपण येऊ दिलं नाही. मुलांसाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या खेळण्या शाळेमध्ये उपलब्ध करून दिल्या.

याशिवाय 'भयमुक्त शिक्षण' असावं असं माझं ठाम मत आहे. यावर माझा विश्वास आहे. आपल्याला पडणारे प्रश्न निर्भयपणे विचारता येणे आणि दिसलेलं सत्य निर्भयपणे सांगता येणे या संवादातून आपली उमज आपण वाढवणं म्हणजे भयमुक्त शिक्षण.

यासाठी प्रथमच बालसभा घेण्यात आली. बालसभेच्या माध्यमातून मुलांनी निर्भयपणे आपल्याला काय वाटतं ते सांगावं यातून शाळेची त्याच्या जीवनातील महत्त्वाची भूमिका कोणती हे लक्षात येतं.

आपण ठरविले तर आपला हक्काचा आनंद आपल्यापासून कुणीही हिरावून घेऊ शकत नाही याची प्रचिती पुन्हा आली. शाळा कोणतीही असो, गाव कोणतंही असो मात्र या शाळेतील शिकणारी चिमुकले व गावातील गावकरी हे विश्वास जिंकल्यास मनापासून जीव ओवाळून टाकतात .

थोड्याच दिवसात शाळेतील चिमुकल्यांचे व या आदिवासी बांधवांचे मन जिंकून पुन्हा एकदा आनंददायी प्रवासास सुरुवात झाली. मागील चार पाच वर्षापासून एका शिक्षकावर असलेली धुरा आता आम्ही सर्वजण मिळून समर्थपणे पेलू लागलो. विद्यार्थी शाळेकडे आशेने पाहू लागले. शाळेपासून दूर पळणारे विद्यार्थी सगळ्यात अगोदर शाळेत येऊन शाळेची स्वच्छता करू लागले . झाडांना पाणी घालू लागले. गावातील बांधवही शाळेकडे आपुलकीने पाहू लागले. अधून-मधून गावातील गावकऱ्यांशी त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणाविषयी व भवितव्याविषयी आपुलकीने चर्चा करू लागलो. त्यामुळे गावातील प्रत्येक नागरिक मनाने शाळेशी जुळू लागला. शाळेविषयी कसल्याच प्रकारची आस्था नसलेले हे आदिवासी बांधव आता वेगळ्याच दृष्टीने विचार करू लागले. शाळा आयुष्य समृद्ध करणारी असावी. ज्या शाळेमध्ये मुलांच आयुष्य सुंदर झालं पाहिजे .प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या गरजेनुसार ज्ञान, शिक्षा ,बक्षीस मिळालं पाहिजे. 'स्वप्नातील शाळा' बनवण्याचं माझे ध्येय हळूहळू त्या दिशेने मार्गक्रमण करु लागलं होतं...आपण आयुष्यात कोणासाठी तरी काही करणं म्हणजे आयुष्य समृद्ध करणं होय...... हा ऊर्जा देणारा विचार घेऊन या माझ्या नव्या शाळेतील चिमुकल्यांसह उर्जादायी प्रवासास सुरुवात केली.......

लेखक संपर्क क्रमांक
७५१७४७८५७०



# वक्त्याचं मानधन

**शंकर विभुते**

००००

दीर्घ श्वास घेतला. बस अजून काही वेळ थांबली असती तर मी पागल झालो असतो. बसवाहकाला तिकिटासाठी दीडशे रूपये दिले. बस लातूर शहराच्या बाहेर पडताच मानधनाचं पाकीट खिशातून बाहेर काढलं. खिडकीतून थंड गारवा कानाला लागत होता, पण त्याहीपेक्षा मानधनाची उत्सुकता अधिक होती. सीलबंद पॉकीट होते. पॉकीट हळूच फोडलं. सर्व पैसे बाहेर काढले, शंभर रूपयांच्या पाच नोटा त्यात होत्या. मी परतपरत मोजून पाहिलं. एकही नोट अधिकची नव्हती. मला स्वत:चाच राग व चीड येऊ लागली. तरी एक आशा होती की, विद्यापीठातून येण्याजाण्याचा प्रवासखर्च व अधिकचा भत्ता मिळेल. म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याणप्रमुखास फोन केला. त्यांना कार्यक्रमाविषयी थोडक्यात सांगून प्रवासभत्त्याविषयी विचारपूस केली तेव्हा ते म्हणाले-

उमाटे सर, यावर्षी पासून आपला नियम बदललेला आहे. वक्त्यांची परेशानी होऊ नये म्हणून आम्ही संस्था, महाविद्यालयास आगाऊ रक्कम दिलेली आहे. कार्यक्रम झाल्याबरोबर प्रवासभत्ता, मानधन व अन्य बाबी संयोजकांनी लगेच द्यावे, असा लेखी नियम तयार झालेला आहे. तुम्हाला मानधन मिळालं असेलच .

हो सर, मिळालं, धन्यवाद, म्हणून कॉल कट केला. झालेल्या खर्चाचा व दिलेल्या उसन्या पैशाचा हिशेब मनातल्या मनात करू लागलो. तेव्हा माझ्या लक्षात आले, आपण फसलो आहोत व हा तोट्याचा धंदा आहे. कपाळावर आलेला घाम पुसताना मागील चार दिवसांचा क्रम डोळ्यांसमोर येऊ लागला.

नमस्कार सर

नमस्कार बोला मी

अहो, मी प्राचार्य गजानन बेरळीकर बोलतो.

नमस्कार सर तुमचा नंबर माझ्या मोबाईलमध्ये सेव नव्हता. बोला सर, काय सेवा करू शकतो.

अहो, तुम्ही मोठे वक्ते, साहित्यिक. आम्ही तुमची सेवा केली पाहिजे. पण तुम्ही आमच्या खेड्यातील गरीब महाविद्यालयांना संधीच देत नाही. तसं काही नाही सर तुम्ही कधीही बोलवा मी येईन. तुमचं नाव मी खूप ऐकून आहे. विद्यार्थ्यांचाही आग्रह आहे. तुम्ही कथाकथन खूप छान करता. आमच्या विद्यार्थ्यांना हा अमृतलाभ होऊ दे. धन्यवाद सर. तसं काही नाही, पण मुलांना आवडेल, या पद्धतीने मार्गदर्शन व कथाकथन करीत असतो. तुमच्या मुलांसाठी कधीही येईन.

अहो तुमच्यासारख्या मोठ्या साहित्यिकाचं मानधन आमच्या गरीब महाविद्यालयास परवडतं काय ?

मी मानधनासाठी फारसा आग्रही नसतो. तुम्हाला जे योग्य वाटेल, झेपेल तेवढं मानधन द्या.फक्त रजेचा प्रश्न असतो.

म्हणून तर मी तुम्हाला फोन केला. तुम्ही भूमिकेतून जगणारी माणसं मानधनापेक्षा तुम्हाला माणूस महत्त्वाचा वाटतो सकाळी-सकाळी बोलू नये, राग येऊ देऊ नका, पण तुमचे काही साहित्यिक फार हलकट असतात. त्यांना वीस हजार मानधन, येण्या-जाण्याचा खर्च अन रात्रीला त्यांची वेगळी सोय करावी लागते.

जाऊ द्या आहेत काही तसे आमची साहित्यिक मित्र. पण मी त्या प्रवाहातला नाही. मला तुमच्या घरची भाजी भाकर मिळाली तरी पुरेसं आहे.

अहो सर, तुमचा काही प्रश्नच नाही. आम्ही तुमची सेवा करू, पण आमच्या पद्धतीनं चार दिवसांनी ३ जानेवारी आहे. सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे त्या निमित्ताने महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आहे. तुम्हाला जमेल का या दिवशी ?

मी कॅलेंडर पाहतो व थोड्या वेळाने सांगतो.

सर प्लीज, खेड्याचे कॉलेज म्हणून टाळू नका.

अहो सर, मी खेड्यातलाच विद्यार्थी आहे. उलट मला नेहमी खेड्याविषयी आत्मीयता वाटत असते. आपल्या विचारांनी काही विद्यार्थी घडले तर तेवढीच सामाजिक बांधिलकी.

प्रश्नच नाही. मग मी कामाला लागतो. कार्यक्रम म्हटला की, पत्रिका, बॅनर व बऱ्याच गोष्टी लागतात. दोन जानेवारीला आमचा एक प्राध्यापक तुमची निमंत्रणपत्रिका घेऊन येईल.

मी कॅलेंडर पाहून सांगतो. मी येईन, पण त्या दिवशी काही अडचण नाही ना, हे तपासतो.

सर, काही तपासू नका. आमचा तुमच्यावर हक्क आहे आम्ही ठरवलं. ओके, बाय, शुभदिवस.

अहो, अहो....मला वाटलं, काय एक-एक माणूस असतों, एवढी जबरदस्ती काय कामाची ?

दुकानातून दोन पुस्तके विकत घेतली. जसा वेळ मिळेल तशी वाचून काढली. त्याच्या नोट्स काढल्या. व्याख्यांनाची सुंदर तयारी झाली. मनात थोडीशी धाकधूक होती, जर कार्यक्रम रद्द झाला तर? पण त्या निमित्ताने सावित्री आईची चांगली ओळख झाली होती. ही बाब समाधानकारक होती. यात दोन दिवस कधी गेले, हे लक्षात आले नाही.

सकाळची कामे आटोपून कॉलेजमध्ये गेलो. एकदोन तास झाले असतील, तेवढ्यात ऑफीसमधून प्राचार्यांचा फोन आला–

उमाटे सर, सांगवीचे एक प्राध्यापक आले आहेत तुम्हाला भेटण्यासाठी. उद्याच्या व्याख्यानाविषयी काहीतरी बोलत आहेत. रिकामा तास असेल तर कॅबीनमध्ये या.

हो, सर आलोच म्हणून तासिका नसल्याने साहेबांच्या कॅबीनमध्ये गेलो. साहेबांनी ओळख करून दिली. नमस्कार, परिचय झाला निमंत्रण घेऊन आलेल्या सरांचा काही पाहूणचार करणे हे माझे कर्तव्य होते. म्हणून मी प्राचार्यसाहेबांनी परवानगी घेऊन त्या सरांना बाहेर कँटीनमध्ये घेऊन आलो. तेवढ्यात सांगवीच्या प्राचार्यांचा मला कॉल आला नमस्कार साहित्यिक उमाटे सर. नमस्कार सर, नमस्कार. तुमचे सहकारी पत्र घेऊन आत्ताच आले आहेत. आम्ही सोबतच आहोत.

अहो उमाटे सर, मी पण तुमच्याच महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आहे. कॉलेजची काही कामे विद्यापीठात होती व उद्याच्या कार्यक्रमासाठी काही वस्तू घ्यावयाच्या होत्या.

अरेव्वा, छान. या इकडेच कँटीनमध्ये आम्ही चहा घेण्यासाठी आलो आहोत.

ठीक आहे, ठीक आहे, आलोच म्हणून प्राचार्य बेरळीकरांनी कॉल बंद केला.

मलाही थोडंसं बरं वाटलं प्राचार्य किती मोठ्या मनाचा माणूस आहे. मी उगाच परवाला त्रागा केला होता. ते स्वत: भेटण्यासाठी आले कार्यक्रमाची ही किती जय्यत तयारी चालू आहे.

आम्ही गप्पा मारतानाच प्राचार्य बेरळीकर कँटीनमध्ये आले. नमस्कार सर, या छान वाटलं. तुम्ही स्वत: येथे आलात.

अहो उमाटे सर, कार्यक्रमाविषयी काही बाबी घेता येतात व तुम्हाला त्रास होऊ नये म्हणून माझ्याच कारमध्ये सकाळी आपणास जाता येते. तेवढाच तुमचा साहित्यिकांचा सहवास.

तुम्हाला कशाला त्रास, मी आलो असतो.

अहो, आमचं खेड्यातील गरीब कॉलेज खर्च परवडत नाही. तुम्ही कार भाड्याने घेऊन येणार. त्या भाड्याच्या खर्चात आपल्या कार्यक्रमासाठी अजून काहीतरी करता येईल.

हरकत नाही. आपण जाऊ सोबत तुमच्या गाडीत.

अरे हो, आमच्या शिंदे सरांनी उद्याच्या कार्यक्रमाविषयी तुम्हाला सांगितलं का?

शिंदे सर म्हणाले, नाही साहेब, आम्ही आत्ताच आलो. इकडच्या तिकडच्या गप्पा मारून मी विषय काढणार होतो.

अहो शिंदे सर, माणसांनी पहिलं कामाचं पाहायचं नंतर गप्पा. काय. असे बोलून प्राचार्य जोरजोरात हसू लागले.

हो साहेब, चुकलं माझं, शिंदे सर,

जाऊ द्या. मीच सांगतो. उमाटे सर, आमचं खेड्यातील गरीब कॉलेज असल्यामुळे आम्हाला जास्त कार्यक्रम घेता येत नाहीत त्यामुळे हाच मोठा व शेवटचा कार्यक्रम.

काही हरकत नाही सर, मी तसे नाही उमाटे सर, उद्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या कार्यक्रमासोबतच आम्ही विविध विषयांच्या अभ्यास मंडळांचे उद्घाटन विद्यार्थी परिषद व स्नेहसंमेलन उद्घाटन व गुणवंतांचा सोहळा यासोबतच महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा तुमच्या हस्ते सत्कार असा भरगच्च कार्यक्रम ठेवला आहे. तेंव्हा तुम्ही सगळ्या विषयांना न्याय द्यावा, ही विनंती करण्यासाठी मी मुद्दाम येथे आलो.

मी फक्त सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर बोलण्याची तयारी केली होती. पण या सगळ्या विषयांना न्याय देणे म्हणजे अवघड कार्य आहे. मी

तुम्ही न्याय देऊ शकता, मला माहीत आहे.

प्राचार्य

ठीक आहे, ठीक आहे. बोला, आत्ता काय घेणार? शिंदे सरांकडे पाहात प्राचार्य म्हणाले, शिंदे सर, लाजू नका मला माहीत आहे, तुम्ही सकाळी लातूरहून निघालात. पोटभर नाष्टा करा. बील आपण देऊया.

काय साहेब, असं कुठं असतं का? तुम्ही आमच्या महाविद्यालयात येऊन बील देणार? शिंदे सर, नाष्टा करा. साहेब तुम्हीपण काहीतरी घ्या ना. उमाटे सर, तुम्ही नाष्टा करत असाल तर मी घेईन.

प्राचार्य.

नाही हो सर, आत्ता दुपारचे दोन वाजत आले आहेत. घरी जाऊन जेवायचं आहे. मला तेलकट सहन होत नाही.

मी पण बाहेरचं फारसं खात नाही. तुमच्यासारखे साहित्यक भेटले, तर मात्र मी नाही म्हणत नाही. कारण हे खाणं निमित्त आहे. त्या निमित्ताने एकूण तुमच्या साहित्य व्यवहाराविषयी, समाजव्यवस्थेविषयी काही चांगल्या बाबी कानावर पडतात ती आमच्यासाठी सगळ्यांत मोठी मेजवानी.

तसं काही नाही सर. तुमच्या मनाचा मोठेपणा आहे. आपण काहीतरी साधे घेऊ या. प्राचार्यांनी मूकसंमती दिली तोपर्यंत शिंदे सरांनी स्वत:साठी एक प्लेट खिचडी, एक प्लेट मिरची भजे व एक प्लेट पुरीभाजी मागविली होती. प्राचार्य बेरळीकरांनी वेटरला जवळ

बोलावून, दोन प्लेट इडली, एक प्लेट दोसा व शिरा मागविला.

नाष्टा करीतकरीत प्राचार्य म्हणाले, सर, तुम्हाला उद्या जेवायला काय चालेल?

काही नाही सर, साधी पोळीभाजी किंवा भाकरीभाजीही चालते.

माफ करा, पण तुमच्या साहित्यकांचं खाणं, पिणं वेगळं असतं असं ऐकलं मी घेतल्याशिवाय त्यांना बोलताच येत नाही म्हणे.

ते काही प्रमाणात खरं आहे, पण सगळेच तसे नसतात मी तर अजिबात नाही.

छान छान. आम्ही योग्य पाव्हणा निवडला. प्राचार्य शिंदे सरांकडे पाहत हसायला लागले.

पोटभर नाष्टा, कॉफी झाल्यानंतर वेटर बील घेऊन आला. दोनशे तीस रूपये बील झाले होते. प्राचार्यांनी बील देण्याचं खोटंखोटं नाटक केलं. मी त्यांना थांबवून बील दिलं. आम्ही बाहेर पडलो. शिंदे सर प्राचार्यांना म्हणाले,

साहेब, उद्याचं साहित्य घेऊन जाऊ का?

अरे हो, घेऊन जा किती रूपये लागतील?

साहेब सातशे-आठशे रूपये तरी किमान लागतील.

मी सगळं ऐकत होतो. माझी खात्री झाली होती. एखादं सन्मानचिन्ह, शाल, बुके घेऊन शिंदे सर पुढे जाणार असतील. तरी आपल्यापुढे आपल्या सत्काराची चर्चा होऊ नये, असे मनोमन वाटत होते.

प्राचार्य साहेबांनी दोन हजार रूपयांची नोट बाहेर काढली व शिंदे सरांना म्हणाले,

आठशे रूपये घ्या. बाराशे परत करा माझ्याकडेही खर्चाला पैसे नाहीत.

सर, माझ्याकडे तिकिटास सोडून फक्त दोनशे रूपये अधिकचे असतील.

प्राचार्य माझ्याकडे पाहत म्हणाले, उमाटे सर, चिल्लर आहेत का? मी खिशातून सगळे पैसे बाहेर काढले. माझ्याकडे दोन हजारांची एक नोट, पाचशेची एक नोट व शंभराच्या तीन नोटा होत्या. मी ते पाहून म्हणालो, सॉरी सर चिल्लर नाहीत. त्यांनी माझे पैसे पाहिले होते. ते म्हणाले, उमाटे सर, एक काम करा. ती दोन हजारांची नोट राहू द्या तुमच्याकडे, आठशे चिल्लर द्या मी तुम्हाला उद्या परत करतो उद्या आपण सोबतच आहोत. शिंदे सरांना साहित्य घेऊन पुढे जाऊ दे.

मला नाही म्हणता आले नाही. पैसे देऊन त्या दोघांचा निरोप घेतला. ऑफीसमध्ये जाऊन उद्याची रजा दिली व घरी परत आलो. कार्यक्रमाला जाणार आहे, हे कळताच मुलगी म्हणाली, पप्पांची उद्या मज्जा आहे. मस्त हॉटेलमध्ये पनीरची भाजी, तंदूर रोटी खाता येते. मानधनाचं पैसं मिळतात.

बेटा, ते एका खेड्यातलं कॉलेज आहे. त्यांच्या ऐपतीप्रमाणे काहीतरी देतील. आपण पैशाला कधी आयुष्यात महत्व दिले नाही. मी

म्हणून पैसा तुम्हाला महत्व देत नाही- पत्नी

काय?

मंग काय। तुमचे दुसरे साहित्यिक दहा हजार, वीस हजार घेतल्याशिवाय जात नाहीत. अन् तुम्ही चार दिवस अभ्यास करून हजार दोन हजार घेऊन येता.

अगं, तुला कसं समजत नाही, हा पैसा कमावण्याचा धंदा आहे का? पगार आहे ना आपल्याला सामाजिक बांधिलकी म्हणून करायचं.

हो, ते खरं आहे. पण कोणत्याही कॉलेजमध्ये कार्यक्रमासाठी बजेट असते. मुलांकडून फी गोळा केली जाते. तुमच्या स्वभावाचा फायदा घेऊन ही मंडळी कमीत कमी मानधनावर तुमची बोळवणं करतात।

पत्नी म्हणतं होती त्यात काही खोटं नव्हतं. विद्यार्थ्याकडून वेगवेगळ्या नावाखाली फी महाविद्यालय घेतच असते आणि शासनाकडूनही विविध उपक्रमांसाठी बजेट येतच असते. तरी आपल्या स्वभावात बसत नसल्याने आपण कार्यक्रम घेताना पैसासाठी अडून बसत नाही. ?

रात्री आठ वाजता मीच प्राचार्य बेरळीकरांना कॉल केला.

हॅलो सर, झालं जेवणं? मी.

हो सर, आत्ताच झालं. बरं झालं, मी तुम्हालाच फोन करणार होतो. तुमचा कॉल आला.

तेच उद्या किती वाजता आपण निघायचं?

सॉरी सर, मला एका अर्जंट कामामुळे लातूरला यावे लागले. सर काळी ठीक सहा वाजता नांदेड-लातूर एक्सप्रेस बस आहे. त्या बसने तुम्ही या मी बसस्टँडला येतो. आपण मिळून सांगवीला जाऊ या. प्लीज सर, आमच्यासाठी एवढा त्रास सहन करा.

ठीक आहे, येतो. मी कॉल बंद केला. माझ्याकडे दुसरा पर्याय नव्हता. रजा दिली होती. पत्नीला ही अप्रिय घटना सांगण्यात अर्थ नव्हता. पहाटे पाच वाजता उठून सगळं आटोपून साडेपाच वाजता घराबाहेर पडलो.

गाडी थांबवून कुठेतरी नाष्टा करा- रात्रीचा स्वयंपाक तुमच्यासाठी करीत नाही. हळू जा.' या पत्नीच्या मौलिक सूचना ऐकतऐकत मुख्य रस्त्यावर आलो. वास्कोटचा फायदा दुहेरी होत होता. एक वक्ता म्हणून वेगळी ओळख व थंडीपासून बचाव होत होता. मुख्य रस्त्यापासून बस स्टँडला जाण्यासाठी अॅटोवाले दरवेळी वीस रूपये घेत असत. पण, मी मोठा साहेब वाटल्याने अॅटोतून खाली उतरल्यावर तो पन्नास रूपये मागत होता. चूक माझीही होती. मी बसण्यापूर्वी त्याला विचारायला हवं होतं. त्यानेही सांगितलं नाही. उलट म्हणत होता.

' सकाळीसकाळी काय किटकिट, दिवस खराब जाणार. एवढे मोठे साहेब, पन्नास रूपयेसाठी घासाघीस.'

शेवटी त्याच्या हातात चाळीस रूपये टेकवून बसस्टँड मध्ये आलो. बस लागली होती. वर्दळ कमी असल्याने खिडकीची जागा पाहून बसलो. बस एक्सप्रेस असल्याने दीडशे रूपये तिकीट होते. पण, येण्याजाण्याचा खर्च व मानधन भेटत असल्याने त्याचा मी फारसा विचार केला नाही. तीन तासांनंतर बस लातूरच्या बसस्टँडमध्ये थांबली. खाली उतरलो सतत तीन तास एका जागेवर बसल्याने पायांना कळ लागली होती. पोटात मळमळ होत होती. रिकाम्या पोटी बसचा प्रवास चालू होता. प्राचार्य भेटले की थोडंसं काहीतरी प्रवास चालू होता. प्राचार्य भेटले की थोडंसं काहीतरी खाऊन घ्यावं. असा विचार करीत त्यांना शोधू लागलो. ते कोठेही दिसत नव्हते. शेवटी त्यांना कॉल केला. पहिला कॉल उचलला नाही. दहा मिनिटांच्या अंतराने पुन्हा कॉल केला, तेव्हा मात्र ते बोलले.

'सर नमस्कार, मी गाडी चालवतोय. दहा मिनिटांत येईन. मग आपण चहा, नाष्टा करून पुढे जाऊया.'

'ठीक आहे, हळू या.'

मी बस स्टॉपवर त्यांची वाट पाहात बसलो. फारच मळमळ होत असल्याने बाजूच्या कँन्टीगमधून एक बिसलरी बॉटल विकत घेतली तोंडावर पाणी मारल्याने व थोडं पाणी पोटात गेल्याने बरं वाटलं. थोड्या वेळासाठी माझी मलाच चीड आली. 'एवढा त्रास घेण्याची काय गरज आहे? आपल्या भाषणाने कोणता मोठा परिणाम होणार आहे? लोक महापुरूषांच्या विचाराने सुधारले नाहीत ते आपल्या भाषणाने सुधारतील काय? परत दुसरे मन म्हणत होतं. 'असं कसं? फरक पडतो. महापुरूषांच्या, संतांच्या विचारामुळेच आजचा समाज प्रगल्भ झाला. समाज हळूहळू बदलतो. त्याचा विकास झाडाच्या वाढीसारखा असतं. दिसत नाही पण वाढत जाते. 'या विचारात अर्धा तास निघून गेला तरी प्राचार्यांचा पत्ता नव्हता. परत कॉल केला तिकडून आवाज आला.

'सर गाडी ट्रॅफीकमध्ये अडकली. आलो जवळ. 'माझ्या उत्तराची वाट न पाहता त्यांनी कॉल कट केला. पोटात काही नसल्याने ॲसिडिटी वाढत होती. चिडचिड होत होती.

दहा वाजत आले होते. कधी कधी वाटतं होतं. ' आपण परत जावं' या विचाराच्या तंद्रीत असताना माझ्या बाजूला बसलेला प्रवासी म्हणाला-

'साहेब, तुम्हाला त्या पांढऱ्या कारमधला माणूस आवाज देत आहे.'

मी वळून पाहिलं. प्राचार्य हॉर्न वाजवत होते.लगेच मी तिकडं गेलो. त्यांनी गाडीच्या आत बाजूला बसवून घेतले व म्हणाले. 'येथे पार्किंग फी लागते. तसा बराच उशीर झाला आपणास येथून सांगवीस जाण्यास पंधरा-वीस मिनिटे लागतात. तेथेच आपण चहा-पाणी करू या.'

मी 'हो' म्हणालो. माझ्या हातात कोणतीच गोष्ट नव्हती. मी 'कळसूत्री' बाहुल्यासारखा 'बाहुला' बनलो होतो. सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी त्यांच्या सोयीने दिल्याने मला काही बोलताही येत नव्हते. गाडी सांगवीच्या रस्त्याला लागली ते सांगू लागले.

महाविद्यालयास किती वर्षे झाली. मी प्राचार्य म्हणून कसे नाव कमावले. संस्थाचालकांची मने कशी जिंकली. प्राचार्यपद तारेवरची कसरत असते. आम्हाला अनेक नवरे असतात. संस्थाचालक, विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शासन, विद्यापीठ आणि समाज. या सगळ्यांना सांभाळावे लागते. असं बरंच काही. 'त्यांची बडबड चालू होती. मी फक्त 'हो सर, होना., खरच, अरे बापरे...। अवघड आहे.' असा औपचारिक प्रतिसाद देत होतो. पण त्यांचा उत्साह फार. माझ्या प्रतिसादाची त्यांना गरजच नव्हती. शेवटी गाव जवळ येताच ते म्हणाले.

'सर, बोअर तर झाले नाही ना? मी माझंच सांगत बसलो.'

'नाही नाही, उलट मला या सगळ्या गोष्टींची माहिती मिळाली.'

'सर, या सगळ्यावर एक कथा लिहा तुम्ही साहित्यिक मंडळी कशावरही कथा लिहिता.'

'विचार चालू आहे. तुमच्यावरच लिहावें म्हणतो. पण बघूया.'

'छान छान । लिहा आमच्यावर', म्हणून ते जोरजोरात हसू लागले. त्यांच हसणं मला 'मुन्नाभाई एम.बी.बी.एस.' चित्रपटामधील नायिकेच्या वडिलांच्या हसूसारख वाटलं. अगदी कृत्रिम.

महाविद्यालयात प्रवेश करातच दोन सेवक पळत आले. साहेबांची बॅग हातात घेतली. आम्ही कॅबीनमध्ये गेलो. प्राचार्यसाहेबांनी सगळया महापुरूषांच्या फोटोसोबत संस्थाचालकांसोबत सत्कार करून घेतलेले स्वत:चे फोटो लावलेले होते.

अकरा वाजले होते. पोटात काहीच नव्हतं. भूक लागली होती .पण, पाहुणा असल्याने काहीच म्हणता येत नव्हते. आपण यांना कॉल 'आठशे' रूपये उसने दिले होते. ते मागावे का. असा विचार मनात आला. पण ते कशाला ठेवून घेतील. 'मानधना सोबत देतील.' या आशेने शांत राहिलो. ज्या सरांच्या हातात मी काल पैसे दिले होते ते सर कॅबीनमध्ये आले. मला बरं वाटलं. पण, ते त्या विषयावर काहीच बोलत नव्हते. मीच नकळत आठवण यावी म्हणून म्हणालो.

'सर,काल सगळं व्यवस्थित झालं ना? म्हणजे त्या तुमच्या सामानांसाठी मी दिलेले पैसे पुरले ना?'

'हो सर, जे साहेबांनी सांगितलं ते सर्व घेतलं. ते कालचं पूर्ण झालं' या उत्तराने माझी निराशा झाली. 'हा माणूस आपण दिलेल्या

पैशाचा विषय काढत नाही', याचे वाइट वाटले.

अर्ध्या तासानंतर सेवक अर्धा कप काळा चहा घेऊन आला त्या चहाचे कौतुक करताना प्राचार्य म्हणाले. 'सर, दुधाचा चहा मी बंद केला. सगळ्या स्टाफला काळ्या चहाची सवय लावली. येथे हॉटेल दूर आहे. तुमच्या कॉलेजसारखं येथे कँटीन चालत नाही. हे खेडं आहे. म्हणून मी साखर-पत्ती आणून ठेवली. तुमच्यासारखी मोठी माणसं आल्यावर पळापळ नको.'

या स्पष्टीकरणाने मला वेड लागायली वेळ आली. तरी सभ्यतेचा भाग म्हणून मी 'छान छान' म्हणालो. पोटात चहा गेल्यामुळे थोडं बरं वाटू लागलं. लगेच प्राचार्य म्हणाले.

'सर, शिंदे सरांसोबत बोलत बसा थोडं मी कार्यक्रमाची तयारी पाहून येतो.

माझ्या उत्तराची वाट न पाहता ते निघून गेले. ते गेल्यावर मी शिंदे सरांना म्हणालो.

'तुमचे प्राचार्य हुशार आहेत. सगळ्यांना चहाची फुकट सोय केली.'

'चहा-साखरेचे पैसे आमचेच आहेत...'सर तुटकतुटक बोलले.

मला लक्षात आले. हे प्राचार्य खूप हुशार दिसत आहेत. तेवढ्यात दुसरे एक सर दोन-तीन कागद घेऊन आले व म्हणाले.

'साहेब म्हणाले, विद्यापीठाच्या बहि:शाल व्याख्यानमालेच्या वक्त्यांत तुमचं नाव आहे तेव्हा टी.ए.,डी.ए.च्या फार्मवर सही घेऊन ठेवा.'

मी 'ठीक आहे' म्हणून दोन-तीन ठिकाणी सही करून कागद परत केला. एका गोष्टीचं समाधान वाटलं की, 'बहिंशाल व्याख्यानमालेच्या वक्त्यांना विद्यापीठ प्रवासभत्ता, मानधन, व जेवणाचा भत्ता देत असते. फक्त विद्यापीठात जाऊन घ्यावे लागते. किमान यांचे दोन हजार व विद्यापीठाचे हजार म्हणजे आपणास पुरेसे आहे.' या विचारात असतानाच प्राचार्य आले व म्हणाले, 'सर,चला झाली तयारी बोला, मनसोक्त बोला. आमचे विद्यार्थी तुमच्यापासून ज्ञान घेण्यासाठी आतुरलेले आहेत.'

शेवटी त्यांनी केलेल्या 'कोटी' वर स्वत:लाच प्रतिभावंत समजून खूश झाले. मी मुकाट्याने त्यांच्या मागेमागे गेलो. सभागृहाचे व कालपासून यांच्या तयारीचे कीर्तन ऐकून जे स्वप्न मी पाहिलं होतं ते आत जाताच चक्काचूर झालं. सभागृह तर नव्हतंच. एका वर्गामध्ये पंधरा-वीस मुले होती तेवढीच प्राध्यापक मंडळी बसली होती. समोर एक टेबल व पाठीमागे दोन खुर्च्या. बोर्डावर खडूने कार्यक्रमाचे स्वरूप लिहिलेले. माईक नाही, डायस नाही. संयोजक प्राध्यापक हातात कागद घेऊन प्रास्ताविक करीत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमी, प्राचार्यांचे कौतुक अधिक होते. त्यांना माझे नावही व्यवस्थित उच्चारता येत नव्हते. ते कधी उमाटे सर, कधी उबाळे, उमाळे असं दर मिनिटाला नामांतर करीत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य असल्याने प्रथम त्यांचा झेंडूच्या एका हाराने सत्कार करण्यात आला त्यानंतर निवेदकाने माझा नसलेला परिचय सांगत. दोन-तीन वेळा नावात दुरूस्ती करीत प्राचार्यांना माझा सत्कार करण्याची विनंती केली. सर्वसाधारणपणे सत्कार म्हणजे शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व मोठा हार किंवा पुष्पगुच्छ असतो. ते चित्र डोळ्यासमोर ठेवून मी उभा राहिलो. पण, प्राचार्यांनी त्यांचा सत्कार केलेला हारच माझ्या गळ्याला टाकला व जोरजोरात टाळ्या वाजवू लागले.

या भव्यदिव्य सत्कारानंतर निवेदकाने महाविद्यालयीन क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धा, राष्ट्रीय सेवा योजना या विविध क्षेत्रांत महाविद्यालयात व आंतरमहाविद्यालयात नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्याचा व गुणी प्राध्यापकांचा सत्कार माझ्या हस्ते करण्याचे सूचित केले. यादीप्रमाणे प्रथम प्राध्यापकांच्या नावाची उद्घोषणा झाली. मी उभा टाकलो. सत्कारमूर्ती प्राध्यापक जवळ येताच प्राचार्यांनी समयसूचकता दाखवून माझा व त्यांचा ज्या हाराने सत्कार झाला होता तोच हार माझ्या हातात दिला. मी तो हार त्या सत्कारमूर्तींच्या गळ्यात घातला. इंग्रजी विषयाच्या एका प्राध्यापकाने आपल्या मोबाईलमध्ये हा दुर्मीळ क्षण टिपला व व्हॉटस्‌ॲपच्या ग्रुपवर टाकूनही दिला.

यानंतर याच पद्धतीने सहा प्राध्यापक, तीन शिक्षकेतर कर्मचारी व अकरा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार माझ्या हस्ते एकाच हाराने झाला. विशेष म्हणजे, ज्यांचा सत्कार होत होता ते सत्कार झाल्याबरोबर तो हार त्याच टेबलावर ठेवून जात होते. मला ओठातल्या ओठात हसूही येत होते व चीडही येत होती. त्यांच्या या बचतीच्या फार्मुलासाठी त्यांना पुरस्कार द्यावा व पुरस्काराचे स्वरूप म्हणून हाच हार गळ्यात टाकावा असे वाटू लागले.

सत्कार समारंभानंतर निवेदक म्हणाले,

'सर्व प्राध्यापक मंडळी व विद्यार्थी मित्रमैत्रिणीनो, ज्या क्षणाची आपण मागील चार दिवसांपासून वाट पाहत आहोत तो दुर्मीळ क्षण जवळ येऊन ठेपला आहे. उबाळे सर (प्राचार्यांनी 'अहो उबाळे नाही उमाटे सर' अशी दुरूस्ती सुचवली पण त्याकडे दुर्लक्ष करून त्यांनी आपले बोलणे चालूच ठेवले) महाराष्ट्रातीलच नाही, तर भारतातील एक मोठे कवी आहेत. मी म्हणालो, 'सर, मी कवी नाही, कथाकार आहे. मी एकही कविता लिहिली नाही.' माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत ते पुढे म्हणाले. 'त्यांच्या विनंतीला मान देऊन (मागून एक सर म्हणाले, 'त्यांच्या नाही आमच्या विनंतीला मान देवून) ते आले. त्यांना विनंती करतो की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, यांच्या जीवनकार्यावर, विविध अध्यास मंडळाचे उद्घाटक म्हणून, नवीन

वर्षाचे स्वागत म्हणून विद्यार्थी परिषदेचे उद्घाटक म्हणून गुणवंताचे कौतुक म्हणून स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शक म्हणून सखोल मार्गदर्शन करावे.' सर्वांच्या टाळ्यांच्या गजरात भीमथाटात निवेदक खाली बसले.

मी घड्याळाकडे पाहिलो. दुपारचा एक वाजला होता. खूप भूक लागली होती. मला चक्कर आल्यासारखे वाटत होते. समोरची मुले जांभया देत होती. एक-दोन प्राध्यापिका सतत घड्याळाकडे पाहत व नाक मुरडत चिंताग्रस्त बसल्या होत्या. मला काय बोलावं तेच सुचत नव्हत. तरी उभा राहिलो. माईक, डायस नसल्याने जागेवर उभा राहून बोलायला सुरूवात केली. प्रारंभीचे नावे घेतल्यानंतर मी म्हणालो. 'माझ्या नावाला एवढे पर्याय असू शकतात. हे मी येथे आल्यावरच शिकलो. एवढंच नाही, तर मी स्वत:ही माझे आडनाव काही काळासाठी विसरलो. (निवेदकाला माझे हे बोलणे त्याचे कौतुक वाटत होते. म्हणून तो खुशीत धन्यवाद, धन्यवाद म्हणत होता.) उमाटे, उमाळे, उबाळे, उन्हाळे हे नाव ऐकून मला वाटले. पुढे पावसाळे, हिवाळे या ऋतूंची नावे ही घेण्यास हरकत नाही.' माझ्या या भाषणाच्या सुरूवातीने सगळे सभागृह( म्हणजे हॉलमधील विद्यार्थी) हसू लागले. पुढे निवेदकांनी सूचना केल्याप्रमाणे सगळ्या विषयांना स्पर्श करीत शेवटी मी कवी नसून कथाकार आहे असे सांगून एका कथेने भाषणाला पूर्णविराम दिला. विद्यार्थी खूश झालेले पाहून मला समाधान वाटले. पण प्राध्यापक मंडळी चेहऱ्यावरून चिंताग्रस्त दिसत होती. समोर बसलेल्या एका प्राध्यापिकेने दिसत होती. समोर बसलेल्या एका प्राध्यापिकाने तर दीर्घ श्वास घेऊन 'एकदाची सुटका झाली ' हा भाव चेहऱ्यावर दाखवून दिला.

दुपारचे अडीच वाजले होते. प्राचार्यांनी अध्यक्षीय समारोप संक्षिप्त केल्याने माझ्यापेक्षा त्यांच्या समारोपाला प्राध्यापकांनी जोरात टाळ्या वाजवल्या. आभारानंतर आम्ही ऑफीसमध्ये आलो. परत प्राचार्यांनी मनाचा मोठेपणा दाखवत पुन्हा एकदा काळा चहा पाजवला अन म्हणाले.

'सर, नांदेडला ठीक तीन वाजता बस आहे. पुन्हा डायरेक्ट बस नाही. आपण निघूया. ते निघण्यासाठी उभे राहिले.

मला मानधनाच्या पाकिटापेक्षा काल दिलेल्या आठशे रूपयांची चिंता लागून राहिली होती. तरी मनाची मी समजूत घातली. सर रस्त्याने उसने पैसे व मानधन देतील. या आशेवर त्यांच्यासोबत निघालो. परतीच्या प्रवासात त्यांचा परत महाविद्यालयाचा इतिहास व स्वत:च्या कर्तृत्त्वाचा पाढा सुरू झाला. बसस्टँड येताच मी दीर्घ श्वास घेतला. बस लागली होती. प्राचार्यांनी घाईघाईत खिशातून एक पॉकीट काढले व माझ्या खिशात कोंबून म्हणाले.

'सर, प्लीज हे पॉकीट फोडू नका. कारण आम्हाला ते अपराध्या सारखं वाटेल. काल तुम्ही दिलेले पैसे व मानधन काहीही समजा. मानधन महत्त्वाचं नाही तर आमच्या भावना महत्त्वाच्या आहेत. शेवटी आपल्या माणसाला मोठं आपणच केलं पाहिजे. तिकडच्या पुण्या-मुंबईच्या साहित्यकांना कशाला भाव द्यायचा. आपल्या मराठवाड्यातला माणूस कुठे कमी आहे.'

अशी बडबड चालूच होती. अखेर बस चालू होताच प्राचार्यांची बडबड थांबली.


दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा !

जनकल्याण नागरी सह. पतसंस्था मर्या.
शिरपूर जि.धुळे
बाबुराव वैद्य मार्केट, पहिला मजला, शिरपूर जि.धुळे

- आमचं एकच ध्येय -
समाजातील निराधार महिलांना सक्षम बनवून
आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सबळ बनविने
सप्तश्रृंगी बहुउद्देशीय महिला संस्था धुळे
रजि. नं. एफ / ७३१६४ महाराष्ट्र/७६३७/२००६ धुळे
संचलित
वैष्णवी गृहउद्योग
अस्सल खान्देशी स्वाद

आमच्या येथे उडीद पापड, नागली पापड, लोणचे, शेवया, कुर्डाया, वेफर्स, गरम मसाला, चहा मसाला, मिरची, हळद, धे, चकल्या, तिळचिक्की व सर्व प्रकारचे रेडिमेड पीठ (आटा) इ. वस्तू ऑर्डरप्रमाणे घरपोच मिळतील, ते पण वाजवी किमतीत.
पत्ता: ५१,सप्तश्रृंगीनगर, आकाशवाणी केंद्राच्यामागे,धुळे

# विवंचना...!



सकाळी सकाळी
बोचऱ्या थंडीत
उगवत्या सूर्यनारायणाच्या साक्षीने
वर्तमानाशी ताळमेळ जुळवत
धुक्यातून मार्ग काढत
शेतात जाणारे वारकरी ....

अन ,
त्याच वेळी
त्या बोचऱ्या थंडीत
मफलर बांधून
स्थूल शरीर
स्वेटर मध्ये कोंबून
मॉर्निंग वॉक ला
धुक्यातून मार्ग काढत
जाणारी फिटनेसचे वारकरी ....

अशा वेळी
कर्णकर्कश हॉर्न वाजवीत
वाकडी तिकडी वळणं घेत
दुचाकीने क्लासला
जाणारे विद्येचे वारकरी ....

रात्रीचा आळस झटकून
सकाळी सकाळी
वाफाळलेला चहा घेऊन
घराबाहेर पडलेली
रस्त्याने फुललेली वर्दळ ....

प्रत्येकजण आपापल्या
डेस्टिनी वर पोहोचण्याच्या घाईत
कपाळावर गोठलेल्या
चिंतेच्या रेषा
कशा वितळवायच्या
या विवंचनेत ....!!!!

**डॉ. विनय दांदळे** अकोला
९८२२२३१७६९

# बा क्रांतीबा

बा क्रांतीबा........ तूच
दाविला मार्ग सन्मानाचा
तू होतास म्हणूनच
अर्थ कळला जीवनाचा.

मुर्दाड जगणे होते
वंचिताना हक्क नव्हते.
तुझ्या ज्ञान अमृताने
अंधार युग ही सरले होते.

तूच प्रेरणा तूच दाता
दुबळ्यासाठी झिजला होता
निभीड अंधारात ही तू
प्रकाश दिप लावला होता.

बा क्रांतीबा.. क्रांतीला
तू जन्म दिला नसता जर
वाळवंट झाले असते आयुष्य
अन् जगणे असते काट्यावर.

**संजय घाडगे** लातूर
९८२२९११९८५

## शाळेत जाणाऱ्या मुली

गोठ्यातल्या उग्रगंधी शेणाच्या गोवऱ्या घरभिंतींवर थापल्यावर तडक
विहिरीकडून हिंदकळत्या घागरी भरून आणणाऱ्या मुली वाट पाहतात
घड्याळ्यातल्या अकराच्या टोल्याची नि पायाला भिंगऱ्या बांधल्यागत
निघतात मुली पाच मैलांवरल्या शाळेमध्ये शेतबांधावरल्या झाड-झाडोऱ्यातून.
मुलींच्या टपोऱ्या डोळ्यांत तरळत असतात निळ्यागर्द रानमोरांच्या थव्यांची स्वप्न
चित्रकलेच्या पांढऱ्याशुभ्र कागदावर ओल्याशार जलरंगात उतरवून काढण्यासाठी
मुली गोळा करत राहतात चिंचा-बोरं-आवळे अंकगणिताची उजळणी दशांगुळांवर करून
तेव्हा गुरे चारताना काळ्या पाषाणांवर केलेली आकडेमोडसुद्धा आठवत राहते मुलींना सहज,
डांबरी सडकेलगतच्या कृष्णपिंगाक्षाच्या देवळाजवळ क्षणभर थबकतात मुली
संस्कृतचे अभिजात उच्चार सापडतील कदाचित गुरवाच्या मंत्रोच्चारणामध्ये म्हणून
नि करतात मुली सभामंडपाबाहेरच्या रंगबहार फुलझाडांच्या नोंदी कच्च्या टीपणवहीत
वनस्पतीशास्त्राच्या तासाला हात उंचावून गच्च भरलेल्या वर्गात आपले निसर्गज्ञान पाजळण्यासाठी.
मुली चाचपडत राहतात दप्तरातल्या भाकर-ठेच्याची गाठोडी उपासमार टाळण्यासाठी
तेव्हीं चुलीवर भाकऱ्या परतणाऱ्या माऊलीच्या पोटाला बसलेला चिमटाही जाणवतो त्यांना
नि ऋतूस्त्रावाच्या पहिल्या-वहिल्या ओघळासोबत स्त्रीत्वाची मिळालेली दीक्षा स्वीकारत राहतात
या मुली पाठ्यपुस्तकातील नवनवे धडे रोज आयुष्याच्या प्रत्येक नव्या पानावर गिरविताना...।

**विनय पाटील** मुंबई
९९६९७२३५३३



## मास्तर

मास्तर,
खूप धन्यवाद तुम्हाला !
तुमच्यामुळे का असेना
निदान कळलं तरी
माझा जन्म कधी झाला.
भाकरीचा प्रश्न घेऊन
हिंडणार बाप
आणि मिळालीच भाकरी
तर घेता यावी ती पिलांसाठी
म्हणून मागे असलेली माय
यांना चढवलं तुम्ही शाळेच्या पायरीवर
त्यांच्या डोक्यावरच्या पाटीलाच
पाटी समजणारी ही जमात
तुम्हीच तर घेऊन आलात
सावित्रीच्या मळ्यात ,
आणि दिलं खरी खुरी
शेती कसण्याचं कसब !
काळ्या वावरत राबणारे
माझे चिमुकले हात
तुम्हीच घेतले तुमच्या हातात
आणि बदलून टाकलं
माझं आकाश...
भाकरीच्या वाटेवरचे
माझ्यासारखे असंख्य प्रवाशी
तुम्हीच तर घेऊन आलात
शाळेच्या या सुसंस्कारित वाटेवर ...
जन्मतारीख असेलही खोटी
पण तुमची नियत साफ होती मास्तर ..!
नाहीतर चांदण्यांनी भरलेलं
एक आभाळ असतं आपलं
हे कधीच नसतं दिसलं आम्हाला !
मास्तर,
खूप धन्यवाद
आमचं आभाळ
आम्हाला दिल्याबद्दल ..!

**राजेंद्र उगले,** नाशिक
मोबाईल९९२१९९४२४३

# विधवा बाई नाही....

तुम्ही माझ्या कवितेच्या कपाळावर
कंरटेपणाचा शिक्का मारून
तिच्यावरचा लाल रंग पुसून
तुमचा रांडसाडा तिला नेसवला

तुमच्या गुंगीवरचं औषध होऊ
पाहणा-या माझ्या कवितेच्या शब्दाला
तुम्ही तांडवाचं नाव दिलं

तिच्या अस्मितेच्या प्रवाहाला
बंद खोलीत कोंबताना
तिच्या हुंदक्यांवर
येता जाता थुंकत राहीले तुम्ही...

भर चौकात तिला घेरून
तिच्यावर
तुम्ही सपासप वार केलेत
तिने तुमच्या चौकाटाला सुरुंग लावले म्हणून...

तिच्या शृंगाराने
शृंगारली ही पृथ्वी,
तिच्यातल्या आगीने
पेटली कित्येक थंड मने,

तिच्यातल्या शक्तीनेच आता
बंद केली तुमची वटवट
म्हणूनच...
माझ्या कविताचे धारदार भाले
तुम्ही निष्क्रिय करून

खुशाल हसा आता
तुम्ही खिदी खिदी
पण....
माझी कविता म्हणजे
तुमच्या मनुवादी परंपरने निर्मलेली
उंबरठ्यावर झिजणारी
ती विधवा बाई नाही
ती पहा...
मातीफाडून
माझी कविता
पुन्हा शब्दकोंब घेऊन
नवा आशय
नवा विषय घेऊन
आभाळाला हात देत आहे

**अरविंदा भामरे** शिरपूर धुळे
७०२८३८४६४७.

# हव्यासाचा घोडा

हक्क निसर्गदत्त मानवाचा
टिकविणे वारसा मानवतेचा
संसार सागरात हवा
नितीचा दिपस्तंभ
त्यासही पालथे घालण्या कारण
धनलोभाचा दंभ
सहस्त्राचे केले लक्ष लक्षाचे कोटी
अर्थात तेही जातात उपाशी पोटी
कमवून कमवशिल घबाड

परंतु नोंद तया दप्तरी
एक अक्षरी
युगा-युगाचा लबाड
लोभ संसाराचा करेल तितुका थोडा
टाप एक पुढेच टाकतो हव्यासाचा घोडा.

**एस.पी.जाधव**
साक्री धुळे

## शाळेतील विषयांचे,जीवनातील महत्त्व

मराठी असे अमुची मायबोली, जणू अमृताची धारा ।
सुखदु:खाच्या धाग्याने विणलेली, भाव-भावनांना तिच्यात थारा ।।१।।
संस्कृत असे अमुचि जननी, जतन करूनि ठेवा ठेवू ।
श्लोक-सुभाषिते पठन करूनि, तिचीच महती आम्ही गाऊ ।।२।।
हिन्दी असे अमुचि राष्ट्रभाषा, सन्मानाने तिलाहा गाऊ ।
प्रचार करण्यासिद्ध होऊनि, इतरही भाषा सोबत घेऊ ।।३।।
इंग्रजी असे अमुचि सावत्रमाता, वाघिणीचे दूध प्राशू आता ।
जमाखर्च मांडू कर्तृत्वाचा, आकडेमोड ही गणिताची ।
अधिक-गुणकार यांच्या साह्या, जीवनात काही उणे न ठेवू ।।५।।
शस्त्र असे भौतिक रसायनाचे, जीवशास्त्र हे सजीव जीवांचे।
यशापयशाचे रसायन पचवू, वैज्ञानिक दृष्टिकोन उरी बाळगू ।।६।।
इतिहासाचे नवा धडा घेऊ, जगा-जगू द्या मंत्र बाळगू ।
नागरिकशास्त्राच्या अभ्यासाने, भारताचे उत्तम नागरिक होऊ ।।७।।
पृथ्वीतलावर विहार करव्या, भूगोलाची मदत घेवू ।
जगवा हाच मंत्र खरा, पर्यावरण जाणिव जगता देवू ।।८।।
शारीरिक शिक्षणाने स्वास्थ्य टिकवू, कार्यानुभवाने समृद्ध जीवन घडवू ।
संस्कृतिचा हात धरूनि संगणकासवे, व्यक्तिमत्व विकासास चालना देवू ।।९।।
शाळा अमुचे घर सर्वांगीण विकासाचे माहेर, सूरात-सूर मिसळून जावू ।
संगीताचा आनंद एकदूजास देवूनि, आनंदाचे डोही आनंद तरंग होवू ।।१०।।

**साधना श्रीकांत पोहरे** नागपूर
९९२३६१०४००

## उदक कहाणी

जल तू जीवन,
जल तू तारक,
जल तू क्षुधा,
जल तू मारक.
जल तू इच्छा,
जल तू आशा,
जल तू चिंता,
जल तू निराशा.
जल तू किंचित,
स्थितीआगळी,
जल तू अफाट,
गती वेगळी.
जल तू नसता,
मनी हुरहूर,
जल तू असता,
जगी महापूर.
नसता जल; हाय हाय,
असता जल; हाय हाय,
सांग जला तूच सांग,
तुझिया मनी दडले काय.

**राहूल बावा** धुळे
९८८१८९४१३४.

# ।।डोंगराची गोठ ।।

तोडू नका झाडं
छाटू नका फांदी
पुन्हा नाही कुणा
भेटणार संधी।
झाडामुळे सारं
आहे घरदार
झाडापेक्षा कुणी
आहे दिलदार ।
झाड देते इथे
नित्य पानफुलं
त्याच्या फांदीसंग
खेळतात मुलं ।
कधी केला त्यानं
सांगा भेदभाव
गुण्या गोविंदान
सावलीत गाव।
त्याच्यामुळे ओठी
पावसाचे गाणे
कुणब्याच्या दारी
पाखरांना दाणे ।
दुष्काळाचे दिस
आठवारे जरा
कुण्या कपारीत
भेटला का झरा ।
चला लावू झाडं
करू त्याला मोठं
तुकोबाची सांगू
डोंगराची गोठ।

**गणेश भाकरे** नागपूर
०९९२३८२९७१७.

# एकांत..

गुंतलेली सर्व दारे बंद केली पापण्यांनी..
पाठ नाही सोडली पण आठवांच्या चांदण्यांनी..

मालकी नाही कुठेही या जगी माझी नसूदे..
व्यापले आभाळ मी या अक्षरांच्या काजव्यांनी..

गूढ कोलाहल मनाचा शांत झाला ज्या क्षणाला..
सोडली आशा स्वरांची राहिलेल्या अंतर्यांनी..

भास झाला हा तुझा का ? की म्हणू चकवा मनाचा ?
काळजाचा गाव केला चेहऱ्याच्या आरश्यांनी..

शेवटी उरला अबोला बोलक्या नजरेत जेव्हा..
पेरला एकांत भवती हरवणाऱ्या सावल्यांनी..

**डॉ.संगीता म्हसकर** जळगाव
९८२३७७६९७१

# बुरखा

येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे
कोणता खरा - खोटा हे शोधणे
मात्र फारचं कठीण जात आहे
येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे ।।१।।

मतलबासाठी कोणाजवळही लोटांगण
घालणे ही जणू संस्कृतीच झाली आहे
वाढत्या महागाईने सामान्य जनतेला
जगणेही अलिकडे महाग झाले आहे
येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे ।।२।।

बळीराजाचे राज्य येईल हे केवळ
सभांमधून बोलणे सोपे आहे
पुढाऱ्याच्या घरात जन्माला येणे
हे आता भाग्यवंताचे लक्षण ठरत आहे
येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे ।।३।।

नोकरदारांना महागाई भत्ता - वेतन आयोग
सातत्याने दिले जात आहे
वेठबिगारी - मोलमजुरी करणाऱ्यांना मात्र
दिन में तारें चमकल्याचा भास होत आहे
येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे ।। ४ ।।

निसर्गावरदेखील मात करायला
मानव पुढे सरसावत आहे
पाऊस पडत नाही म्हणून
तो आपलेचं पाप लपवित आहे
येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे ।।५।।

वंशाला दिवा हवा म्हणून
वेगवेगळे प्रयोग केले जात आहे
बोर्डाच्या परीक्षेत मात्र
पणतींचाच प्रकाश पडत आहे
येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे ।।६।।

मुलगी शिकली प्रगती झाली
आपण अभिमानाने म्हणत आहे
मुलीचा गर्भ आजही गटारात अन्
उकिरड्यावर फेकला जात आहे
येथे माणसाच्या चेहऱ्यावरचे
बुरखे रोजचं बदलत आहे ।।७।।

**राजेंद्र चौधरी** बोरीवली (पश्चिम).मुंबई
९४२३४७२७६५



फुलांची रास,
चंदनाचा सुवास,
दिव्यांच्या रांगा,
अंगणी रांगोळीचे सडे...
नवे पर्व, विचार नवे,
आली दिवाळी आली,
पसरण्या नव-आकांक्षांचे घडे....

**मा.राजेश पाडवी**

आमदार

शहादा विधानसभा



परेश शिंपी
9130372388
9172772388

दिपावलीच्या मंगलमय शुभेच्छा !

शिक्षक बंधुनो खास आपल्या सेवेत...

# सातपुडा टेक्सटाईल्स

विश्वासार्हतेचे दुसरं नाव !




खेळाडू गणवेश
(Sports Uniforms)




शालेय गणवेश
(School Uniforms)

शालेय गणवेश,
स्पोर्टस युनिफॉर्म
दर्जेदार कापड...मजबूत शिलाईन ...



आपल्या पसंतीनुसार कापडाचे आकर्षक व योग्य दरात
शालेय गणवेश,स्पोर्टस युनिफॉर्म,टी शर्टस् बनवून मिळतील.

सर्वे क्रं.२७८/११-१२,पाटीलवाडा नगरपालिकारोड,शिरपूर जि.धुळे ४२५४०५



दिपावलीच्या लाख-लाख शुभेच्छा !



भटू माळी



सुनिल चौधरी



राकेश अग्रवाल

| हॉटेल माईलस्टोन | हॉटेल केतन | हॉटेल राजगार्डन |
|---|---|---|
| काशिरामनगर मांडळरोड,शिरपूर | करवंदनाका, शिरपूर | वाघाडीरोड, शिरपूर |

परमिट रूम बिअर बार व व्हेज नॉनव्हेज जेवणाची उत्तम सोय

Deesan Agro-Tech Pvt. Ltd.




MIDC AVDHAN DHULE 424006.contact :02562-288991

Hero




MITESH SHAH 9423288372
YASH SHAH 9890851272

अधिकृत वितरक

विमलनाथ ऑटोमोबाईल्स

११३/५/१, मेनरोड, मुंबई-आग्रा हायवे,
शिरपूर फाटा,शिरपूर जि.धुळे ०२५६३-२०२३७२



# दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा!



मा.तुषारजी रंधे

धडाडीचं शिक्षक नेतृत्व





**मा.निशांतजी रंधे**

| प्राचार्य | प्राचार्य | उपप्राचार्य |
|---|---|---|
| **मा.डॉ.प्रकाश एच.पाटील** | **मा.महेश पी.पवार** | **मा.प्रा.कल्पेश एस.वाघ** |

**सर्व कर्मचारी वृंद इन्स्टिटट्यूट ऑफ फार्मस्युटीकल एज्युकेशन,बी.फार्मसी व महाराणी अहिल्याबाई होळकर (एम.ए.एच.) कॉलेज ऑफ फार्मसी (डी फार्मसी),बोराडी ता.शिरपूर जि.धुळे**


दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
BORSE BROTHERS
BORSE BROTHERS
Engineers & Contractors Pvt. Ltd.
Plot No.23, Anand Nagar, Near Indira Garden, Deopur, Dhule - 424 002
Ph. 02562 - 297055
MESU SOLUTIONS
Corp. Office : Flat No.24, Rohan Corner, Shivtearth Nagar,Paud Road, Kothrud Pune 411038 Ph. 020 - 65225355
Regd Office : Plot No.23, Anand Nagar, Near Indira Garden, Deopur, Dhule - 424 002
सप्तर्षी बहु - उद्देशिय संस्थेचे
सप्तर्षी इंग्लीश मेडियम
प्रायमरी स्कूल, वर्षी
ता.शिंदखेडा जि.धुळे
IndianOil
मे. खुशी पेट्रोलियम
मा.श्री. डी.आर. पाटील
(देवाबापु)
गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर,
चेअरमन - सप्तर्षी ग्रामिण पतसंस्था, वर्षी
चेअरमन, सप्तर्षी इंग्लीश मेडियम स्कुल, वर्षी
वृक्षमित्र, निसर्गमित्र, कुणबी पाटील भुषण पुरस्कार
लोकमत कृषीरत्न पुरस्कार, ॲग्रोवर्ल्ड कृषीगौरव पुरस्कार
राज्यस्तरीय शिवपुत्र महाराष्ट्र गौरव पुरस्कार
db agro
DB Agro
Gat No.-90/1A, Mumbai - Agra Highway, Varshi, Tal.- Shindakheda, Dist.- Dhule. 425404 (MH) Contact- 9422786112
सप्तर्षी ग्रामिण विगर
शेती सहकारी
पतसंस्था मर्यादित
मु.पो.वर्षी, ता.शिंदखेडा, जि. धुळे
SERVO
WORLD-CLASS LUBRICANTS
M/s KAVYA LUBES & STOCKIST
Authorised Stockist for Servo Lubes
Plot No.23, Anand Nagar, Near Indira Garden, Nakane Road,Deopur, Dhule - 424 002 Mob. 9762255555


आदिवासी विभाग प्रकल्प कार्यालय,धुळे
मा.श्री.राजाराम हाळपे
प्रकल्प अधिकारी
आदिवासी विकास विभाग,धुळे कार्यालय
दै.दिव्य मराठी PROUD महाराष्ट्रीय अधिकारी पुरस्काराने सन्मानित

# प्रियदर्शिनी सहकारी मुद्रणालय व प्रकाशन संस्था मर्या,शिरपूर

शुभ दीपावली

मार्गदर्शक

मा.श्री.भूपेशभाई पटेल

चेअरमन

मा.श्री.प्रसन्न जैन

व्हा.चेअरमन

मा.श्री.राजेश भंडारी

## * नवनिर्वाचीत संचालक मंडळ *

मा.श्री.तपनभाई मुकेश पटेल
मा.श्री.ज्ञानेश्वर भगवान माळी
मा.श्री.गोपाल उखा ठाकरे
मा.श्री.सतिष काबरा (व्यवस्थापक)
मा.श्री.सुरेश सिताराम चौधरी
मा.श्रीमती.तृप्ती उमेशकुमार गांधी
मा.प्रा.डॉ.श्री.छगन हिरामण निकुंभे
मा.श्री.प्रकाश भिका गुरव
मा.सौ.शारदा राजेंद्र पंडीत
मा.श्री.श्रीकृष्ण चंदुलाल शर्मा

महाराजा कॉम्प्लेक्स्,शिरपूर जि.धुळे संपर्क - ९८८१०७७३७१






मा.यशवंत परशराम बाविस्कर(चेअरमन)



मा.अशोकबापू कलाल(व्हा.चेअरमन)


मा.राजेंद्र बाबुराव पाटील, मा.सर्जेराव डिगंबर पाटील, मा.हिंमत सिताराम पाटील,
सौ.कल्पनाबाई नानाभाऊ कोळी, सौ.प्रेमलता संग्रामसिंग राजपूत, मा.सत्तारसिंग दुर्गा पावरा
मा.काशिनाथ नारायण राऊळ, गणेश ताराचंद बारी, लक्ष्मण रामचंद्र मराठे, लक्ष्मण पवार

# आमोदा परिसर तेलबिया उत्पादक सह. संस्था,शिरपूर जि.धुळे












मा.भाऊसो.तुषार रंधे
(अध्यक्ष)


मा.नानासो.निशांत रंधे
(सचिव)


मा.श्री.रोहित रंधे
(ट्रस्टी)


मा.डॉ.सुमिता रंधे-गवळी
(सदस्य)


मा.ताईसो.आशाताई रंधे
(स्कूल चेअरमन)

# डॉ.विजयराव व्यंकटराव रंधे इंग्लिश मेडीयम स्कूल

## (प्रायमरी-प्री प्रायमरी सेकंडरी अँड हा.सेकंडरी)

जी.व्ही.पाटील सो. 9921226279 सौ. कामिनी पाटील 9011209496

सौ. सारिका ततार 9326805039 प्रमोद पाटील 9881922547

पत्ता: एस.पी.डी.एम.कॉलेज कॅम्पस,दादासाहेब विश्वासराव रंधे क्रीडा संकुलाजवळ,शिरपूर जि.धुळे